माणूस
चार जुलै १९७० : चाळीस पैसे.

# 'गोरी'

सरळ साधी. फार फार नैसर्गिक
आनि
यामुळेच मनस्वी मोहक.



चंद्रशेखर आझाद, सुखदेव,
राजगुरु, भगतसिंग........

हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीचे
धुरंधर सेनापती आणि सैनिक
यांच्या हौतात्म्याची वीरगाथा




लेखक : वसंत पोतदार

किमत : प्रसिद्धीनंतर रुपये पंधरा सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत रुपये आठ

सवलतीची मुदत : १५ ऑगस्ट १९७० पर्यंत
रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास एक रुपया अधिक.
रक्कम मनिऑर्डरने पाठवावी. कार्यालयातही स्वीकारली जाईल.

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

४ जुलै १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : पाचवा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| चाळीस पैसे | वीस रुपये | चाळीस रुपये |


## सप्रेम नमस्कार...

२० जून अकातील राजश्री ठकार याची 'मला चागला म्हणू नकोस' ही कथा फार उजवी वाटली. अशा आत्मनिवेदनपर कथा सहसा कोणी लिहीत नाही. म्हणूनच लेखिकेचे अभिनंदन. सौ. पुष्पा भावे याचे 'रग' या उद्धव शेळके यांच्या कादवरी-वरील परीक्षण वाचले. फडके साप्रदायावर त्याचा रोख दिसतो. ही गोष्ट फार खटकली. त्याच्या रोखाचे कारण काही कळले नाही. पुस्तके सदरात नवीन समीक्षकांना स्थान द्यावे. दादूमियाचे सदर बद का केले ?

**पुरुषोत्तम अडिवरेकर, मुबई**

१३ जूनच्या माणूस मधील हळबे याचा लेख वाचला. कोकणच्या समस्याना माणूसमध्ये प्रथमच स्थान मिळाले आहे असे वाटते आमच्या विकासाचा मार्ग डोंगराळ असला तरी शासनाने लक्ष घातल्यास तो निश्चितपणे सोपा होणार आहे कोकणच्या लोकामध्ये आता जागृती होत आहे. आपणासारख्या पत्रकाराचे लक्षही त्याकडे वेधले आहे आपण एखादा खास प्रतिनिधी पाठवून या भागातील सर्वच वस्तुस्थितीचे चित्र माणूसमध्ये उभे करावे असे वाटते

**अण्णा शिरगावकर, दाभोळ**

**साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

। रातराणी । विजय तेंडुलकर ।

# भुवन सोम

## एक साधा गंमतीशीर अनुभव

लोकप्रियता ही एक बेहिशेबी गोष्ट आहे. एकादा चित्रपट प्रायोगिक म्हणून निर्माण केला जातो. निर्माण करताना वेगळ्या वळणाची गोष्ट, लोकप्रियतेचे वारे न लागलेला नटसंच, नाचगाण्यासाठी तडजोड न करण्याचा निर्धार असे 'प्रायोगिक' मानले जाणारे आग्रह मोठ्या कटाक्षाने ठेवले व साभाळले जातात. प्रायोगिक म्हणूनच त्याचा चित्रपट-उत्सवात सन्मान होतो. इतकेच नव्हे तर प्रायोगिक अतएव धदा न करणारा असे मानून तो मुबईत काही दिवस सकाळच्या आड वेळी दाखविण्यात येतो. आणि काय आश्चर्य – काही खेळानंतर त्याला गर्दी होऊ लागते. गर्दी वाढू लागते ठरल्या दिवसापलीकडे त्याचा मुक्काम वाढतो. आडवारी आडवेळी थेटर गच्च भरू लागते. तो चक्क लोकप्रिय झालेला असतो! तुफान लोकप्रिय नव्हे, साधाच लोकप्रिय पण तरी काय झाले? 'भुवन सोम' सारखा चित्रपट लोकप्रिय? आपण काहीतरी 'मॅड' करतो आहोत असे समजून हा चित्रपट निर्माण करणाऱ्या दिग्दर्शक मृणाल सेनना लोकानी चकविले आहे की लोकाना या सेनबाबूनी बनवले आहे की सगळेच बनले आहेत नकळे; एवढे खरे की 'भुवन सोम' मुबईत गर्दी खेचणारा चित्रपट ठरला आहे; आणि या गर्दीने बिथरून की काय, ओठाच्या कडेस सिग्रेटचे जळते थोटुक ठेवून जडजबाल भाषेत निसरडे बोलणारे प्रायोगिक चित्रपटांचे निस्सीम चहाते 'आयला या चित्रपटात प्रायोगिक आहे तरी काय' म्हणून तुच्छतेने एकमेकाना विचारू लागले आहेत.

वस्तुत: 'भुवन सोम' हा प्रायोगिक वर्गातीलच चित्रपट आहे. तथापि या घटकेस प्रायोगिक ठरणाऱ्या कथाविहीन, सगतीविहीन अतिकर्कश किंवा स्मशान-शातीयुक्त, कमालीच्या सथ अथवा भयाण जलदगतीने धावणाऱ्या त्याचप्रमाणे बहुधा काही लैंगिक समस्या वा प्रसग हाताळणाऱ्या पाश्चात्य चित्रपटाशी त्याचे, आरभीच्या मदगती व्यतिरिक्त, काही नाते नाही. बासु चतर्जी या दिग्दर्शकानी अगदी अलीकडे निर्माण केलेल्या 'सारा आकाश' या प्रायोगिक चित्रपटाच्या तुलनेनेही तो कमी आवाक्याचा, तेवढा खोल अगर उच न जाणारा आणि साधा सरळ आहे. असे जरी असले तरी त्याची कुळी प्रायोगिकच आहे – म्हणजेच सवंग

पडद्यावर आल्याक्षणापासून
ती 'गोरी'च होते. अखेरपर्यंत
फक्त 'गोरी'च रहाते......

लोकप्रियतेच्या कोणत्याही मोहापासून तो कटाक्षाने अलिप्त आहे. विषयाशी एकनिष्ठ आहे. आणि हा विषय नेहमीपेक्षा वेगळा आहे. सत्यजित रे आणि तपन सिन्हाच्या चित्रपटाचे स्मरण तो देतो. या दोघाना प्रायोगिक वर्गातून या वर्गाच्या अद्ययावत तरुण चाहत्यानी केव्हाच 'रिटायर' केले आहे हे अनेकाना माहीत नसेल. खुद्द कलकत्त्यात सत्यजित रे यांजकडे आजच्या अस्सल प्रायोगिक चित्रपटाच्या चहात्या तरुण पिढीने केव्हाच पाठ फिरवली आहे आणि कलकत्त्याचे 'पब्लिक' या चित्रपटामागे वेड्यासारखे धावते आहे.

'भुवन सोम' हा तसे पाहिले तर एक साधा गमतीशीर अनुभव आहे. अपघाताने माणसे चाकोरी सोडून कधी तरी एकदा वहावतात. चाकोरीत मिळणे असंभवनीय असे अनुभव त्याना मिळतात. चाकोरीतल्या वास्तवाच्या तुलनेने हे अनुभव म्हणजे अद्‌भुत अशी स्वप्ने असतात. स्वप्ने टिकाऊ नसतात. चाकोरी असते. पुन्हा चाकोरीतले जीवन सुरू होतेच. त्यात काही बदल नसतो. पण ती चाकोरी चालणारे मन थोडे तरी बदललेले असते. क्वचित् हा बदल इतका सूक्ष्म असतो की ज्याचा त्यालाच तो कळत रहातो. सुखवीत आणि दुखवीत रहातो. एक प्रकारची हुरहूर लावतो.

'भुवन सोम' चित्रपटात भुवन सोम नावाच्या हुच्च्या रेल्वे अधिकाऱ्याला हा अनुभव मिळतो. हा अधिकारी मध्यम वय ओलांडलेला आहे. त्यात का कोणास ठाऊक पण अविवाहित आहे. त्याला, त्याचे कोणी नाही. म्हणून कार्यालय हेच त्याने त्याचे सर्वस्व मानले. पंचवीस वर्षे फायलीच्याच सहवासात तो वेटा रमला. त्याला आयुष्यात दुसरे जग राहिले नाही. रात्रीपर्यंत तो कचेरीत काम करी. पुन्हा घरी फायली घेऊन जाई. सकाळी वेळेआधीच खुर्चीत येऊन बसलेला असे. परिणामी त्याच्या खात्याला त्याचा जाम सासुरवास होत राहिला. तो स्वभावाने हट्टी आणि सतापी झाला. तुसडा, एकलकोंडा, कुढ्या बनला. खात्यावर त्याचा मनस्वी दरारा होता. कोणी पैसे खाईल त्याचा तर हा भुवन सोम काळ बनला. म्हणजे माणसे पैसे खातच होती पण पैसे खाताना भुवन सोमला ती फार टरकून असत.

कृष्णनगर नामक एका छोट्या रेल्वे स्टेशनवर कोणी तिकिट बाबू पैसे खातो

अशा तक्रारी आल्याने त्या हरामखोराच्या चौकशीसाठी भुवन सोमसाहेब तिथे जातीने पोचले. आपली शंभर वर्षे भरली असे त्या पैसेखाऊ तरुण नवविवाहित तिकिट बाबूला भुवन सोमसाहेब गाडीतून उतरताना पाहून वाटले. उग्र चेहरा, भला मोठा, 'प्रस्थ' म्हणावा असा काळाकभिन्न देह आणि धरणी नमवीत चालणारी चाल यानी भुवन सोमसाहेबांविषयी निरपराधी माणसाचीदेखील हीच भावना झाली असती, मग अपराध्याचे काय ?

साहेबांचा मुक्काम डाक बगल्यात पडला. चौकशीला आरंभ व्हावयाचा; पण तेवढ्यात, शहर आणि कचेरीची कुबट कुद हवा सोडून या मोकळ्या नैसर्गिक वातावरणात आलेल्या सोमसाहेबाला शिकार करण्याची दांडगी लहर आली. सारस पक्ष्यांच्या शिकारीसाठी हा टापू प्रसिद्ध असल्याचे त्याने ऐकले होते आणि मागे कधी तरी त्याने एअरगन चालवलीही असेल. एवढे खरे की तिकिटबाबूची शिकार तात्पुरती लांबणीवर टाकून सोमसाहेब मोठ्या उत्साहाने आणि मजेने, कधीही पैसे न खाल्लेल्या पक्ष्यांच्याच शिकारीसाठी निघाले.

कृष्णनगरच्या रेल्वे फाट्यापासून तो भाग बराच दूर. आत – जंगलात. किंवा त्यापलीकडे वाळवंटात. जाण्याला मोटारीची सडक नाही. रें रें करीत चालणाऱ्या काठियावाडी बैलगाडीतून प्रवास. उचसखल खडकाळ वाटा. उन्हदेखील तसेच. सगळे वैराण. विटके. त्यात धुराळा. आणि त्यात गाडीवाला म्हणजे मोठ्या काठियावाडी पटक्याचे एक बडबडे पात्र. कनिष्ठ माणसाचे ऐकण्याची सवय नसलेल्या सोमसाहेबाला, दुसरी संगत नसल्याने आणि मार्ग नसल्याने, हे सर्व ऐकणे आले. त्यात गाडीला बसणाऱ्या खडकाळ दणक्यानी अंगाचे धिरडे होतच होते. बरे आता चिडायचे तर चिडायचे तरी कोणावर ? वॉर्निंग कोणाला देणार, गेटआउट कोणाला म्हणणार आणि डिसमिस तरी कोणाला करणार ? शिकारीची हौस आपलीच !

आधी रेल्वेच्या खाड् खाड् धावणाऱ्या पाळण्यातला मोठा प्रवास, नंतरची ही बैलगाडीतली काळेपाणी जन्मठेपच वाटावी अशी दीर्घ शिक्षा आणि यातच मोठ्या मोठ्या शिंगांचा एक महाकाय रेडा गाडीला आडवा आला. बैल चालेनात. गाडीवान भयभीत. सोमसाहेब त्याच्या खात्याचा काळ असला तरी त्या जंगली वाटणाऱ्या रेड्यावर काही त्याचे ज्युरिसडिक्शन नव्हते. एअरगनने एक तर असली शिकार अशक्य आणि मुळात एअरगनचे स्मरण तरी त्या आणीबाणीत असायला हवे ना ? गाडी-वान स्वत. तयारी करीत साहेबाला म्हणाला, पळा. आणि आपला हुद्दा वगैरे विसरून सोमसाहेब थरथरत उतरला हळूच गाडीतून खाली आणि वाट फुटली तिकडे लागला धावू. तर जणू पूर्वजन्मीचीच ओळख अशा पद्धतीने रेड्याने सोमसाहेबाचीच पाठ धरली नि काय !

सोमसाहेबाचे प्राण त्याच्या गरगरीत कठाशी आले. पाय गळू लागले. त्याला

पाणूस

ब्रह्मांड आठवले. रेडा तर शिंगे रोखून समोर उभा. जणू म्हणत होता, सोमसाहेबा, अधमाधमा आता भरली तुझी शभर वर्षे असेच समज ! घे देवाचे नाव आणि ये माझ्या अणकुचीदार पावरबाज शिंगांवर !

कुठे शहरातल्या रेल्वे–कचेरीतला ढाण्या वाघ भुवन सोमसाहेब आणि कुठे रेल्वे आणि बैलगाडीतल्या प्रदीर्घ छळाने आधीच पुरता हडवडलेला आणि झाडाचा आडोसा धरून मरणाच्या भयाने थरथरणारा फोपशा अंगाचा भुवन सोम नामक ससा ?

साऱ्या रेल्वेतल्या पैसेखाऊंना डोळाभर पहावे असे वाटले असते असे दृष्य !

पण तेवढ्यात जणू परमेश्वरच साहेबाच्या परित्राणार्थ एक काठियावाडी ग्रामकन्या होऊन अवतरला. ती ग्रामकन्या त्या भल्या दांडग्या राक्षसी रेड्यावर लीलेने स्वार होऊन त्याला वात्सल्याने हाकारीत साहेबाला खळखळून हसत निघून गेली.

साहेब ' आ ' वासून पहात राहिला.

गाडीसकट बैल पळून गेलेले. गाडीवान म्हणाला, मी गाडीमागे जातो, तुम्ही शिकारीमागे जा. असेच पुढे जात रहा. शिकार केल्याशिवाय राहू नका.

एकटा सोमसाहेब भुकेला, तहानेला, थकलेला भटकत निघाला आणि त्याला एक पटेल भेटला. त्याने त्याला घरी नेले. तिथे होती एक काठियावाडी गोरी. ही पटेलची मुलगी. साहेबाने पाहिले तर, रेड्याच्या पाठीवर बसून गर्भगळित साहेबाला पोटभर हसत निघून जाणारी तीच ती ! अजून तिला हसू आवरत नव्हते.

पटेल म्हणाला, शिकारीची तुम्हाला सवय नाही. पक्ष्याच्या शिकारीची तर नाहीच नाही. ही माझी गोरी तुमच्याबरोबर न्या. ही तुम्हाला सर्व दाखवील.

ते गोरी नामक अनाघ्रात, नैसर्गिक, रसरशीत आणि एखाद्या फुलासारखे प्रसन्न सौंदर्य साहेबाला आवडले हसावे तर गोरीनेच असे त्याला वाटले.

पटेल सुखदुःखाच्या गोष्टी करताना म्हणाला, पोर नवऱ्याघरी कशी नांदते त्याची काळजी आहे. नुकतेच लग्न झाले आहे. लौकरच नवरा घेऊन जाईल. पण कोणाला ही मुळी मानीतच नाही. आता काय करायचे ?

सोमसाहेब सारस पक्ष्याचे शिकारीचे वस्तुपाठ गोरीकडून घेऊ लागला. आयुष्यात कोणाकडून काही शिकण्याचे नाकारणाऱ्या कर्तुमकर्तुम् सोमसाहेबाला ही शिकवणी भारी आवडू लागली. तो अत्यत आज्ञाधारक विद्यार्थी बनला. त्याचा षोडषवर्षीय गुरु सांगेल तसे बिनतक्रार करू लागला. शिकारीचे तंत्र नीटसे जमत नव्हतेच पण वेळ फार छान जात होता.

आयुष्यात कधी कल्पिलेही नाही अशा एका गहिऱ्या, निरागस, स्वप्निल अनुभव-विश्वात सोमसाहेब स्वत:ला प्रथमच विसरला, लहानाहून लहान होऊन, निर्भर होऊन मनापासून रमला. शहरातल्या ढाण्या वाघाचे पार हरीण होऊन नाचू बागडू लागले, पोपटी हिरव्या विश्वात हुंदडू लोळू लागले.

गोरीने एकदा बोलता बोलता विचारले, तुम्ही कुठे काय करता ?

साहेब म्हणाला, रेल्वेत असतो.

गोरीने म्हटले, माझा नवरा रेल्वेतच आहे. तो कृष्णनगरला तिकिटबाबू आहे. त्याला पगार कमी आहे म्हणून गरजू लोकाना मदत करून तो वर थोडे पैसे मिळवतो. कुणाला गाडीत जागा देतो, कुणाचे तिकिट काढण्याचे राहिले असले तर त्याला उतरण्याची तसदी देत नाही. त्याबद्दल पैसे घेण्यात काय वाईट आहे ?

सोमसाहेबाची भिवई यासरशी वर गेली. गोरी सहजपणे बोलतच होती, सोमसाहेबाला तुम्ही ओळखता ? नाही ? सगळ्या रेल्वेत नतद्रष्ट म्हणून प्रसिद्ध तर आहे मोठा वाइट्ट माणूस. दुष्ट मेला ! कुणाचे काम करून देऊन माझ्या नवऱ्याने चार पैसे मिळवले तर याचे त्यात काय जाते ? पण नाही. तो आता माझ्या नवऱ्याविरुद्ध उठला आहे....

सोमसाहेब चेहरा सरळ ठेवून हे ऐकत होता. गिळीत होता.

गोरीच्या मार्गदर्शनाखाली दरोबस्त तयारी करूनही साधी पक्ष्याची शिकार काही सोमसाहेबाला जमलीच नाही गोळी लागलीच नाही. एक सारंस पक्षी पडला तो बिचारा नुसताच गोळीच्या बाराने घाबरून ! तो घाबरलेला जाया पक्षी घेऊनच हिरमुसला सोमसाहेब गोरीसमवेत गोरीच्या घराकडे परतला.

मुक्काम सपला होता. ज्यासाठी सोमसाहेब धडपडत आला त्या शिकारीच्या बेताचे वांगे झाले होते. बदुकीला घाबरून हाती लागलेला एक पक्षी एवढीच जमेची बाजू होती आणि ती फार केविलवाणी आणि नामुष्कीची होती. साहेब काही केल्या खुलत नव्हता. ढाण्या वाघाला आपण एकादा उदीर बिंदीर असल्यासारखे वाटत होते.

साहेब कृष्णनगरकडे परतला—गोरीने सोबत दिलेला पक्षी घेऊन. पण अर्ध्या वाटेतून तो पुन्हा गोरीकडे गेला. म्हणाला, हा पक्षी इथेच असू दे हा मला घाबरतो. हा इथे खुलेल. आणि एकटा सोमसाहेब निघाला. मनोमन हुरहुरत जड अंतःकरणाने. पण शीळ घालीत.

साहेब शहरात पोचला—बहुधा चौकशी रद्द करून किंवा ती उरकून. तीच कचेरी. त्याच फायली. तेच कनिष्ठाचे मानवी दुर्गुण तेच कुबट, कुद वातावरण. पण आता यात आणखी काहीतरी काहीतरी वेगळे, नवे, ताजे, टवटवीत. भुवन सोमसाहेब तोच जुना होता आणि तरीही बदलला होता. गोरीच्या नवऱ्याचे तिला पत्र आले त्यात आनंदवर्तमान होते माझी बदली मोठ्या स्टेशनवर झाली. पगार जास्त मिळेल. आणि पुन्हा स्टेशन मोठे त्यामुळे वरकड उत्पन्नही चागलेच...

असा हा चाकोरीतल्या एका एकाकी, हट्टी, उग्र, वातड माणसाला आलेला कोवळा गंमतीशीर अनुभव. शिकारीला गेलेल्या त्याचीच झालेली मजेशीर शिकार.

हा अनुभव तीन प्रकारे सागणे शक्य होते. एक म्हणजे भुवन सोमच्या दृष्टिकोनातून. दुसरा, गोरीच्या नजरेतून. मृणाल सेननी तिसरा पर्याय पत्करला आणि

जणू हा साराच मिळून एक संपूर्ण अनुभव कॅमेऱ्याच्या मायक्रोस्कोपखाली घालून पहावयाचे आणि प्रेक्षकांना दाखविण्याचे त्यानी ठरवले.

यामुळे एकप्रकारे ही एक भावकथा असूनही हळवी बनली नाही कॅमेऱ्याद्वारे आपल्या प्रतिभेने मृणाल सेननी या कथेतले सारे सौंदर्य कसे विलक्षण नाजूकपणे आणि जरूर तिथे मिष्किलपणे पडद्यावर साक्षात उभे केले. एखाद्या अव्वल भाव-कथेचा गूढ, अदभुत, स्वप्निल गाभा या चित्रपटाला त्यानी गोरी–सोम सबधाच्या चित्रणात दिला आहे. रगीत चित्रपटाच्या रंगाचा सारा नक्षा या काळ्या–पाढऱ्या रगातल्या चित्रपटातल्या निसर्गदृश्यात–विशेषत अखेरच्या, वाळवटातल्या दृश्यात–त्यानी उतरवला आहे ही दृश्य गाढ निद्रेतल्या स्वप्नात जाग यावी तशी झपाटून टाकणारी आहेत याना ' कॉंट्रास्ट ' म्हणूनच की काय, परिणाम वाढविण्यासाठी आरंभी एकाहूनएक रुक्ष दृश्याची लावलचक चळत त्यानी रचली आहे, रेल्वे रूळ, धूळभरले रस्ते, विटका निसर्ग, मदगती प्रवास असा वैताग आणणारा सारा माल-मसाला ठासून त्यानी भुवन सोमसाहेबाच्या मन स्थितीत शहरातल्या तमाम प्रेक्षक-साहेबाला आरभी आणले आहे आणि मग एका सुरेख भावकथेच्या तुडुब, निळ्या-शार सरोवरात त्याला मनसोक्त–तरीही नाकातोडात पाणी जाईस्तोवर नव्हे–डुबवले आहे चित्रपट सपतो तोही भुवन सोमची मन स्थिती प्रेक्षकाची करून

मृणाल सेनने हा सारा परिपूर्ण अनुभव सवेदनाक्षमपणे पडद्यावर माडताना सोयीने कधी सोमसाहेबाच्या नजरेनेही तो पाहिला आहे. उदाहरणार्थ सोम–गोरी अशा दोघाच्याच प्रसगात कॅमेरा अभावितपणे सोमसाहेब बनतो आणि ज्यात गोरी नावाचे एक स्वप्निल व्यक्तिमत्त्व मध्यभागी आहे असा अशरीरी अनुभव सोम-साहेबाला जाणवतील त्या सवेदनासकट पहातो. गोरीच्या खेड्याजवळच्या एका पुरातन पडीक राजवाड्यात दोघे जातात आणि गोरी त्या राजवाड्यातल्या राजा-राणीची दतकथा रंगून सागू लागते तेव्हा अभावितपणे कॅमेरा सोमसाहेब बनतो, अनिमिषपणे गोरीला न्याहाळीत रहातो गोरी पहाता पहाता राणी बनते, झुल्यावर झुलते आणि तरीही ती गोरीच असते आणि खिडकीशी उभीच असते आणि कॅमेरा झुल्यासारखे तिच्या दिशेने आणि तिच्यापासून दूर झोके घेत रहातो; सोमसाहेब आणि गोरी दतकथेतला तो क्षणच जणू आळीपाळीने एकदा प्रेक्षकाच्या खूप जवळ येतो, प्रेक्षकाला भिडतो आणि लगेच लाव जाऊन उभा रहातो. वाळवटातली पक्ष्याची शिकार तर सोमसाहेबाला एक स्वप्न पडावे तशी चित्रित केली आहे गोरी–सोमसाहेब प्रसगामध्ये फिरता कॅमेरा मध्येच खिळून गोरीला एकटक पहात रहातो–जशी दिसत असेल तशी–अगदी अर्धीमुर्धीदेखील–सोमसाहेब त्या क्षणी पहात असेल तसा

मात्र गोरीच्या नजरेतून हा अनुभव किंवा यातील क्षण पाहण्याचे सेन यानी कटाक्षाने टाळलेले दिसते गोरी हे या अनुभवातले विलक्षण तरल, कधी पारदर्शक तर केव्हा गूढ, केव्हा स्फटिकासारखे स्वच्छ तर केव्हा धुक्यात वेढल्यासारखे धूसर

असे व्यक्तिमत्त्व आहे. ते या जगातले, काठियावाडच्या मातीत मळून उजळलेले आहे तसेच त्या मातीपलीकडचे आणि या जगापलीकडचेही, अतिशय अकलंकित असे आहे मृणाल सेननी या अनुभवाचे हे फार महत्त्वाचे अंग कमालीच्या समजुतीने आणि कौशल्याने जपले जोपासले आहे; एरवी हा चित्रपट इतका मोहक ठरलाच नसता. त्यानी या भूमिकेसाठी निवड केली तीही यापूर्वी रुपेरी पडद्यावर न आलेल्या मुग्धा सुहासिनी मुळेची. पडद्यावर आल्याक्षणापासून ती 'गोरी'च होते. अखेरपर्यंत फक्त 'गोरी'च रहाते. विलक्षण सरळ साधी, फार फार नैसर्गिक आणि यामुळेच मनस्वी मोहक.

या उलट भुवन सोमसाहेब या भूमिकेत दर्दी बंगाली नट उत्पल दत्त यानी या भूमिकेला आवश्यक तो सारा वातडपणा, दर्प, बेढबपणा ओतप्रोत आणला आहे. या सोमसाहेबाच्या भावनाही त्याच्या मुद्रेवर नीट प्रकट होऊ शकत नाहीत इतका त्याचा कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याचा मुखवटा जाड आणि घट्ट आहे. उत्पल दत्तने तो चांगला साकार केला आहे फजितीच्या आणि दयनीय अवस्थेत त्याचा भुवन सोम खूप करमणूक करतो.

बाकी भूमिकाना महत्त्व नाही. आणि तरीही त्या अस्सल वाटतात. काठियावाडची पार्श्वभूमी त्या जिवंत करतात.

'भुवन सोम'ची ही कथा अस्सल प्रायोगिक चित्रपटात अपेक्षिले जाते तसे 'आज'च्या संदर्भात काही देऊन जाते काय? शेवटची दोन मिनिटे वगळता तिचे स्वरूप साधारणतः कोणत्याही काळात-बसणारे आहे. या स्वरूपातही, गोळी न लागता केवळ घाबरून खाली पडणाऱ्या पक्ष्याचे आणि शिकारीच्या महत्त्वाकांक्षेने जिवापाड तडमडून, अखेर गोळी न लागता असे घाबरून खाली पडलेल्या पक्ष्यालाच घेऊन नामुष्कीने परतणाऱ्या 'कर्तुमकर्तुम्' शिकाऱ्याचे, ही दोन्ही प्रतीके 'आज'ची आहेत. अशी शिकार, असा शिकारी आणि हे पोटात साचलेले मनस्वी भय — कशाचेही — हे सर्व 'आज'चे आहे, आजच्या काळाला स्पर्श करणारे आहे असे वाटते तिकिटबाबू सोमसाहेबाला मनस्वी घाबरून आहे, कोणीतरी तिकिटबाबूलाही घाबरून आहे सोमसाहेब भल्या दांडग्या पण निरुपद्रवी रेड्याला घाबरून आहे — हे भय असे परस्परावलंबी आहे सर्वव्यापी आहे. ते स्पर्श करू शकत नाही गोरीला; कारण ती नैसर्गिक, निष्पाप, निरागस आहे या भयाला, भयानेच गळून खाली पडणाऱ्या आणि नंतर चित्रपटाच्या अखेरच्या काही भागापूर्वीपर्यंत प्रत्येक दृश्यात असणाऱ्या, उड न शकणाऱ्या सारसपक्षाच्या रूपाने जणू एक प्रतीक मिळाले आहे.

अखेरच्या निसटत्या प्रसंगात तर हा चित्रपट सर्वार्थाने 'आज'चा ठरतो. सोमसाहेब गोरीलाच तो घाबरलेला पक्षी परत करून, तिचा निरोप घेऊन शहरात येतो आणि गोरीला तिच्या पतीचे पत्र येते हे पत्र असे आनंदवर्तमान सांगते की तिच्या पतीची पैसे खाण्याबद्दल चौकशी करून त्याला बडतर्फ नाहीतर सस्पेण्ड करण्यासाठी आलेल्या सोमसाहेबाने उलट त्याला मोठ्या स्टेशनवर बढती दिली

पृष्ठ ६४ वर

# मंत्री आणि स्मगलर्स

मध्यम आकाराची एक जुनाट खोली. उंच, जळमटे चिकटलेले छत, खालवर आलेले उदासपणे फेऱ्या मारणारे तीन धुरकट पंखे काळे डगले घातलेले घामट चेहऱ्याचे वकील, उच्चासनावर गंभीर मुद्रेने बसलेले न्यायमूर्ती—साक्षीदाराच्या पिंजऱ्यात पांढरा झब्बा पैजामा घातलेली एक फाटक्या अंगाची व्यक्ती. बाजूच्या एका बाकड्यावर मरगळलेल्या चेहऱ्याचे आरोपी. बघ्याची दाटीवाटीने गर्दी—

अगदीच नाट्यविहीन दृश्य. पांच मिनिटे तुम्ही उभे राहिलात तर दोन जांभया देऊन निघून जाल. साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभा असलेला तो गृहस्थ म्हणजे मुंबईत दिवसा ढवळ्या ज्याच्यावर पिस्तुलाची गोळी झाडण्याचा प्रयत्न झाला तो युसूफ पटेल असेल याची तुम्हाला शंकाही येणार नाही. आणि बाजूच्या बाकड्यावर बसलेल्यामध्ये तोच कुप्रसिद्ध स्मगलर—हाजी मस्तान मिर्झा—हा आहे हे कुणी सांगितल्याशिवाय कळणार नाही. अगदीच नाट्यविहीन.

पण केवळ वरवर न पाहता जरा खोलात शिरले तर नाट्य कळेल. हाजी मस्तान मिर्झा, कमल चढ्ढा, नैनमल पुंजाजी शाह आदी मंडळीची नावे तुम्ही ऐकली असतीलच. भारतातील कुविख्यात स्मगलर्समध्ये याची नावे प्रामुख्याने घेतली जातात. रहस्यमय कादंबऱ्यांना लाजवितील अशा यांच्या कथा आहेत. सध्या या मंडळीवर मुंबईच्या कोर्टात खटले चालू आहेत. नैनमल पुंजाजी शाहवर शेकडो कोटी रुपयाच्या स्मगलींगमध्ये हात असल्याबद्दल, मस्तान आणि कमल यांच्यावरही अशाच एका प्रकरणात खटला चालू आहे. मस्तानवर आणखी एक खटला चालू आहे तो म्हणजे युसूफ पटेल नावाच्या एका इसमाने दगलबाजी केली म्हणून त्याला आपल्या मारेकऱ्याकरवी गोळी घालून ठार मारण्याचा कट केल्याचा आरोप. युसूफ पटेल या हल्ल्यातून वाचला आहे.

ही मुंबईतील नावे फक्त उदाहरणादाखल दिली. आज मुंबईत आणि भारतात सगळ्यात मोठा धंदा कोणता असेल तर तो स्मगलिंगचा. बाहेरच्या जगात या धंद्याची कल्पना नसते. कारण हा धंदा भूमिगत आहे. अधूनमधून वृत्तपत्रातून बातम्या येतात—अमुक खाडीत भर पावसामध्ये छापा घालून कस्टम्स् अधिकाऱ्यांनी

चार–पाच लाखाचे चोरटे सोने पकडले. गुन्हेगार मात्र पावसाचा, अंधाराचा फायदा घेऊन पोलिसाच्या हातून निसटले – वगरे – •

समुद्रावर तरंगणाऱ्या हिमखडांचा फक्त एक अष्टांश भाग पृष्ठभागावर दिसतो बाकीचा भाग पाण्याखाली अदृश्य असतो. तसे या स्मगलिंगच्या धंद्याचे आहे. जाणकारांच्या मते देशात येणाऱ्या चोरट्या सोन्यापैकी किंवा मालापैकी पाच टक्के सोने कस्टम्स्–पोलिसाकरवी पकडले जाते. बाकीचा माल धंद्यात जातो.

भारतात स्मगलिंगच्या धद्याचा व्याप किती ? जाणकाराच्या मते या धद्यात वर्षाला सुमारे दोन हजार कोटी रुपयाची उलाढाल होते ! भारताचे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे तीन हजार कोटी रुपयाच्या आसपास असते !! यावरून या धद्याच्या स्वरूपाची कल्पना येईल.

इतका प्रचड पैसा हाती येत असल्याने स्मगलिंगच्या धद्यातले लोक एकदम कोटयाधीशच बनतात. पैशाच्या जोरावर ते काहीही करू शकतात. या स्मगलर्सनी आपल्या एजटाचे जाळे भारतात सर्वदूर, सर्व क्षेत्रात पसरविलेले आहे. स्मगलर्सचे वेगळेच असे भूमिगत राज्य आहे. स्वत.चे खबरे असतात, त्याचे स्वतःचे गुप्तहेर असतात, 'पोलीस' असतात, तुरुग असतात. पद्धतशीरपणे त्याचे काम चालते. एखादा माणूस त्याच्या चक्रात अडकला की सुटू शकत नाही. त्याला त्याच्यातच रहावे लागते. एखाद्याने चुकून दगलबाजी करण्याचा प्रयत्न केला तर त्याचा पद्धतशीरपणे काटा काढण्यात येतो.

एवढा प्रचड पैसा या धद्यात येत असताना केवळ हाताच्या बोटावर मोजता येण्याएवढेच लोक या धद्यात असतील ? मुळीच नाही. राजकारणी, मुख्यमत्री, मत्री, उपमत्री, केद्रमत्री, पोलीस, समाजातले उच्चभ्रू लोक सारे सारे या धद्यात हात धुऊन घेतात. सयुक्त समाजवादी पक्षाचे खासदार श्री. जॉर्ज फर्नांडीस म्हणतात, त्याच्याजवळ भरपूर पुरावा आहे. कोणकोण मत्री स्मगलर्सशी सबधीत आहेत हे सिद्ध करणारी कागदपत्रे आहेत. त्यानी अनेक केद्रीय मत्र्याना, प्रधान-मत्र्याना यासबधी लिहिले आहे, पण उपयोग नाही.

स्मगलर्सचे सबंध कुठवर पोचू शकतात आणि त्याचे आयुष्य कसे असते याचे उत्तम उदाहरण म्हणजे हाजी मस्तान मिर्झा. दहा वर्षापूर्वी मस्तान म्हणे मुबईतल्या गोदीमध्ये एक साधा लाल डगलेवाला हमाल होता. दिवसाला केवळ आठ–दहा आणे हाती पडत होते. पोटाचा खळगा भरण्याचीही चिंता होती. दोन वर्षापूर्वी याच मस्तानने मुंबईचे सुप्रसिद्ध "बॉंबे गॅरेज" युसूफ पटेलच्या पार्टनरशिपमध्ये सुमारे ८५ लाख रुपयाना विकत घेतले !

जून १९६९ मध्ये मस्तानला अटक झाली. त्यापूर्वी हा मस्तान उघड सांगत होता– अमुक केंद्रीय मत्री आपला पक्का दोस्त आहे, तमुक मत्री तर आपल्या खिशातलाच. या मत्र्याना तर आपणच बनविले वगैरे. आणि बऱ्याचशा गोष्टी

तो या मंत्र्यांकडून करवूनही घेत होता म्हणे. मस्तानच्या घरी एक फोन होता. पण त्याला आणखी एक फोन हवा होता. स्मगलिंगचे अॅडमिनिस्ट्रेटिव्ह वर्क काय कमी असते ? त्याला एक फोन कसा पुरणार ? तुम्हा आम्हाला फोन हवा असेल तर वर्ष वर्ष वाट बघावी लागते. पण मस्तान तुमच्या आमच्यासारखा सामान्य आसामी थोडाच होता ? तो होता व्ही. आर. पी. अर्ज केल्याच्या एक महिन्याच्या आत त्याच्या घरी फोन हजर. ही किमया कशी झाली ?

"मस्तानला मी बऱ्याच वर्षांपासून एक चांगला सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळखतो. तो कॉंग्रेस कार्यकर्ता आहे. त्याच्या घरी फोन असणे हे समाजकार्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे –" मुंबईच्या एका बड्या कॉंग्रेस नेत्याचे टेलिफोन खात्याला शिफारस पत्र –

अशाच तऱ्हेचे मस्तानचे गुणवर्णन करणारे त्याच्याशी घनिष्ठ संबंध सांगणारे महाराष्ट्राच्या एका मंत्र्याचे शिफारस पत्र.

क्षयरोग्यांना मदत करणाऱ्या एका संस्थेच्या अधिकाऱ्याचे शिफारस पत्र–"मस्तान आमच्या संस्थेचा महत्त्वाचा कार्यकर्ता आहे. त्याच्या कार्यासाठी फोन अत्यावश्यक–"

आणखी एका आमदाराचे पत्र–"मस्तानचे अनेक शैक्षणिक संस्थांशी घनिष्ठ संबंध आहेत. फोन अत्यावश्यक–"

आणखी अशाच बड्या लोकांच्या पत्राची चळत. शेवटी एका वॉर्ड कॉंग्रेस अध्यक्षाचे पत्र–"मस्तान कॉंग्रेसचा क्रियाशील सभासद आहे. त्याच्या कामासाठी फोन अगदी अत्यावश्यक आहे."

या पत्रांवरून काय कल्पना होते ? मस्तान म्हणजे एक उद्योगी समाज कार्यकर्ता, शैक्षणिक कार्यकर्ता, क्षयरोग्याची आस्था असणारा महान् मानवतावादी–आणखी काही बाही.

एवढ्या शिफारस पत्रांची चळत आल्यावर काय बिशाद आहे टेलिफोन अॅडव्हायसरी कमिटीची मस्तानला टेलिफोन नाकारण्याची !

१९६४-६५ मध्ये किंवा त्याच सुमारास मस्तानला पासपोर्ट हवा होता. पण तो नाकारण्यात आला. लगेच त्यावेळचे गुजरातचे गव्हर्नर श्री. नित्यानंद कानुंगो याचे शिफारस पत्र–"मी मस्तानला ओळखतो. एडनला त्याचे नातेवाईक आहेत. त्याना भेटण्यासाठी त्याला पासपोर्ट मिळणे आवश्यक आहे. वगैरे–" पासपोर्ट तयार.

मस्तानला अटक झाल्यावर श्री. जार्ज फर्नांडिस यांनी श्री. कानुंगो यांना पत्र लिहिले आणि मस्तानसारख्या माणसाला पासपोर्ट मिळवून देण्यासाठी शिफारस केली म्हणून आश्चर्य व्यक्त केले. श्री. कानुंगो याचे उलट टपाली उत्तर–मी मस्तानला जाणत नाही. मी स्वतः असे शिफारस पत्र तर त्याला कधीच दिले नाही. त्याच्या जवळचे पत्र बनावट असले पाहिजे–!

मस्तानजवळ अजूनही तो पासपोर्ट आहे. तो रद्द झालेला नाही.

मस्तानला अटक होऊन एक वर्ष झाले. पण इतके दिवस तो पोलिस कोठडीत होता ? छे: ! तो होता मुंबईच्या सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये. बादशाही इतमामात. एक वर्षापैकी अवघे पंधरा दिवसही तो पोलिस कोठडीत नव्हता म्हणे. इतके दिवस मस्तान आजारी होता ? कुणास ठाऊक. पण ज्या अर्थी तो हॉस्पिटलात "ट्रीटमेंट" खाली होता त्याअर्थी त्याला बरे नसलेच पाहिजे. त्याशिवाय त्याला "सिक" सर्टिफिकेट डॉक्टरांकडून कसे मिळेल बरे ? श्री. फर्नांडिस वाटेल तसे आरोप करतात. त्याच्या सर्वच आरोपांवर विश्वास ठेवायला नको. ते म्हणतात, मस्तानने सर्वना भरपूर लाच चारली आहे म्हणून तो एवढ्या ऐषारामात राहू शकतो. हॉस्पिटलात तो मागेल ती वस्तू त्याला मिळते म्हणे. इंपोर्टेड दारू, सिगरेट्स् आणि बायाही—काही अंमली द्रव्येही. आता या गोष्टी काय सरकारला आणि मुख्यमंत्र्यांना माहीत नसतील ? तेव्हा या सर्वच आरोपात तथ्य असणे कठीण. पण एका गोष्टीची सरकारनेच महाराष्ट्र विधानसभेत कबुली दिली आहे. एक वर्षाच्या त्याच्या अटकेच्या काळात मस्तान फारच थोडे दिवस पोलीस कोठडीत होता. बहुतेक काळ त्याने हॉस्पिटलातच घालवला.

असो. तर असे हे मस्तान प्रकरण. फारच थोड्या गोष्टी बाहेर आल्या आहेत. सर्वच येतील की नाही हे सागता येत नाही. कारण कुणास ठाऊक कुणाकुणाचे हात यात गुंतलेले आहेत.

नैतमल पुंजाजी शाह याचेही प्रकरण असेच. १५ लाख रुपयांचा जामीन कधी ऐकला आहे ? नैतमल तो भरून सध्या मोकळा आहे. प्रथम त्याला जामीनावर सोडायला पोलीसांची तयारी नव्हती. कारण तो म्हणे इतर साक्षीदारांना धमक्या देईल अणि चौकशीमध्ये अडथळे आणील, त्याचे हात वरपर्यंत पोचले आहेत. नैतमलने सुप्रीम कोर्टापर्यंत जामीनाचा वाद लढविला. चौकशी पूर्ण झाल्यावरच त्याला जामीन मिळाला.

या नैतमलची म्हणे राजस्थानच्या मुख्यमंत्र्याशी घनिष्ठ मैत्री. राजस्थानच्या दुष्काळनिधीला याने एक रकमी २५ लाख रुपयाची मदत केली. (हे पैसे कुठून आले ?) पोलिसांनी काळबादेवीच्या त्याच्या खोलीवर धाड घातली तेव्हा त्याच्या एका वहीत केवळ सहा महिन्यात १०० कोटी रुपयांच्या वर सोने, चांदी, करन्सी यांचा चोरटा व्यवहार केल्याची नोद होती म्हणे. आता कोर्टात केस चालू आहे.

स्मगलिंगचा धदा हा असा आहे. रहस्यमय, धाडसी, अमाप पैसा मिळवून देणारा. लफडेबाज पैसा आला की सत्ता आली. या लोकाचे देशोदेशी कॉंट्रॅक्ट्स्. सात समुद्रावर यांच्या लॉंचिस आणि याचे एजट्स् फिरतात. याची विमाने देशोदेशी जातात. देशोदेशीच्या व्यवहारामध्ये यांचे हात. ठिकठिकाणी नाईट क्लबस्, कॅबेरे, रेस्टॉं यांच्या मालकीचे. अमाप पैसा, अमाप चैन आणि अमाप धोका.

[ पृष्ठ ५४ वर ]

## मुक्ताफळे

ग्यानबा

### □ आजीच्या जवळी घड्याळ कसले आहे चमत्कारिक ?

इंदिरा गांधी या आजीबाई झाल्याचे वृत्त सगळयांनी वाचले आहे. त्यांचे आता वय झाले आहे — ' दारिद्र्य हटाव ' ' संघ हटाव ' अशा ठरावरूपाच्या ठराविक वाती वळण्यापलीकडे त्यांच्या हातून फारसे काही होणार नाही, असा संशय तरुण तुर्क मंडळीना खूप दिवसापासून आलेला होताच. आता इंदिराजींना चक्क नातूच झाल्यामुळे, तरुण तुर्कांच्या हातात इंदिरानेतृत्व म्हातारे झाल्याचा पुरावा आला आहे. परंतु सोनिया-पुत्राच्या जन्मोत्सवावर पाणी ओतणारी बातमी, काही नत-द्रष्ट मंडळीनी देशभर पसरवली आहे, याला काय म्हणावे ? या लोकांचे म्हणणे — इंदिरागांधीनी एका तीन तोडाच्या राक्षसाला जन्म दिला असून, या राक्षसाचा वध केल्याखेरीज आता या देशात कुणाला सुखाने रहाता येणार नाही.

हा राक्षस, इंदिराकाँग्रेस धरून तीन तोंडांचा आहे. याची इतर दोन तोंडे म्हणजे मुस्लीम लीग व कम्युनिस्ट.

आम्हाला या मंडळीची कीव येते !

मुसलमान आणि साम्यवादी हे इंदिरा आधाराने एकत्र नांदू शकतील, असे भासवण्याचा हा प्रयत्न बालिश आहे. आसपास काय घडते आहे हे मुसलमानांना कळत नाही की काय ?

माओने — अर्थात दुष्ट माओने, सिंकियाग प्रांताचा १९४९ साली कबजा केला. मुसलमान आक्रमकांनी केव्हातरी बळकावून मुसलमानांची बहुसंख्या केलेला तुर्क-स्थानचा हा पूर्वभाग, चिनी प्रदेश आहे, असे माओचे म्हणणे. ' आमचा प्रदेश आम्ही पुनः घेतला ' असे चिनी कम्युनिस्टानी जाहीर केले. वस्तुतः इतिहासात इतके मागे जायचे माओला काहीही कारण नव्हते ! परंतु हातात बंदूक घेऊन त्याने हे केल्याने बिचारे मुसलमान गप्प बसले. चिनी येण्यापूर्वी तेथील मुसलमान राजवटीचे सेक्रेटरी जनरल युसुफ अलपत्कीन हे चिनी येताच तिथून पळाले व तुर्कस्थानात त्यांनी आश्रय घेतला.

इकडे माओने तुर्कस्थानचे प्रथम चिनीकरण करून त्याचे सिंकियांग केले — आणि मग सिंकियांगमधील मुसलमानावर चिनीकरणाचा प्रयोग सुरू केला.

मुसलमानांना समजाऊन सांगण्याकरता माओची माणसे आली—

'हे बघा मंडळी, तुम्ही कुराण वाचा. मशिदीत जा. दंगाधोपा न करता सामान्य चिनी नागरिकाप्रमाणे रहा. परंतु आता इथे चार बायका करता येणार नाहीत. बौद्ध धर्मीय, गरीब चिनी शेतकऱ्यांच्या मुली पळवून त्यांच्याशी जबरदस्तीने निके लावून, संख्या वाढवू म्हणाल, तर आता ते जमायचे नाही. तुमचा अल्ला तुमच्या घरात! बाहेर कम्युनिस्टांचे राज्य राहील! सगळयांना आता एकच सिव्हिल कोड राहील. उर्दू शिकायचे असले तर शिका, परंतु चिनी भाषा शिकावीच लागेल. 'तुर्कस्थान झिंदाबाद' असले काही कुणी बोललात तर गोळया घालू! याद राखा!! मंगोली, मांचू, थी, मिओ या सगळयांचे जसे चिनीकरण होणार आहे तसेच तुमचेही होईल.'

माओ मंडळीचे हे सांगणे मुसलमानांनी काय म्हणून ऐकावे? त्यांच्या मुल्ला मौलवींनी त्यांना चोख सांगितले—'आपण मुसलमान निराळे आहोत. कुराणाचाच कायदा आपण मानायचा. चार बायका करायचा अधिकार मुळीच सोडायचा नाही. बायकांचा गोषा मुळीच काढायचा नाही.'

परवा पुण्याला मुस्लिम सत्यशोधक समाजाच्या श्री. हमीद दलवाई यांना इंदिरा काँग्रेस कार्पोरेटर अहमदखान यांनी जसे पिटाळून लावले, त्याचप्रमाणे सिकियांग मधील मुसलमानानी केले असते हो, परंतु माओच्या माणसांच्या हातात बंदुका असल्याने बिचारे तेव्हा गप्प बसले. हळू हळू मात्र त्यांनी माओ राजवटीला 'इंगा' दाखवायला सुरुवात केली.

वस्तुतः माओ हा इंदिरा काँग्रेसवाल्यांसारखा समंजस राज्यकर्ता असता, तर म्हणाला असता,—Common civil code is a controversial issue. Do not mix it up with communalism!' विचारा पाहिजे तर यशवंतरावांना! सगळयांना एकच 'कोड' लावण्याचा कोडगेपणा इंदिरा काँग्रेसवाले कधीच करणार नाहीत. दुष्ट माओने मात्र नको ते केले. दंगलखोरांना पकडून गोळया घातल्या. बंदुकीच्या आवाजाला कुणीही भिणारच हो! पळाले—चिनी मुसलमान सिकियांग सोडून पळू लागले. किती पळाले? लाखावारी पळाले! लाखावारीची माओने कत्तल केली!!

ही थाप नाही बरं का...तुर्कस्थानात १९४९ साली पळालेले युसुफमियाँ आता नुकतेच श्रीनगरला येऊन गेले. सिकियांगहून पळालेले शंभर मुसलमान श्रीनगरला आलेले आहेत, त्यांना भेटण्यासाठी युसुफमियाँ आले होते. त्यांनीच पत्रकारांना सांगितले—

"माओने लाखो मुसलमानांची कत्तल उडवली. मुसलमान तिथून परागंदा होताच चार लाख चिन्यांनी आपली घरेदारे सिकियागमध्ये थाटली आहेत."

पळालेल्यांपैकी फक्त शंभरच मुसलमान इथे का आले याचे आम्हास आश्चर्य

वाटते. पाकिस्तानात हे मुसलमान जाणार नाहीत, कारण तिथे जन. याह्याखानाचे राज्य असले, तरी देखिल तिथे चार बायका करायला कायद्याने बंदी आहे. भारतात या मडळीना कसलीच अडचण नाही. इथे त्याच्यावर बधन एकच राहील की दर पाच वर्षांनी त्यानी न चुकता काँग्रेसवाल्याना मते द्यायची. युसुफमियाँ देखिल इथेच राहिले तर चार लाख मताच्या बदल्यात फक्रुमियाँसारखे ते मत्री देखिल होतील. असो. अल्ला करो आणि हे सर्व तुर्कस्थानी मुसलमान बधू भारतात येवोत.

हो ! गोष्ट सपली पण मुद्दा सागायचा राहिला. कम्युनिस्ट राजवटीत मुसलमानाचे नेमके काय होते हे ठाऊक असल्याने, भारतात मुसलमान हे कम्युनिस्टाच्या फारसे जवळ जातील कसे ? बाईंचा आधार काय – आज आहे उद्या नाही. केरळात कम्युनिस्टानी मुसलमानाना ठोकायला सुरुवातदेखिल केली आहे. पेपर वाचा.

म्हणून ज्या कुणी मंडळीनी इदिरा काँग्रेस, धर्मनिष्ठ मुसलमान व साम्यवादी या तीन तोंडी राक्षसाची कथा प्रसृत केली आहे, त्यांना एकतर साम्यवादी कळला नाही, किंवा सनातनी मुसलमान तरी कळला नाही. आणि समजा हे दोघे कळले असले तर इदिरा गाधी कळल्या नाहीत. वेळच्या वेळी, किंवा वेळोवेळी काय करावे हे आजीबाईंना चागले समजते बरे बाळानो !

आजीच्या जवळी घड्याळ कसले आहे चमत्कारिक ?
देई ठेऊनि ते कुठे अजुनि हे नाही कुणा ठाउक...

तेव्हा बच्चे लोक – तुम खाली ताली बजावं !

## □ गर्जेल 'तोच' पडेल काय ?

गर्जेल तो पडेल काय ? असे आकाशाकडे तोड करून पावसाळ्यात शेतकरी विचारतात. गरजणारा मेघ पडत नाही. नुसताच डोक्यावरून निघून जातो. परतु गर्दी करून गरजणारा मेघ पडला नाही तरी लोकशाहीत गर्दी करून गरजणारे, अनेक वेळा 'पडतात' असे दिसते. गुजराथ जनसंघाचे चिटणीस श्री. वसत गजेंद्रगडकर हे गरजू लागले आहेत ! 'आगामी सार्वत्रिक निवडणुकीत जनसघ गुजराथ विधान सभेच्या सर्व १६८ जागा व लोकसभेच्या सर्व २४ जागा लढवील' अशी गर्जना त्यानी नुकतीच केली. इतिहास काय सागतो ? १९६७ च्या निवडणुकीत श्री. गडगडाटकर याच्या पक्षाने १७ जागा लढवल्या...आणि १ जिंकली ! 'आय ॲम सेव्हन्टीन–गोंअिग ऑन ॲटीन' असे एखादी छबकडी म्हणू लागली, तर कानाला आणि डोळ्याना मोठा आनद होतो. परंतु १७ वरून एकदम १६८ !

श्री. गडगडाटकर यांची ही ' तबकडी ' आता पुन्हा पुन्हा वाजणार आहे, यामुळे माणसे अनुभवाने शहाणी होतातच असे म्हणणे धाडसाचे झाले आहे. कम्युनिस्ट थोडे असून सर्वत्र आहेत असे वाटते आणि जनसघवाले सर्वत्र असून कुठेच जाणवत नाहीत याचे रहस्य वसतरावाना माहीत आहे काय ? वसंत ऋतूत कलकलाट करणारे जाणवत नाहीत...परतु आम्रवृक्षात लपलेली न दिसणारी कोकिळा जाणवते, याचे रहस्य वसतराव तुम्हाला माहीत आहे काय ? माणसे ही सरळसोट कुतुवमिनार नसतात...माणसे ही ' पिसाच्या कलत्या मनोऱ्यासारखी ' असतात. कललेली माणसे उकलावी लागतात. उकललेली ढकलावी लागतात. ढकललेली उचलावी लागतात. उचललेली पचवावी लागतात. माणसाचे पक्ष असे वाढतात... गडगडाटकर ! एखादा कललेला मिनू मसानी असेल, त्याला लोकसभेत ढकला. एखादा उकललेला अशोक मेहता असेल, त्याला उचलायला मदत करा. गुजराथमधल्या आपल्या सर्वच पक्षसदस्याना निवडणुकीत तिकिटे देण्याचा आग्रह सोडा बुवा ! लालभाईंचे बाकी काही नका घेऊ, परतु त्याचे तत्र घ्याल की नाही ? रणागणात पडलेली माणसे शौर्य सिद्ध करत असली तरी, निवडणुकीत पडणारी माणसे ही पक्षाचे क्रौर्य सिद्ध करतात. सदुसष्ट साली सोळाच पडले, परंतु बहात्तर साली एकशे पासष्ट पडले...यावरून पक्ष वाढतो आहे असे उद्या प्रसिद्ध झाले, तरी प्रत्यक्षात काहीच ' सिद्ध ' होणार नाही. सकल्प आणि सिद्धी यातले चाणाक्षपणाचे अतर श्री. गडगडाटकर यानी तोडले, तर मग त्याना वेताने गरजायला आमची हरकत नाही ! कारण गुजराथेत स्वतत्र पक्षाला जनसघ ग्रहण लावील आणि निर्जलिंगप्पा पक्षाला इदिरा काँग्रेस कुरतडील असा आमचा तरी तर्क आहे !

□ □ ■


## पुरंदऱ्यांची दौलत

**नऊ पेशवेकालीन कथा**

**ब. मो. पुरंदरे**

**किमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**



# योग्य वेळीच मरण येते तर !

# सुकार्नो

"खरोखर माणसाचं आयुष्य किती विलक्षण असतं ! कोण केव्हा कोठे जाईल काही सांगता येत नाही. आता माझंच पहा ना. मी गरीब आईबापांचा मुलगा. माझे वडील एक शाळामास्तर. त्यांचा पगार होता दरमहा पंचवीस गिल्डर्स म्हणजे तुमचे दहा डॉलर्स. मी एक सामान्य माणसाचा पोर. आयुष्याच्या उमेदीच्या काळातील तेरा वर्ष मी तुरुंगवास भोगला, हद्दपारी सोसली. आज तुम्ही माझा सन्मान करीत आहात. तुम्ही स्वागत करीत आहात ते केवळ सुकार्नो नावाच्या माणसाचं नाही. तुम्ही आदरसत्कार करीत आहात तो इंडोनेशियाच्या गणराज्याच्या अध्यक्षाचा !" १९५६ साली सुकार्नोनी अमेरिकेला पहिल्यांदा भेट दिली तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी जमलेल्या लोकांसमोर भाषण करताना आपण कोठून कोठे पोचलो आहोत याची भावनाप्रधान सुकार्नोंना आठवण झाली आणि ती बोलून

य. दि. फडके

दाखवल्याशिवाय त्याना राहावले नाही. त्यावेळच्या त्याच्या बोलण्यात आपल्या कर्तृत्वाचा अभिमान ओसंडत होता. आग्नेय आशियातल्या सर्वात मोठ्या आणि लोकसख्येच्या दृष्टीने जगात पाचव्या क्रमाकाला असलेल्या इडोनेशियासारख्या देशातील सर्वोच्च अधिकारपद वर्षानुवर्षे भोगणाऱ्या सुकार्नोनी आपल्या सत्तेचा दिमाख दाखवावा, कर्तबगारीविषयी जाहीरपणे प्रौढी मिरवावी असाच तो काळ होता. पण काही राजकीय नेते जसे योग्य वेळी मरण पावल्यामुळे भाग्यवान ठरतात तसे भाग्य सुकार्नोच्या वाट्याला आले नाही. सत्तेच्या व लौकिकाच्या ऐन शिखरावर असताना कर्तृत्ववान नेत्याला मरण आले तर त्याचे मोठेपण योग्य वेळी आलेल्या मरणामुळे उजळून निघते. सुकार्नोच्या ऐन चलतीच्या काळात त्याना ठार मारण्याचे प्रयत्न पाच सहा वेळा होऊनही सुकार्नो मारेकऱ्याच्या प्राणघातक हल्ल्यातून बचावले होते. अल्लाची आपल्यावर मेहेरनजर आहे असा त्यानी त्याचा अर्थ घेतला. त्याच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यानी तो त्याच्या लाखो श्रोत्याना समजावून सागितला. आपण जे सर्वोच्च अधिकारपद भोगीत आहोत ते तहहयात आपल्याला भोगता यावे यासाठी सुकार्नोनी तसा कायदा करून घेतला. त्याच्या गणवेशावर जशी पदके लावलेली असत त्याचप्रमाणे त्याच्या नावामागे त्यानी चित्रविचित्र पदव्याची माळ लावून घेतली–' क्रातीचा महान नेता ', ' इडोनेशियाच्या जनतेचा प्रवक्ता ', ' इडोनेशियातील जनतेला दु.ख सोसण्याचा व कष्ट करण्याचा सदेश देणारा, राष्ट्राध्यक्ष, ' पतप्रधान ', ' सेनादलाचा सरसेनापती वगैरे वगैरे.

खरे म्हणजे सुकार्नो त्यावेळी मरावयास हवे होते पण तसे झाले नाही. दुर्दैवाचे दशावतार पाहण्याचे त्याच्या नशिबी होते ज्या देशावर त्यानी जवळजवळ वीस वर्षे हुकमत गाजवली त्या देशातच लष्करातल्या सहा वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांचा खून करण्याच्या, कम्युनिस्टाच्या प्रेरणेने झालेल्या कटाला सुकार्नोचा पाठिबा होता असे म्हणून लष्करी अधिकाऱ्यानी त्याना काही काळ नामधारी राज्यप्रमुख बनविले. कडव्या व धर्मवेड्या मुसलमानाच्या पाठिब्याने कम्युनिस्टविरोधक विद्यार्थ्यांनी इडोनेशियाच्या या राष्ट्रपित्याची देशद्रोहाच्या आरोपावरून चौकशी व्हावी व रीतसर खटला भरून त्याला सजा व्हावी अशी मागणी केली. त्यासाठी जाकर्ताच्या रस्त्यारस्त्यात शाळकरी पोरानी देखील उग्र निदर्शने केली. पण सुकार्नोवर खटला भरून त्याना देहान्ताची सजा दिल्यास कदाचित् यादवी युद्ध पेटेल म्हणून जनरल सुहार्तोनी त्याना जिवत ठेवण्याचे ठरवले. मात्र त्याच्या पदव्या एकामागून एक काढून घेण्यात आल्या. सरकारी इमारतीतून लटकणारी त्याची छायाचित्रे अडगळीत फेकून दिली गेली. अध्यक्षपदावरून त्याची हकालपट्टी करण्यात आली आणि त्याना डॉक्टर इजिनीयर सुकार्नो म्हणावे असे फर्मान निघाले. त्याना नजरकैद करण्यात आले. सुकार्नोच्या जनानखान्यात लग्नाच्या व विन लग्नाच्या अनेक बायका होत्या. तातल्या सर्वात लाडक्या बायकोला–रत्नश्रीदेवीला–भेटणेही त्याना

मुश्किल झाले. तिच्यापासून तीन वर्षापूर्वी झालेल्या कार्तिका या कन्येचा चेहरा त्याना पहिल्यादा पाहता आला तोही मृत्युशय्येवर अखेरचे क्षण मोजीत असताना!

फार काळ सत्ता भोगलेली माणसे जेव्हा सत्तेवरून खाली खेचली जातात तेव्हा त्यांची स्थिती फार केविलवाणी बनते. सुगी संपल्यावर पाखरे उडून जावीत तशी त्याच्याभोवती एकेकाळी गराडा घालणारी स्तुतिपाठक माणसे त्याची संगत सोडून उगवत्या सूर्याला अर्घ्य देण्यासाठी निघून जातात. जिवलग मानली गेलेली माणसे टाळू लागतात. सत्तेवर असताना कळत नकळत दुखावली गेलेली व सूड घेण्यासाठी टपलेली असतुष्ट माणसे मग आयुष्य असह्य करून टाकतात. सत्ता गेलेला माणूस टवाळीचा, फार झाल्यास दयेचा विषय बनतो. सुकार्नोचे अलीकडे असेच झाले होते. शरीराने तर ते अलीकडे थकले होतेच पण मनाने देखील ते झपाट्याने खचत गेले असले पाहिजेत. गेली दोन वर्षे बोगोरच्या छोटया घरापुढच्या बागेत हात चोळीत येरझारा घालण्यापलीकडे सुकार्नो दुसरे काही करू शकत नव्हते. त्यावेळीही त्यांच्या मनात हा विचार अनेकदा आला असणार–' माणसाचं आयुष्य किती विलक्षण असत! कोण, केव्हा कोठे जाईल काही सांगता येत नाही...'

मध्ययुगातील एखाद्या एकतत्री सत्ता भोगणाऱ्या सुलतानाची स्वभाववैशिष्टये असलेला क्रांतिकारक असे सुकार्नोचे वर्णन केले जात असे. एखाद्या रगेल व रसिक मोगल बादशहाप्रमाणे सुदर वस्तु आणि सुदर बायका गोळा करण्याचा त्याना सोस होता. कोऱ्या करकरीत मर्सिडीझ गाडयांचा ताफा घेऊन शरीरसरक्षकांच्या लवाजम्यासहित सुकार्नो त्यांच्या ' रात्रीच्या भेटीगाठीसाठी ' निघाले की जाकर्तातले नागरिक तो थाट पाहात राहात. प्रचड आणि भव्य इमारती बाधण्याचे त्याना वेड होते. आशियाई क्रीडास्पर्धेसाठी सोव्हिएत युनियनच्या साहाय्याने त्यानी प्रचंड स्टेडियम बाधून घेतले होते. जाकर्तातल्या या ' बुग कार्नो ' (बधु सुकार्नो) स्टेडियममध्ये एक लाख लोक बसू शकतात. दुसऱ्या महायुद्धात झालेल्या नुकसानीच्या भरपाईदाखल जपानने इंडोनेशियाला दिलेल्या प्रचड रकमेतून आलीशान ' हॉटेल इंडोनेशिया ' उभे राहिले. इडोनेशियाच्या स्वातत्र्याची स्मृती म्हणून शंभर किलोमीटर अंतरावरूनही दिसू शकेल असे भव्य स्मारक बाधण्याचा सुकार्नोचा प्रयत्न हादेखील बांधकामवेड्या शहाजहान बादशहाची आठवण करून देणारा होता. जगातली एक अत्यत मोठी मशिद बांधण्याचे डोळे दिपवणारे कामही सुकार्नोनी हाती घेतले होते

सुकार्नोना बरीच वर्षे ओळखणारे इंडोनेशियातील एक प्रसिद्ध लेखक तकदीर अलीसजाहबाना यानी सुकार्नोबद्दल लिहिताना एक अतिशय मार्मिक अभिप्राय दिला आहे. जवळजवळ तीन हजार विखुरलेल्या बेटातील विविध भाषी लोकाना

पृष्ठ ५८ वर

# हमीद दलवाईवरील हल्ल्याच्या निमित्ताने

हिदायतखान

सत्यशोधक मंडळाचे प्रवर्तक श्री. हमीद दलवाई यांच्यावर पुण्यात नुकत्याच झालेल्या हल्ल्याचे वृत वाचून वाईट वाटले पण आश्चर्य वाटले नाही: कारण त्यात अनपेक्षित असे काहीच नव्हते. उलट, आश्चर्य वाटले ते त्यानंतरच्या त्याच्या प्रतिक्रियेचेच ! सत्यशोधक मडळावरील हा हल्ला निषेधार्हच. या हल्ल्यासंबंधी वृत्तपत्रानी घाईघाईन मतप्रदर्शन करण्यामागील कारणं प्रत्येक पत्रागणिक वेगळी असू शकतील. परतु खुद्द मडळाच्या कार्यकर्त्यांनी हल्ला का झाला याचा अतर्मुख होऊन काही विचार केला काय ? हल्ल्याची मीमासा करण्याची त्यांनी जी घाई केली ती त्याच्या कार्याच्या दृष्टीने इष्ट म्हणता येईल काय ? हल्ला झाला हे खरे. त्याचा निषेध व्हायला हवा, हेही खरे. परतु मुळात तो का झाला, याचाही विचार व्हायला नको काय ? हमीद दलवाईंसारख्या विचारवंतानी तरी तो करायला नको ? हल्लेखोराना जीनावादी व स्वत'ला गाधीवादी म्हणून संबोधणाऱ्या या सत्यशोधकाला गाधीजीप्रमाणे आत्मपरीक्षण करण्याची गरजही भासू नये, हे आश्चर्यजनकच नव्हे काय ? आता त्यांनीच स्वत:ला गाधीवादी ठरविल्यावर अशा प्रसंगी गांधीजी कसे वागले असते नव्हे, वागले होते, हे पाहणे आले.

नौखाली येथील दगलीच्या सदर्भात ' हरीजन 'च्या १९-१-४७ च्या अंकात ते काय लिहितात पहा–

" ...The reason for the present darkness lies within me...I know positively that ' Ahinsa ' is a perfect instrument. If it is not in my hands, the imperfection was in me. My technique was at fault.. "

एवढंच नव्हे तर स्वत.ची हत्या करणाऱ्याला पण क्षमा करा, असंच शेवटी ते म्हणाल्याचे प्रसिद्ध आहे. या उलट, आमच्या सत्यशोधकांनी काय केले पहा–

हल्ला होताच हो मंडळी स्कूटरवर बसून पुण्यातील वर्तमानपत्रे नि वृत्तवितरण संस्यांना स्वत:च आपल्यावरील हल्ल्याची हकिगत सागत सुटली. एवढंच नव्हे तर

एका वृत्तवितरणसंस्थेनं आधी थोडक्यात दिलेली बातमी बदलायला लावून श्री. दलवाईंनी अधिक तपशीलवार (?) बातमी त्या सस्थेला देण्याविषयी गळ घातली...स्वतःच्या मानेवरील काठीचा वण दाखवून. वर्तमानपत्रवाल्यांची सहानुभूती मिळवली...इत्यादी वृतपत्रक्षेत्रातील व्यक्तीकडून मला मिळालेली ही माहिती जर खरी असेल तर त्याच्यावरील हल्ला हा कितीही निंद्य असला तरी त्यानंतरचे त्यांचे हे वागणे त्याच्यासारख्या समाजकार्यकर्त्याच्या दृष्टीने सयुक्तिक आहे काय? खऱ्या समाजकार्यकर्त्याला आपल्या कार्यात येणाऱ्या अडथळ्यांची अशी जाहीरातबाजी करण्याची गरज काय? आपल्या अशा वागण्यानं अंगीकृत कार्यावर काय परिणाम होईल, याचा विवेक सुटून कसे चालेल? त्यांनी सुरू केलेल्या मोहिमेचे हारतुऱ्यानी स्वागत होईल, अशी का त्यांची अपेक्षा होती? मुस्लीम समाजाचा त्याचा व्यासग इतका दाडगा असूनही मुसलमानाच्या उग्र प्रतिक्रियचीं त्यांना कल्पना असू नये? आणि ती जर असेल, तर अगदी हल्ला झाला तरी त्यानी इतके बिथरून जाण्याचे कारण काय? ते स्वतःच तर म्हणतात ना, की मुस्लीम समाज हा अडाणी आणि मागासलेला आहे. तर मग अशा मागासलेल्या लोकाशी थोडं क्लृप्तीनं वागायला नको? शक्यतो प्रकरण सामोपचारानंच मिटवायला नको? घोरपडे पेठ पोलिस चौकीजवळ पाच-सात मुस्लीम तरुण व एक म्हातारे गृहस्थ यांनी झाल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली, असे तेच आपल्या मुलाखतीत ('तरुण भारत' २२-६-७०) म्हणतात. मग तेवढ्यानं त्यांचा राग शात होऊ नये? त्यांनी प्रकरण मिटवू नये? घडल्या प्रकाराला उगाच 'प्रेस्टीज पॉईंट' का बनवावा? हल्लेखोराशी प्रत्यक्ष चार हात केले नाहीत, इतकंच. परंतु वर्तमानपत्रांकडे स्वत.च झाल्या प्रकाराची हकिगत दोनाचे चार करून सांगितली म्हणतात. म्हणजे त्या घटनेचे स्वत च्या प्रसिद्धीसाठी चक्क भांडवल केले, असाच अर्थ होत नाही काय?

टाइम्स ऑफ इडियासह बहुतेक सर्व वृत्तपत्रांनी त्या घटनेला प्रसिद्धी दिली. आपल्या मराठीतील अनेक पत्रानी तर त्यावर स्फुटे नि अग्रलेखही लिहिले. वर्तमानपत्रांना सनसनाटी असे काहीतरी हवेच असते. त्यातून अनेक वर्तमानपत्रांचे या प्रश्नाशी विविध हितसबध गुतलेले. त्याना पूरक वा पोषक असं काहीही या प्रश्नासबधीचं त्यांना सदैव हवंच असत. त्या त्या पत्रांनी या घटनेचा पुरेपूर उपयोग करून घेतला. दलवाईंची कड घेण्याचा, हल्ल्याचा निषेध करण्याचा आव आणून आपापला हेतू साधून घेतला.

पुण्यातल्याच एका जबाबदार वृत्तपत्रातील ही बातमी काय म्हणते पहा —

" ...हमीद दलवाई जर काफिर तर हिंदू बाधवाबद्दल या कडव्या मुसलमानांच्या मनात कोणती भावना खदखदत असेल, याची चांगली कल्पना येते...समाजातल्या जाणत्यांनी व सरकारने या घटनेची अवश्य नोंद घ्यावी."

आणि तशी नोंद लगेच घेतलीही गेली म्हणतात. पण 'समाजातल्या जाणत्या' वा सरकार यांच्याकडून नव्हे तर पुण्यातल्याच दुसऱ्या एका पत्रातली ही बातमी .. 'दलवाईंना विरोध झाल्याचे ऐकून हिंदू तरुणातही खळबळ माजली होती...' सुदैवानं ती खळबळ लगेच दबली म्हणून बरे. परंतु यदाकदाचित ती वाढली असती आणि तीद्वारे उभय जमातीतील प्रतिगामी शक्तीनी 'स्फूर्ती' घेतली असती व जातीय दंगलीचा उद्रेक झाला असता तर? तो वणवा दलवाई प्रभृतीनी काय आपल्या धारदार वक्तृत्वानं विझवला असता? तो तर असंख्य निरपराध, निष्पाप हिंदू-मुस्लीमांच्या रक्तानच शमत असतो, असंच आजवरच्या अनेक जातीय दंगलीनी सिद्ध केलेले नाही काय? कदाचित कुणाला मी व्यक्त केलेली शक्यता अतिशयोक्त वाटेल. परंतु त्या दिवशीच्या पोलिसाच्या वार्तापत्रात या घटनेचा उल्लेखही नसल्याची तक्रार खुद्द दलवाईच आपल्या मुलाखतीत करतात, यावरून पोलिसाना या संभाव्य धोक्याची शक्यता जाणवल्यामुळेच तर त्यांनी ही दक्षता घेतली नसेल कशावरून?

आतापर्यंतच्या माझ्या या विवेचनावरून कदाचित कुणाचा असा समज होण्याची शक्यता आहे, की दलवाईंवरील हल्ल्याचं समर्थन-बिमर्थन करण्यासाठीच तर माझा हा सारा आटापिटा चालू नाही ना? परंतु वस्तुस्थिती याच्या नेमकी उलट आहे म्हणजे असं की निषेधाच्या आतषबाजीत सहभागी असतानाही मी गाफिल नाही. या आतषबाजीनं कुठे आगबिग तर लागणार नाही ना, याच भान ठेवण्या-इतपत जागरुकता ठेवणं मला जरुरीच वाटत आणि म्हणूनच 'ज्वालाग्राही' बाबीचा ऊहापोह मला महत्त्वाचा वाटतो.

श्री. दलवाईंची प्रतिक्रिया प्रसिद्ध झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी त्याच वर्तमानपत्रात मुस्लीम नेत्याच्या प्रतिक्रिया प्रसिद्ध झाल्या असून दलवाईंवरील हल्ल्याचा इन्कार, धार्मिक बाबतीत ढवळाढवळ चालणार नाही...आदी आव्हानं याची खैरात केली गेली आहे. महापालिकेत हल्ल्याबाबत तहकुबीवर चर्चा झाली तीत तर श्री. अहमदखान व श्री. कल्याणकर या उभयतानी जी वक्तव्यं केली ती प्रक्षोभकच म्हणावी लागतील. म्हणजे एकूणच या प्रकरणाला भयकर अशा वादाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

हल्ला झाला त्यावेळेस तिथे हजर असलेल्या काही लोकाकरवी मला जी माहिती मिळाली आहे ती कुठल्याच पत्रात आलेली नाही. आणि म्हणूनच वृत्त-पत्रांकडे खुद्द दलवाईंनीच ही बातमी दिली—स्वतःला सोयिस्कर अशा रीतीने दिली—या वृत्तपत्र क्षेत्रातल्या काहीच्या खाजगीतल्या बोलण्यात तथ्यांश असावा, असे मला वाटू लागले आहे.

ती बातमी अशी की मोमिनपूरा मशिदीचे पेशइमाम श्री. हक यांनी मागे केव्हा तरी श्री. दलवाई याच्याशी बोलण्याची इच्छा व्यक्त केली असता दलवाईंनी ती फेटाळून लावली होती. त्यामुळे निदर्शकांचे म्हणणे असे होते की आधी तुम्ही

त्यांना भेटा, त्याच्याशी बोला व मगच आम्हाला काय सांगायचे आहे ते सांगा. परतु दलवाईंनी असे करण्यास साफ नकार दिल्यामुळे प्रकरण चिघळले. हे जर खरे असेल तर दलवाईंची प्रतिष्ठाच प्रकरण चिघळायला कारणीभूत ठरली, असे मानावे लागेल. नतरच्या त्याच्या व मंडळाचे एक कार्यकर्ते श्री. सैयदभाई याच्या पत्रकाराजवळ व्यक्त झालेल्या वक्तव्यावरूनही हे मंडळ आपल्या कार्यापेक्षा प्रतिष्ठेलाच तर अधिक महत्त्व देत नाही ना, अशी शंका येते. सामाजिक कार्यात व्यक्तिगत प्रतिष्ठा वा वृथा ताठरपणा काय कामाचा ? त्याने कार्यसिद्धी साधू शकेल ? दलवाईंसारख्या अभ्यासू नि निष्ठावंत कार्यकर्त्यांनाही कार्यसिद्धीपेक्षा प्रसिद्धीचा मोह व्हावा, याच सखेदाश्चर्य वाटत. ज्याचे प्रश्न हाताळण्यासाठी तुम्ही बद्धपरिकर झाला आहात, त्याच्यापुढ अस आव्हानाच्या पवित्र्यात उभ राहून कार्य तडीस जाऊ शकेल काय ? अशान ज्याच्या मनात थोडीबहुत सहानुभूती निर्माण झाली आहे, होऊ पहाते आहे, त्यालाही खो बसण्याचाच धोका नाही काय ? आणि मुख्य म्हणजे ज्यासाठी त्यानी गेल्या कित्येक वर्षांपासून सारी आटापीट चालविली आहे, त्या हिंदु–मुस्लिम ऐक्यालाच धोका उत्पन्न होण्याची आपत्ती ओढवण्याची शक्यता आहे; असच वर एके ठिकाणी मी उद्धृत केलेली बातमी सांगते.

श्री. दलवाईंच्या कार्याच्या अनुषगाने उद्भवणाऱ्या धोक्याविषयी मी पुन्हा पुन: सांगतो आहे, त्याला तशीच कारण आहेत. कै. आगरकर किंवा कै. म. फुले याच्या कार्याचा सबध हिंदु-मुस्लीम प्रश्नासारख्या क्लिष्ट बाबीशी निगडित नव्हता. त्याना आपल्या कार्याबाबत दोन विभिन्न जमातीच्या प्रतिक्रियाचा विचार करण्याची गरज नव्हती. दलवाईंच्या कार्याचा तसा तो आहे आणि दोन्ही जमातीतील प्रतिगामी शक्ती त्याच्या कार्यात केवळ विघ्नच उत्पन्न करणार नाहीत तर त्याला विपरीत अशी वळणही देण्यासाठी सज्ज असणार ! सबब, म. फुले याच्या सत्यशोधक मंडळापेक्षा दलवाईंच्या ' मुस्लिम सत्यशोधक मडळाचे कार्य म्हणजे अक्षरश: तारेवरची कसरत आहे आणि म्हणूनच त्यानी असा तोल जाऊ देणे, फार फार धोक्याचे आहे !' परतु सत्यशोधक मडळाच्या कार्यकर्त्यांच्या वृत्तपत्रातील वक्तव्यावरून, त्यासाठी त्यानी वापरलेल्या कडक भाषेवरून हे मडळ सत्यशोधासाठी सिद्ध झाले आहे की विरोधकाशी सामना देण्यासाठी, असा प्रश्न पडावा !

विरोधी शक्तीचा नि:पात या पद्धतीने होऊ शकेल, अस कदाचित दलवाईंना वाटत असेल आणि म्हणूनच पूर्ण विचारानीच त्यानी जशास तसे या न्यायाने ही Challenging poze घेतली असेल. परतु मला तरी हे पटत नाही. कार्यसिद्धीच्या दृष्टीने असा पवित्रा उपकारक ठरण्याऐवजी अपकारक ठरण्याचीच केवळ शक्यता आहे, असं नव्हे तर त्यामुळं निष्कारण सघर्षाला आमत्रण दिल्यासारखे होणार आहे व त्यातून वर विस्तारानं विशद करून सांगितलेले धोके उत्पन्न होण्याची भीती मला वाटते. याचा अर्थ दलवाईंनी विरोधकांपुढं नांगी टाकावी वा आपले

पृष्ठ ६४ वर




सुमारे ऐंशी वर्षापूर्वी म्हणजे ३१ मे १८८९ रोजी उत्तर अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया राज्यात घडलेली ही एक हकिकत आहे. पेनसिल्व्हानिया राज्यातील जोन्स टाऊन या शहरापासून १४ मैलावर असलेलं जगातील त्या वेळचं सर्वात मोठं आणि प्रचंड धरण या दिवशी फुटलं. विशेष म्हणजे हे धरण मातीचं होतं. धरण फुटल्यामुळे जो हाहाःकार आणि अनर्थ झाला त्याचं वर्णन वाचल्यावर कुणाच्याही अंगावर काटा उभा राहील.

१८८९ साली मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पश्चिमेस सुरू झालेलं

# एका धरणफुटीची कहाणी....
# पानशेतपेक्षा कितीतरी भीषण....

वादळ रॉकी पर्वताच्या मध्यावर येऊन पोचलं आणि तेथून थेट त्यानं पश्चिम पेनसिल्व्हानियाच्या डोंगरमाथ्यावर धडक मारली. त्यानतर बर्फ पडू लागल आणि जोराची पर्जन्यवृष्टी सुरू झाली. वादळी पावसाच्या पाण्यामुळ नद्या दुथडी भरून वाहू लागल्या. नेहमी शातपणे वाहणाऱ्या रमणीय ओढयांनी रुद्रस्वरूप धारण केल. डोंगरकपारीतून व शेतातून वाहणाऱ्या निर्झरानी तांडव नृत्य सुरू केलं. नदीचे पाणी आजूबाजूची झाडेझुडपे गिळकृत करीत आणि मार्गावरील छोटे पूल उध्वस्त करीत पुढे चालले होते. या साऱ्या गोष्टीमुळे पूर येणार याची अगाऊ सूचना सर्वांनाच मिळाली होती. पण कारखान्यानी गजबजलेल्या 'जोन्स टाऊन' शहरान या साऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष केल. अठरा हजार वस्तीच्या ह्या शहरात रेल्वेला लागणारे लोखडी सामान तयार करण्याचे प्रचड कारखाने होते छोटया मोठया कारखान्यांनी हे शहर गजबजलेल होतं. आपल्या उद्योगधद्यात मग्न असलेल्या या लोकानी निसर्गाने दिलेल्या सूचनेकडे सपूर्ण दुर्लक्ष केलं. जणु काही यत्रांच्या धडधडाटामुळे त्याना निसर्गाची सूचना ऐकू आलीच नाही.

जोन्स टाऊनपासून चौदा मैलाच्या अतरावर असलेल्या मातीच्या धरणाजवळील 'फिशिंग अँड हटींग' क्लबमध्ये तीन चेहरे चितातूर होऊन एका टेबलापाशी विचार करीत बसले होते. तुफान पाऊस आणि वादळामुळे शेजारीच असलेल्या धरणाला धोका उत्पन्न झाला आहे या जाणिवेन ते तिघेही ग्रासले होते कॅनेमॉ नदीचे पाणी ज्या धरणात अडवल होत त्या 'साउथ फोर्क' जलाशयाच आणि त्याबरोबरच धरणाच काय होणार याची त्याना चिंता लागली होती. या प्रचड धरणाची रुंदी ९३१ फूट होती आणि त्याच्या तळाचा परीघ २७१ फुटाचा होता. धरणाच्या भिंतीवरून सामान वाहून नेण्यासाठी रेल्वेलाइन टाकली होती. धरणाचे बांधकाम मातीचे असून त्याबाहेरील शंभर फूट भित चिरेबंद दगडानी बाधून काढली होती. कॅनेमॉ नदी आणि इतर काही झऱ्याचे पाणी या धरणात साठविले होते. या

धरणाचे काम १८५२ साली पुरे झाले. ज्या दिवशी बाधकाम पुरे झाले त्याच दिवसापासून धरणाची दुरुस्ती सुरू झाली. ह्या धरणाची दुरुस्ती करणे म्हणजे फारच खर्चाचे काम होते. कित्येक वर्षे दुरुस्तीचे काम चालू होते. त्या काळात शिकारी, मासे पकडणारे आणि निसर्गप्रेमी लोक हे धरण बघायला येत असत

धरणाजवळील क्लब हाऊसमध्ये वसलेल्या तीन चिंतातूर इसमापैकी एक होते कर्नल अगर. हे गृहस्थ क्लब हाऊसचे अध्यक्ष होते. दुसऱ्या गृहस्थाच नाव होतं डब्ल्यु. एम् बॉयर. हे ग्राउड सुपरिंटेडट होते. तिसऱ्याच नाव होत जे. जी. पार्क. याची धरणावर रेसिडेंट इंजिनियर म्हणून नुकतीच नेमणूक झाली होती. या तिघापेक्षाही आणखी एकाला या धरणाची फार काळजी वाटत होती त्याचं नाव होत हर्बर्ट वेबर याची धरणावर सरक्षक म्हणून नेमणूक झाली होती. धरणाच्या आजूबाजूच शिकारीसाठी जे जगल होत त्यावर आणि आसपासच्या छोट्या बगलेवजा घरावर देखरेख ठेवण्याच याच काम होतं. ह्या सरक्षकाने धरणाची परिस्थिती धोक्यात आहे अस क्लबच्या अधिकाऱ्याना वारवार सागूनही त्यानी त्याला उत्तर दिल होत की, " शतकानुशतक ह्या धरणाला काहीसुद्धा होणार नाही. '

, हर्बर्ट वेबरने पुन. पुन्हा धोक्याच्या सूचना दिल्या असताना त्याला क्लबच्या अधिकाऱ्यानी बजावल होतं की, ' यावाबतीत जर तू पुन्हा शब्द काढलास तर आम्ही तुला नोकरीवरून काढून टाकू. ' वसत ऋतूच्या आगमनाचे वेळी जोन्स टाऊनच्या शहरप्रमुखांना कळविल होत की, ' धरणाची परिस्थिती फार वाईट आहे आणि जोराची पर्जन्यवृष्टी झाल्यास धरण कोसळण्याची फार शक्यता आहे ! ' पण त्याच्या या सूचनेकडे कोणीही लक्ष दिल नाही.

गेले तीन दिवस सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे धरणाचे वर उसळणारे पाणी वेबर पहात होता. ते धरण अजस्र, अक्राळ विक्राळ दिसत होते. ' क्लब हाऊस 'चे वरिष्ठ अधिकारी वादळी पाऊस लवकरच थांबेल. या आशेवर स्वस्थ बनले होते. खर म्हटल तर त्यानीच जास्तीत जास्त हालचाल करायला हवी होती. वरुण राजाची प्रार्थना करून, ' बावा रे आता ही पर्जन्यवृष्टी थांबव ' अस म्हणायला हव होत. कारण वेबरच्या दृष्टीने पावसान इतक रुद्ररूप धारण केलं होत की काही परमेश्वरी चमत्कार झाला तरच पाऊस थाबला असता.

३० मे १८८९ च्या रात्रीही पाऊस सारखा कोसळत होता. धरणात साठलेलं पाणी भयानक दिसत होत. ४०४ फूट उचीच्या धरणात तुडुब साठलेल्या त्या भयकर जलशयापासून फक्त १४ मैल दूर असलेल्या जोन्स टाऊनमधील लोक रात्रीच्या कुशीत शातपणे झोपले होते. ही त्याची झोप अखेरची ठरणार होती. त्या रात्री धरणाशेजारी असलेल्या क्लब हाऊसमध्ये झोपलेल्या कर्नल अंगरना झोप लागली होती. दुसऱ्या दिवशी पहाटे कसल्याशा आवाजाने त्याना जाग आली. हा आवाज रात्री मधून मधून त्यांना झोपेतून जागं करीत होता. घराच्या छपरावर

पडणाऱ्या संततधारेचा तो आवाज होता. आकाश फाटलं होतं. कर्नल अंगर धडपडतच अंथरुणातून उठले. त्यानी खिडकीतून बाहेर पाहिलं. धरणाऱ्या जलाशयावर दाट धुक पसरल होतं. सार धरण धूसर दिसत होतं. तरीसुद्धा त्यात कोसळणारा प्रचंड आवाज त्याना ऐकू येत होता. त्यानी कपडे चढविले आणि जिना उतरून ते खाली आले. सकाळचे साडेसहा वाजून दोन तीन मिनिटं झाली होती. इंजिनियर जॉन पार्क त्यांची वाट पहात खाली उभे होते. त्याचे बूट चिखलाने माखले होते. कर्नल अंगरनी त्यांना विचारलं,

'परिस्थिती अजून गभीरच आहे का ?'

'रात्रीच्या पावसाने धरणाच्या पाण्याची उंची दोन फूट वाढली आहे. नदीच्या किनाऱ्यावर पाण्याची उंची दर ताशी तीन फूट वाढत आहे. धरणात येऊन कोसळणारे पाणी दर ताशी तीस लाख गॅलन एवढे आहे. हे पावसाचं सत्र असंच चालू राहिलं तर ......'

'पाऊस बद होण्याची काही चिन्हं नाहीत का ?' कर्नल अंगरनी उत्सुकतेनं विचारलं.

'मी काही हवामानाचा अंदाज करणारा तज्ञ नाही. पण पावसाचा एकंदर रागरंग असा दिसतो की सारा दिवसभर हा कोसळत राहणार. जादा पाणी जाऊ देणाऱ्या धरणाच्या दरवाज्यातून बाहेर पडणाऱ्या पाण्याची उंची ७॥ फुटानं वाढली आहे. या दरवाजावर (Spillway) बसविलेल्या जाळ्या, झाडे, पालापाचोळा व डोंगरातून वहात आलेल्या मातीच्या ढेकळानी बुजल्या आहेत.'

कर्नल अंगरनी शहारल्यासारखं करून दीर्घ श्वास सोडला आणि ते म्हणाले,

'असं असेल तर त्या जाळ्या खेचून बाहेर काढल्या पाहिजेत म्हणजे धरणात साठणारे पाणी कमी होईल. त्याशिवाय आता दुसरा मार्गच नाही. कामगारांना बोलावून जाळ्या खेचून काढायचं काम आपण करून घेऊ या.'

नंतर असं लक्षात आलं की धरणाच्या दरवाजाच्या जाळ्या काढणं अशक्य होतं. कारण ते काम कामगाराच्या कुवतीच्या पलीकडच होतं. त्या जाळ्या अतिशय जड होत्या आणि दरवाजाच्या चारी बाजूला चिखल अडकल्यामुळे त्या चिखलात घट्ट रुतून बसल्या होत्या.

कर्नल अंगरनी हताश होऊन विचारलं,

'आता पुढे काय करायचं ? धरणाच्या पश्चिमेस भगदाड पाडून पाणी बाहेर काढता येणार नाही का ?'

'आता या गोष्टीला फारच उशीर झाला आहे. यापूर्वीच हे करायला हवं होतं. पण प्रयत्न करायला काहीच हरकत नाही. धरणाच्या पायथ्याजवळील बाहेरचा भाग दगडी आहे. ती दगडी भिंत खोलवर फोडून धरणातील पाणी कमी झाल्यास फारच उत्तम. धरण संपूर्ण भरून वाहू लागायला फक्त सहा फूटच पाणी कमी आहे.

धरणातील पाण्याची उंची सहा फुटानं वाढली की सारा खेळ खतम होणार आहे.'

'प्रयत्न करण्यास हरकत नाही. धरणात कोसळणारा पाऊस थांबला की...'

'हो.. अशी आशा करायला काहीच हरकत नाही.'

दुपारपर्यंत धरणाच्या पश्चिमेकडील दगडी भिंत फोडून पाणी कमी करण्याचा प्रयत्न सारखा चालूच होता. अखेर तोही निष्फळ ठरला, कारण मोठ्या प्रयत्नानंतर फक्त एकच छिद्र त्या भिंतीला पडले. त्याचा धरणातील पाणी कमी करण्यास काहीही उपयोग झाला नाही. एखाद्या झारीतून पाणी पडावं इतकंच पाणी बाहेर पडू लागलं. ही अवस्था फारच केविलवाणी झाली होती. सतत पावसामुळे धरणातील पाणी वाढत होतं. सकाळी ११–३० वाजता धरण काठोकाठ भरलं. धरणावर उभ्या असलेल्या जॉन पार्कच्या लक्षात आलं की आता परिस्थिती आटोक्याबाहेर गेलेली आहे. आता काही तासातच धरण दुभंगणार होतं. 'आता कुठलाच मार्ग उरला नव्हता. आजूबाजूच्या वसाहतींना, गावांना आणि विशेषत: जोन्स टाऊनमधील लोकांना धोक्याची सूचना देऊन जागं करणं आवश्यक होतं. जोन्स टाऊनमधील लोकांना आजूबाजूच्या टेकड्यांवरील निवाऱ्याच्या जागेवर जाऊन पोचण्याइतका अवधी मिळायला हवा होता. हा विचार मनात येताच जॉन पार्क तावडतोब घोड्यावर स्वार झाला आणि वेगानं घोडदौड करीत साऊथ फोर्क जलाशयाच्या उत्तरेकडील दोन मैलाच्या परिसरातील खेड्यातील लोकांना त्याने धोक्याची सूचना दिली. शेताशेतातून हिंडून शेतकऱ्यांच्या घराशी थांबून त्यानं सर्वांना सांगितलं की,

'धरण फुटणार आहे. तुम्ही निवाऱ्याच्या जागेवर तावडतोब हललं पाहिजे.'

रस्त्यात भेटणाऱ्या लोकांना त्यानं ओरडून तेच सांगितलं, 'थोड्या तासातच धरण फुटणार आहे. प्रत्येकाने जवळपासच्या टेकड्यांचा आश्रय घ्यावा.' काही






**जॉन पार्क ओरडून सांगत होता–**
**‘काही काळातच धरण फुटणार आहे...’**

लोकांनी या धोक्याच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले. काही मिनिटांच्या अवधीत घोडदौड करीत जॉन पार्क पेनसिल्व्हानियाच्या रेल्वे मार्गावरील ‘साउथ फोर्क’ मनोऱ्यापाशी येऊन पोचला. विलक्षण काळजी आणि मानसिक ताण यामुळे त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता. एक क्षणभरच थांबून त्या मनोऱ्यावरील अधिकाऱ्याला त्यानं ओरडून सांगितलं की,

‘जोन्स टाऊनमधील लोकांना धोक्याची सूचना द्या की काही काळातच धरण फुटणार आहे.’

एवढं सांगून क्षणाचाही अवधी न लावता जॉन पार्क घोडदौड करीत पुन्हा धरणाजवळ येऊन पोचला.

दुपारी ३ वाजून काही मिनिटे झाल्यानंतर धरणाच्या मध्यभागी १० फुटाचे एक त्रिकोणी भगदाड पडून एक प्रचंड धबधबा त्यातून वाहू लागला. काही क्षणाच्या अवधीतच धरणात साठविलेल्या साऊथ फोर्क जलाशयाच्या पंचवीस लक्ष टनाच्या साठ्याचा प्रचंड दाब या दहाफुटी खिंडारावर केंद्रित झाला. तीन वाजून दहा मिनिटांनी खिंडाराचा मध्यभाग दुभंगून प्रचंड आवाज झाला. त्याचे पडसाद दऱ्याखोऱ्यात निनादले. आत साठलेल्या पाण्याचा प्रचंड साठा लाखो हत्तींचं बळ घेऊन वेगान धरणाबाहेर पडला. लेक कॅनेमॉच्या त्या प्रचंड जलाशयानं साऊथ फोर्कच्या दरीत वेगानं झेप घेतली. ते दृश्य फारच भयानक होते. ते ज्या काही लोकांनी पाहिले त्यात एक धर्मोपदेशक होते. त्यांचं नाव होतं जी. डब्ल्यु. ब्राऊन. ते तिथलेच रहिवासी होते. धरण फुटणार हे त्यांनी ऐकलं होतं व ते प्रत्यक्ष पहाण्यासाठी तेथ गेले होते. धरण फुटून पाण्याचा प्रचंड लोंढा त्यांनी जेव्हा पाहिला तेव्हा ते म्हणाले,

' परमेश्वरा, या भयंकर संकटापासून या आसमंतातील लोकांच्या प्राणांचे रक्षण कर.'

काही मिनिटातच धरणाला ३०० फुटाचे भगदाड पडले आणि क्षणार्धात कापराच्या वडीप्रमाणे धरणाच्या भिंती वितळून गेल्या. आतील जलाशय तांडव नृत्य करीत बाहेर पडला आणि धरण रिकामे करून हा भयकर राक्षस आपल्या हजारो जिव्हा बाहेर काढीत सारी सृष्टी गिळकृत करण्यास निघाला. या जलाशयाचा ओघ इतका सामर्थ्यशाली आणि वेगवान होता की त्यामुळे आजूबाजूच्या टेकड्याना प्रचंड हादरा बसला. लक्षावधी टन पाण्याचा हा जलाशय कॉनेमॉ नदीच्या परिसरात रहाणाऱ्या लोकांपर्यंत जाऊन पोचायला पचेचाळीस मिनिटंही लागली नाहीत. क्षणाक्षणाला संहार करीत हा जलाशय पुढे सरकू लागला. शत्रूची कत्तल करायला निघालेल्या प्रचंड सैन्यासारखे त्याचे स्वरूप होते. वर्षानुवर्षे एका जागेवर असलेल्या कित्येक टन वजनाच्या प्रचंड शिला पाण्याच्या प्रवाहाबरोबर वहात जाऊन मैलन् मैल दूर फेकल्या गेल्या. प्रचड मोठे वृक्ष गवताच्या काडीप्रमाणे प्रवाहात वाहून जात होते. या जलाशयाच्या लाटेची उची ४० फूट होती. साऊथ फोर्क दरीतील अनेक खेडी या प्रवाहात वाहून गेली. मार्गात येणार सार उध्वस्त करीत पाण्याचा तो लोंढा १४ मैल दूर असलेल्या जोन्स टाऊन येथे येऊन पोचला.

' शिकागो-न्यूयॉर्क ' गाडी रेल्वे यार्डात उभी होती. तेथे असल्या इंजिनियरचे लक्ष दुरून येणाऱ्या पुराच्या प्रचड लाटेकडे गेले. त्यावरोबरच त्याने आगगाडी ताबडतोब सुरू केली, कारण पुराची लाट जवळ येईपर्यंत त्याला कॅनेमॉ नदीवरील पूल ओलांडून पलीकडे जायचे होते. काही वेळाच्या अवधीत पाण्याचा लोंढा पुलाजवळ येऊन पोचला आणि त्या पुलाच्या ठिकऱ्या हवेत उडाल्या. त्या आधी काही क्षणच आगगाडीने पूल ओलांडला होता. रेल्वेच्या टेलिग्राफ कचेरीत काम करीत असलेल्या माणसाला दुरून येणारे सदेश एकदम बंद पडले. या भयानक संकटाची त्याला काडीमात्रही कल्पना नव्हती. मात्र पाण्याचा प्रचंड आवाज त्याला दुरून ऐकू येत होता. काहीवेळातच पाण्याची प्रचड लाट, त्यावर तरंगणारी माणसे, झाडेझुडपे त्याला दिसू लागली. ज्या उच मनोऱ्यावर बसून तो काम करीत होता तेथून हे पुराचे दृश्य फारच भयानक दिसत होते. त्या मनोऱ्यापासून पश्चिमेस काही अंतरावर एक इजिन रुळावर उभे होते. मनोऱ्यावरून ओरडून त्यानं खाली असलेल्या जॉन हेस ह्या इजिनियरला सागितल,

" धरण फुटलं आहे. ताबडतोबच निवाऱ्याच्या जागेवर जा, नाहीतर क्षणार्धात वाहून जाशील."

हेसने तांबडतोब इंजिन घेऊन तेथून पोबारा केला. मात्र त्याने इजिनची कर्कश शिट्टी सारखी वाजत ठेवली. इजिनच्या त्या अनपेक्षित कर्कश शिट्टीमुळे जोन्स टाऊनमधील लोकाना मात्र खरोखरच धोक्याची सूचना मिळाली. हेसने यार्डात

पूर्वेच्या बाजूला इंजिन नेले व शिट्टी चालूच ठेऊन तो धावतच यार्डाच्या जवळ असलेल्या आपल्या घरी आला व आपल्या कुटुंबियाना घेऊन जवळच्या टेकडीवर सुरक्षित जागी गेला. यार्डात उभ्या असलेल्या इंजिनची शिट्टी अजूनही चालूच होती. काही वेळानतर पुराची प्रचड लाट इजिनाला गिळकृत करून पुढे गेली. पुराच्या पाण्यात इजिन वाहून गेले. ' मिनरल पॉइंट ' हे खेडे संपूर्ण उध्वस्त करून पाण्याचा तो प्रचड लोंढा आपल्या हजारो जिव्हा बाहेर काढीत पुढे सरकू लागला आणि इस्ट कॅनेमॉ आणि फ्रँकलिन या गावी येऊन पोचला

' इस्ट कॅनेमॉ 'च्या रेल्वे यार्डात ' डे एक्सप्रेस ' ही गाडी सिग्नलची वाट पहात उभी होती. यावेळी दुपारी चार वाजण्याचा सुमार होता. पाऊस पडत होता आणि नद्या दुथडी भरून वहात होत्या आणि याच वेळी हेसने चालू केलेल्या इजिनच्या शिट्टीचा आवाज ' डे एक्सप्रेस 'मध्ये बसलेल्या उतारूना ऐकू आला. खिडकीतून माना बाहेर काढून उतारू बाहेर पाहू लागले गाडीतील कडक्टर ब्रेल स्टेशनवरील पोर्टर आणि ब्रेकमनला घेऊन खाली उतरला. या सर्वांच्या मते ती शिट्टी म्हणजे नदीच्या बाजूला काहीतरी भयानक घडले असल्याची धोक्याची सूचना असावी. इजिन ड्रायव्हरने घाईघाईने सर्व उतारूना सागितले की,

" सर्वांनी गाडीतून उतरून ताबडतोब टेकडीचा आसरा घ्यावा. "

काही क्षणाच्या आतच ४० फूट उचीची लाट येऊन ' इस्ट कॅनेमॉ ' रेल्वे यार्डाचा प्रदेश तिने गिळकृत केला.

या गाडीत असणाऱ्या एक प्रवाशाने प्रत्यक्ष पाहिलेल्या दृश्याचे वर्णन केले आहे की, " आम्ही सर्व उतारू आगगाडीत बसलो होतो तेव्हा दूरवर असलेल्या इजिनच्या कर्कश शिट्टीचा आवाज आमच्या कानावर येत होता. ह्या शिट्टीचा अर्थ प्रत्येकजण दुसऱ्याला विचारीत होता. माझ्या शेजारी बसलेल्या एका स्त्रीला मी म्हटल की ही शिट्टी म्हणजे धोक्याची सूचना आहे असं मला काही वाटत नाही. पण तेवढ्यातच आमच्या डब्याच्या खिडकीतून मी बाहेर पाहिल आणि मला दोनशे ते तीनशे फुटाच्या अतरावर पाण्याचा एक प्रचंड लोढा आमच्या आगगाडीच्या दिशेने येताना दिसला "

" पाण्याचा हा प्रचड लोढा एकदम वेगानं येऊन आजूबाजूच्या मोटारी व आगगाडीवर आदळेल अस वाटल होत. पण पाण्याच्या त्या प्रचड भितीचा पुढे सरकण्याचा वेग कमी होता. त्यामुळे आगगाडीतील व मोटारीतील लोकाना जवळच्या टेकडीवर सरक्षण घेण्याइतका अवधी मिळाला पण दुर्दैवाने पाण्याचा तो लोढा पाहून काही उतारू घावरून गेले. काय करायचं ते त्याना समजेनास झाल. त्यामुळे ते पुराच्या भक्ष्यस्थानी पडले. अशा लोकाची सख्या ३७ होती "

— पेनसिल्व्हानिया रेल्वेच्या इस्ट कॅनेमॉ यार्डात उभी असलेली कितीतरी इजिनं बाटलीच्या बुचासारखी पुराबरोबर वाहून गेली. रेल्वेच्या आवारातील सारी

मालमत्ता पुराने धुऊन काढली. सोळा इंजिन, रेल्वे वर्कशॉप, शेकडो मोटारी, यंत्र सामुग्री, रेल्वेचे रूळ, सिग्नल केबिनस्, छोटया इमारती, गोडाउन्स ही इस्ट कॅनेमॉ रेल्वे यार्डातील सारी मालमत्ता पुराच्या लोंढयात वाहून गेली.

दुपारी ४ वा. १० मिनिटांनी पुराचा प्रचंड लोंढा जोन्स टाऊन येथे येऊन पोचला. तेथील लोकांना या धोक्याची यत्किंचितही कल्पना नव्हती. जोन्स टाऊनजवळील टेकडीवरून एका इसमाने पाण्याचा लोंढा दुरून येताना पाहिला होता आणि त्यानं ती बातमी 'न्यूयॉर्क सन' या वर्तमानपत्राला दिली होती क्षणार्धात जोन्स टाऊन-मधील सारी माणसं प्राण वाचविण्यासाठी घराबाहेर पडली. माणसाचा प्रचंड लोंढा प्राण वाचविण्यासाठी रस्त्यारस्त्यातून धावू लागला. आपल्या सहस्र जिव्हा बाहेर काढीत पुराचा तो प्रचंड राक्षस त्याचा पाठलाग करू लागला. आणि डोळयाचं पातं लवत न लवत तोच रस्त्यावरून धावणारी ती माणसं त्या राक्षसानं क्षणार्धात गिळंकृत केली. सारं शहर खवळलेल्या जलाशयानं भरून गेलं. घरं, माणसं, इलेक्ट्रीकचे खांब आपल्या जबड्यात गिळंकृत करून त्या राक्षसानं एक मिटकी मारली. कित्येक लोकांना काय झालं ते कळलंच नाही. पाण्याच्या प्रचंड लाटेत ते विलीन झाले. प्राण वाचविण्याची धडपड करण्यासही त्यांना वेळ मिळाला नाही. लाटेत विलीन झालेल्या काही लोकांनी आपले हात उंच करून मदतीची अपेक्षा केली. पण त्यांना मदत करणार तरी कोण ? मृत्यूच्या भक्ष्यस्थानी पडणाऱ्या असंख्य लोकांच्या किंकाळया जोन्स टाऊनच्या दरीत दुमदुमत होत्या. जीवन आणि मृत्यु यांची झुंज चालू होती. क्षणाचा विलंब झाल्यामुळे काही लोक मृत्युमुखी पडले तर क्षणभरात चपळाई केल्यामुळे काही जणांचे प्राण वाचले होते. या जीवन-मृत्यूच्या झगडयात एक हृदयद्रावक पण मृत्यूचा पराजय झालेली घटना सांगण्या-सारखी आहे.

ब्रेथा कॅंडवेल नावाची एक तरुण शिक्षिका जोन्स टाऊन येथील आपल्या घरी सुट्टी घेऊन आली होती. ३१ मेच्या संध्याकाळी ब्रेथा आणि तिची बहीण पत्रांना उत्तर लिहित बसल्या होत्या. आगगाडीच्या शिट्टीचा कर्कश आवाज ब्रेथानं ऐकला होता पण त्या आवाजाकडे तिनं दुर्लक्ष केलं. पण काही वेळातच तिचे वडील जिन्यावरून धावत आले व ओरडून म्हणाले,

"आपण मोठया संकटात सापडलो आहोत. धरण फुटून साऊथ फोर्क जलाशय बाहेर पडला आहे."

ब्रेथानं खिडकीतून बाहेर पाहिलं पुराच्या पाण्याचा प्रचंड लोंढा तिच्या घराच्या दिशेन येत होता. आजूबाजूची घरं त्या प्रवाहात कोसळताना तिला दिसत होती. तिच्या घरासमोरची तीन मजली इमारत पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली आणि पुरात वाहू लागली. तिच्या घराला लागून असलेलं घर क्षणार्धात कोसळलं आणि तिच्या डोळयादेखत पुरात बुडून वाहून गेलं. त्यात सापडलेल्या

लहान मुलाच्या किंकाळ्या तिच्या कानात घुमत होत्या. आणि त्यांनी वर उचललेले चिमुकले हात तिच्या दृष्टीसमोरून हलत नव्हते ग्रेथाचे वडील तिला म्हणाले,

"आता फक्त परमेश्वरच आपलं रक्षण करू शकेल. क्षणार्धातच आपण ह्या पुरात वाहून जाणार आहोत."

या प्रसंगाचं वर्णन करताना ग्रेथा म्हणते,

"थोड्या वेळातच आमच्या घराभोवती पाण्याचा वेढा पडला. आम्ही दोघी बहिणी व आमचे आईवडील आम्ही सारे आमच्या घराच्या दुसऱ्या मजल्यावर आलो. माझ्या वडिलांनी आम्हाला जवळ घेतलं आणि ते म्हणाले, 'मेलो तर सर्वजण एकदमचं,' पण मी मात्र मरायला तयार नव्हते. पुराचं पाणी दुसऱ्या मजल्यापर्यंत येऊन पोचलं होतं आणि ती सारी जण खिडकीपाशी उभी होती. पुराचं पाणी दुसऱ्या मजल्याच्या खिडकीजवळ आलं. त्या पाण्याच्या लोंढ्याबरोबर एका घराचं छप्पर वहात जाताना मला दिसलं. ते छप्पर खिडकीजवळ आल्या-बरोबर मी माझ्या आईचा हात धरला आणि त्या छपरावर उडी मारली आणि वडिलांनी पण माझ्या मागोमग माझ्या बहिणीचा हात धरून झटकन छपरावर उडी मारली. आमच्या घरातील आम्ही सारी मंडळी छपरावर बसून पुराच्या पाण्याबरोबर वहात चाललो वाटेत लागणाऱ्या लाकडाच्या ओंडक्याचा आधार घेत आमच्या कुटुंबाचा पुराच्या पाण्याच्या लाटेवरचा भयानक प्रवास सुरू झाला. वाटेत पुराच्या पाण्याचा मारा सहन करीत उभी असलेली भलीभक्कम तीन मजली इमारत आमच्या दृष्टीपथात आली. त्या इमारतीच्या जवळ आमचं छप्पर जेव्हा पोचलं तेव्हा आम्ही त्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर भराभर उड्या मारल्या. त्या इमारतीत आधीच प्राण वाचविण्यासाठी बरेच लोक जमले होते. यावेळी संध्याकाळचे पाच वाजले होते. आम्ही त्या इमारतीत जाऊन पोचलो तेव्हा-सुद्धा पुरात बुडणाऱ्या असंख्य माणसांच्या किंकाळ्या आम्हाला ऐकू येत होत्या. आणि त्याच वेळी माझ्या लक्षात आलं की माझ्या अंगावर वस्त्र नव्हते. पुराच्या पाण्याने अंगावरील कपडे फाटून वाहून गेले होते. मी थंडीने कुडकुडत तशीच उभी राहिले."

जोन्स टाउनमधील प्रसिद्ध सात कमानींच्या प्रचंड दगडी पुलाजवळ अमाप चिखल साठला होता. पुरात वाहून आलेल्या चिकट चिखलाच्या थरानं सारं शहर माखून गेलं होतं या चिखलामध्ये छिन्नविच्छिन्न झालेल्या शेकडो घरांची छकलं, आगगाड्यांची इंजिनं, मोटारी, फिशप्लेटस्, रुळांचे तुकडे, यंत्रसामुग्री, झाडेझुडपे, मेलेली माणसं, जनावरं, इलेक्ट्रीकच्या तारांची भेंडोळी अशा असंख्य गोष्टी रुतून बसल्या होत्या. या चिखलाचा प्रचंड थर जागोजाग पसरला होता आणि त्याचा इतका एकत्र घट्ट लगदा झाला होता की, पुढे हा चिखलाचा थर कुऱ्हाडीने फोडून काढावा लागला व त्यालाही बरेच दिवस लागले.

पुराच्या पाण्याचा वेग आता कमी झाला होता. या पहिल्या लाटेसरशी जोन्स-टाऊनमधील सुमारे ३०० माणसं बळी पडली होती. रात्रीचा अंधार पडू लागला होता. ३१ मेच्या काळरात्री या भेसूर आणि भग्न शहरात मृत आणि जिवत माणसं जागोजाग विखुरली होती. बऱ्याच जणानी सुरक्षित जागेचा आश्रय घेतला होता. पण पुराचे पाणी ओसरल्यावरही अनेक लोक चिखलात सापडून मृत्युमुखी पडले. पुराच्या पाण्यात वाहून आलेले घराचे खाब, लाकडाचे ओंडके पुरात वाहून आलेले तेल प्याले होते. आता पुरानतर जागोजाग आगी लागू लागल्या. या चिखलातून आगीचे लोळ येऊन अनेक ठिकाणी आगी लागल्या. ही आग सतत तीन दिवस चालू होती. या आगीच्या भक्ष्यस्थानी पडून कोळशाप्रमाणे जळून काळी ठिक्कर पडलेली सुमारे ३०० माणसांची प्रेते पुढे सापडली. जोन्स टाऊनमधील दुर्घटनेचे हे अत्यत हृदयद्रावक दृश्य होते. पुराची लाट जोन्स टाऊनमध्ये येऊन पोचल्यानंतर दोन तासानी म्हणजे सध्याकाळी ६ च्या सुमारास दगडी पुलाजवळ जमा झालेल्या १५ फूट उचीच्या चिखलाच्या ढिगाऱ्यास आग लागली. या चिखलात तेल प्यालेले लाकडाचे सामान, तेलाचे डबे होते. या ढिगाऱ्यास आग लागल्या-बरोबर शहरात अनेक ठिकाणी जमा झालेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यास आगी लागल्या. एका पडक्या घरातील कोळशाच्या साठ्याला आग लागली. चुन्याने भरलेल्या मालगाडीच्या डब्यात पाणी शिरून त्या घर्षणाने त्या डब्याला आग लागली. रस्त्यावर फेकल्या गेलेल्या व चिखलाने भरलेल्या एका मोटारची पेट्रोलची टाकी फुटून मोटारीला आग लागली. घराचे खाब, खिडक्या, भग्न अवशेष याना काहीना काही कारणाने आगी लागत होत्या. आता सर्वत्र काळोखाचे साम्राज्य पसरले होते. ठिकठिकाणी लागलेल्या आगीचा प्रकाश शहरभर पसरला होता. साधारणपणे हजारएक माणसं या भग्न, भेसूर आणि आग, चिखल आणि पुराच्या पाण्याचे साम्राज्य पसरलेल्या शहरात जीव वाचविण्याची केविलवाणी धडपड करीत होती. आगीच्या भक्ष्यस्थानी पडणाऱ्या आपल्या नातेवाइकास वाचविण्याचा लोक प्रयत्न करीत होते. एक गृहस्थ आपल्या पत्नीला आगीतून वाचविण्याचा प्रयत्न करीत असता चिखलात खोल रुतून स्वत:च आगीच्या भक्ष्यस्थानी पडला आणि अदृश्य झाला. त्या माणसाच्या करुण किंकाळ्या फक्त ऐकू येत होत्या.

रोझ क्लार्क नावाची १९ वर्षाची एक मुलगी माती आणि चिखलाच्या ढिगाऱ्यात रुतून बसली होती. तिचे डोके फक्त पाण्याच्या वर होते आणि तिचा डावा पाय चिखलात घट्ट रुतून बसला होता. तो सोडविण्याचा ती आटोकाट प्रयत्न करीत होती पण पाय निघत नव्हता व ती अडकून पडली त्या आजूबाजूला आगी लागल्या होत्या व आता ती आग हळूहळू तिच्याजवळ येऊन पोचणार होती. पाय अडकल्यामुळे ती आगीच्या भक्षस्थानी पडणार होती. कुणीतरी भुतानं आपला पाय घट्ट धरून ठेवला आहे अस तिला वाटत होतं. तिचा पाय काही

केल्या चिखलातून सुटत नव्हता. आग हळूहळू पसरत रोझच्या जवळ येत चालली होती. धुराचे आणि ज्वाळाचे लोळ वर उसळत होते आणि रोझ मदतीसाठी मोठमोठ्यांदा हाका मारीत होती. या प्रलयकालातही काही लोक सकटात सापडलेल्याना मदत करीत होते. रोझची हाक ऐकून तीन इसम तिच्याजवळ धावत आले. त्यापैकी एकाजवळ कुऱ्हाड होती. दुसऱ्याजवळ खजीर होता. तिघानीही तिला चिखलातून वर ओढून काढण्याचा प्रयत्न केला. पण सारे प्रयत्न निष्फळ ठरले. मग शेवटी त्यापैकी एकान पाण्यात उडी मारून रोझचा अडकलेला पाय सोडविण्याचं ठरविलं. त्यानं जेव्हा आत उडी मारली तेव्हा तो त्या चिखलात रुतून मरणार असंच सर्वांना वाटलं. त्याला उशीर झाला तेव्हा तो चिखलात गुदमरून मेला असंच बाकीच्या दोघांना वाटलं. पण काही वेळान तो वर आला तेव्हा त्याला विलक्षण धाप लागली होती आणि डोळे रक्तासारखे लाल झाले होते. रोझचा पाय एका मृत माणसाच्या पंजात पकडला गेला होता. तो सोडवणं म्हणजे अशक्यप्राय होतं. रोझ ओरडून सागत होती, 'मला सोडून जाऊ नका. माझे प्राण वाचवा.'

तिला त्या केविलवाण्या अवस्थेत सोडून जाणं त्या तिघाना अतिशय जिवावर आलं होतं. रोझ म्हणत होती, 'मला अस सोडून जाण्यापेक्षा हातातल्या खंजिरानं एका मिनिटात मला यमसदनाला पाठवा आणि मगच इथून जा.' ज्या माणसान पाण्यात आणि चिखलात उतरून रोझचा पाय सोडविण्याचा प्रयत्न केला होता त्यानं पुन्हा प्रयत्न करायच ठरविलं. त्यान पुन्हा आत उडी मारली. काही मिनिटांच्या आत आपल्या पायाशी धडपड करीत कुणीतरी पाय सोडवीत आहे अशी तिला जाणीव झाली. त्या पोहणाऱ्या इसमाने तळाशी जाऊन तिच्या पायाभोवती घट्ट आवळला गेलेला मेलेल्या माणसाचा पजा कापून काढला व रोझचा पाय मोकळा केला. भडकलेल्या आगीच्या ज्वाळा रोझच्या जवळ येऊन पोचायच्या आधी फक्त काही मिनिट तिची त्या मगरमिठीतून मुक्तता झाली. आणि तिची मुक्तता करणाऱ्याबरोबर तिनं निवाऱ्याच्या जागी धूम ठोकली.

जोन्स टाऊन शहरावर प्रेताची अवकळा पसरली होती. मिसेस् मास्टरसन चिखलात रुतलेल्या आपल्या भग्न घराचे अवशेष शोधीत हिंडत होत्या. पुराचे पाणी गावात शिरलं तेव्हा त्यांच्या घराच्या पोटमाळ्यावर आश्रय घेतलेल्या २७ इसमांच काय झाल ह्याची त्याना काळजी लागून राहिली होती. पुराच पाणी ओसरत होतं. ३१ मेची मध्यरात्र उलटून गेली होती. अशा वेळी एक स्त्री प्रसूत होऊन तिन एका मुलाला जन्म दिला. मिसेस् मास्टरसन आणि काही स्त्रियांनी त्या स्त्रीला प्रसूतिकालात मदत केली. त्या काळरात्री आणखी काही स्त्रिया प्रसूत झाल्या. त्या भयाण काळरात्री जन्माला आलेल्या साऱ्या नव्या बालकाच नाव 'Flood' (पूर) असं ठेवण्यात आल. सकटग्रस्त लोकाना काहीजण मदत करीत

होते सात कमानीच्या दगडी पुलापलीकडे अंधारात काही स्त्रियांनी आश्रय घेतला होता. प्रसूतिवेदनेने त्या तळमळत होत्या. त्या कुणा डॉक्टरलाही जवळ येऊन देत नव्हत्या. पुराच्या पाण्यान त्यांची सारी वस्त्र हिरावून घेतली होती. त्या अंधारात लपल्या होत्या व कुणाचीही मदत घेण्याचं त्यांनी नाकारलं. तरीसुद्धा शरीरसरक्षणासाठी त्याना काही लोकांनी ब्लँकेटस् व कोटस् दिले.

३१ मे १८८९ ही ' जोन्स टाऊन 'च्या आयुष्यातली अखेरची रात्र उलटली होती. साऱ्या जगाशी सपर्क तुटला होता. टेलिफोन, इलेक्ट्रिकच्या तारा, पोस्ट ऑफिसे, कचेऱ्या, रेल्वेस्टेशन सार काही उध्वस्त झालं होतं. पेनसिल्व्हानिया रेल्वेचा इटसवर्ग येथे जाणारा २० मैलाचा रेल्वेमार्ग धुऊन निघाला होता. या वीस मैलाच्या रेल्वेमार्गावरील रूळ गवताच्या काड्याप्रमाणे पुराच्या पाण्यात वाहून गेले होते. शहरातील ३५ डॉक्टर्सपैकी ६ डॉक्टर्स पुराच्या पाण्यात बळी पडले होते. पोलीस सरक्षण यत्रणा-सपूर्णपणे बद पडली होती. तुरुंगातील कैदी पळून गेले होते. गावातील ' शेरीफ 'ला पुराच्या पाण्याबरोबर लाकडी ओंडक्याचे सहाय्य घेऊन वाहून जाताना काही लोकांनी पाहिले. त्यानंतर ते पुन्हा कधीही दिसले नाहीत. टेकड्यावर रहाणारे काही लोक आणि तेथे आश्रय घेतलेली माणसं वाचली होती. बाकी सार शहर उध्वस्त आणि बेचिराख झालं होतं. बहुतेकांची घरं दारं, चीजवस्तु पुरात वाहून गेल्या होत्या. काही लोकांच्या अंगावर वस्त्रही उरली नाहीत. गॅसबत्त्या, इलेक्ट्रीक लाइट, कारखाने, गिरण्या, दुकाने, अन्न, पधे, कपडे सारं काही वाहून गेल. भग्न अवशेष, चिखल, मृतदेह यामुळे जोन्स ऊनची स्मशानभूमी झाली होती.

या प्रसंगाला आता ऐंशी वर्ष उलटून गेली आहेत. तरीसुद्धा साऊथ फोर्क दरीत भग्न धरण पूर्वस्मृती जागृत करीत अजूनही तिथं उभं आहे. धरणाची एक बाजू फुटून हाहाकार झाला, पण बाकीचं धरण मात्र अजून धडधाकट मजबूत उभं आहे. शतकानुशतकापूर्वी बांधलेल्या किल्ल्याच्या तटासारखं.

□ □ □

वि. स. वाळिंबे

# पराजित अपराजित

दारूचे कोठार भरले होते
ठिणगी पडण्याचाच काय तो अवकाश

**लेखांक पाच**

फ्रान्सिस-फर्डिनंडचा खून तेवढी
ठिणगी टाकायला पुरेसा ठरला.

फ्रान्सच्या प्रतिष्ठेवर प्रहार करायला जर्मनीचा कैसर कमालीचा अधीर झाला होता.

कैसर हा प्रारंभी केवळ प्रशियाचा सत्ताधीश होता. १८७१ मध्ये जर्मन संस्थानांचे एकत्रीकरण होऊन आधुनिक जर्मनीची प्रस्थापना झाली तेव्हा या जर्मन 'राईश 'चे सम्राटपद प्रशियाच्या बादशहाकडे आले. त्यामुळे साहजिकच जर्मनीचे राजकारण म्हणजे जुन्या प्रशियाचे राजकारण हे समीकरण अस्तित्वात आले. यापूर्वीची सहाशे वर्षे जर्मनीच्या राजकारणावर ऑस्ट्रियाचे वर्चस्व होते. या काळात ऑस्ट्रियाचा राजा हाच जर्मनीचा कैसर असे. परंतु १८६६ मध्ये ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात युद्ध होऊन त्यात ऑस्ट्रियाचा

पराभव झाला. त्यामुळे ऑस्ट्रिया जर्मन संघराज्यातून बाहेर पडला आणि त्याची जागा प्रशियाने घेतली.

प्रशियाच्या सत्ताधीशाकडे सूत्रे येताच जर्मनीचे स्वरूप झपाट्याने बदलू लागले. कैसरप्रमाणेच त्याचा प्रधानमंत्री बिस्मार्क हाही महत्त्वाकांक्षी होता. त्यामुळे त्या दोघांनी जर्मनीच्या औद्योगीकरणाला जोराने चालना दिली. कैसरला केवळ आर्थिक संपन्नता अभिप्रेत नव्हती. जर्मनी सामर्थ्यशाली व्हावा यासाठीही तो झटत होता. त्यामुळे पंचवीस–तीस वर्षांच्या काळात आर्थिक आणि लष्करी अशा दोन्ही अंगांनी जर्मनीचे बळ वाढू लागले.

सामर्थ्याचा स्वभावविशेष असा आहे की आविष्काराशिवाय त्याला चैन पडत नाही.

आपल्या खांद्याला खांदा भिडवून उभी राहील अशी दुसरी एकही शक्ती युरोपमध्ये अस्तित्वात असता कामा नये अशी कैसरची जिद्द होती. त्या दृष्टीने त्याच्या डोळ्यांत सलत होता शेजारचा फ्रान्स. प्रशिया आणि फ्रान्स यांचे वैर हे युरोपच्या राजकारणातील एक जुने दुखणे होते. अठराशे सत्तरमधले फ्रान्स–प्रशिया युद्ध त्या दुखण्याचाच भाग होता. प्रशियाकडे जर्मनीचे नेतृत्व आल्यानंतर प्रशियाचे दुखणे हे जर्मनीचेही दुखणे ठरले. त्यामुळे फ्रान्सचे उत्तर आफ्रिकेमध्ये वर्चस्व वाढत आहे ही गोष्ट जर्मनीला मंजूर होणे शक्य नव्हती.

विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या फ्रान्सला आपल्या शेजाऱ्याचे हे आव्हान स्वीकारणे अवघड वाटत होते.

फ्रान्स आणि जर्मनी यांच्यातील प्रकृति–भिन्नतेचा हा अपरिहार्य परिणाम होता. प्रत्येक राष्ट्र आपले वैचारिक वेगळेपण घेऊन उभे असते, हे वेगळेपण कटाक्षाने जपत असते. या वैचारिक वेगळेपणातूनच त्या त्या राष्ट्राचे मन घडत असते आणि इतिहास आकार घेत असतो. फ्रान्सने सबंध एकोणिसावे शतक व्यक्तित्ववादाची जोपासना करण्यात व्यतीत केले. त्यामुळे कला आणि वाङ्मय या क्षेत्रांमध्ये फ्रान्सने स्पृहणीय कामगिरी केली हे मान्य केलेच पाहिजे. आपल्या या सांस्कृतिक वैभवावर फ्रेंच नागरिक खूष होता. भोवतालचे जग वेगाने बदलत आहे आणि हे बदलणारे जग आज ना उद्या आपल्याला नवे आव्हान देणार आहे या काळजीने फ्रेंच नागरिक व्यथित झाला आहे असे घडले नाही. आपला देश बलिष्ठ असला पाहिजे, आपले सरकार कणखर असले पाहिजे याची फ्रेंच जनमानसाला फारशी फिकीर नव्हती ती या आत्मकेंद्रित प्रवृत्तीपायीच. ज्या सरकारचे अस्तित्व कमीतकमी भासते तेच सर्वांत चांगले सरकार होय ही राज्यशास्त्रातील जुनी म्हण नव्या काळातही फ्रान्सला खरी वाटत होती.

आपले सरकार दुबळे आहे ही चांगली गोष्ट आहे असे अनातोल फ्रान्ससारख्या नामवंत लेखकाचे मत होते. तो म्हणायचा, "आपलं सरकार नागरिकांकडून

फारशी अपेक्षा करीत नाही हे मला आवडतं. लोक बंधनातून मुक्त झाले आहेत याच श्रेय सरकारलाच द्यायला हवं. शासनयंत्रणा दुबळी असली की लोकांवरचं ओझं कमी होतं. आपल्या सरकारचा काच जाणवत नाही, या एका गोष्टीकरिता सरकारी कारभारातील सगळा गोंधळ माफ करायला माझी तयारी आहे."

जर्मनीची परंपरा वेगळी होती. प्रशियन लष्करवादाच्या मुशीमुळे जर्मन मन मूलत: सामूहिक बनले होते. आपले सरकार आपल्या भल्याबुऱ्याची चिंता वाहत असल्यामुळे सरकारचे आदेश विनतक्रार मान्य करणे हे आपले कर्तव्य आहे अशी शिकवण जर्मन जनमानसाला मिळालेली होती. राज्यकर्त्यांची महत्त्वाकांक्षी वृत्ती आपोआपच लोकापर्यंत झिरपत जाते. जर्मनीतही तेच घडले जाते. सरकारने आपल्या पौरुषाला आवाहन करावे अशीच जर्मन नागरिकाची धारणा होती.

फ्रान्सच्या सुदैवाने त्याला या काळात पुअँकरे आणि क्लेमेन्सो याच्यासारखे वास्तवाचे भान असलेले प्रधानमंत्री लाभले. परराष्ट्रमंत्री देलकासे याची नजर तर सदैव चौफेर भिरभिरत होती. इतर युरोपीय राष्ट्रांपासून आपल्याला अलग पाडण्याचा जर्मनीचा खटाटोप सुरू आहे हे या तिघाना जाणवले आणि या खटाटोपावर मात करण्याच्या दृष्टीने त्याचे प्रयत्न सुरू झाले.

या प्रयत्नांमधूनच १८९४ सालचा फ्रान्स आणि रशिया याचा लष्करी करार जन्माला आला. त्यानतर दहा वर्षानी, आपले शतकानुशतकाचे वैर विसरून फ्रान्स आणि ब्रिटन हे देश एकत्र आले. जर्मनीचे संभाव्य संकट हा फ्रान्स, रशिया आणि ब्रिटन याना जवळ आणणारा दुवा ठरला. जर्मनी, ऑस्ट्रिया–हंगेरी आणि इटाली यानी परस्पर–सहाय्याचा करार करताच, क्लेमेन्सोच्या पुढाकारामुळे फ्रान्स, ब्रिटन आणि रशिया यानीही स्नेहबंधनाचा पुकारा केला. या करारमदाराच्या कार्यात देलकासे चतुर होता. त्याने जर्मनीला सुगावा लागू न देता, इटालीला जर्मनीच्या पखाखालून बाहेर काढले.

फ्रेंच राष्ट्रनेत्याच्या या मुत्सद्दिगिरीमुळे आपणच अलग पडतो की काय अशी जर्मनीला भीती वाटू लागली. त्यामुळे फ्रान्सला कोठे तरी कोंडीत पकडणे भाग होते. त्या दृष्टीने उत्तर आफ्रिकेची भूमी सोयीस्कर ठरणार होती.

३१ मार्च, १९०५ या दिवशी, कैसर प्रिन्स फॉन बुलोव्ह या आपल्या प्रधानमंत्र्याला बरोबर घेऊन टँजियरमध्ये उतरला. मोरोक्कोच्या या राजधानीत प्रवेश करताच तो गरजला, "या देशाचं स्वातंत्र्य आम्हाला मोलाचं वाटतं. मोरोक्कोशी व्यापार करायला सर्व राष्ट्राना मुभा असली पाहिजे. एकटा फ्रान्स जर इथं शिरजोरी करू पाहील तर जर्मनी ते सहन करणार नाही."

कैसरच्या या उद्दाम मागणीला सणसणीत उत्तर द्यावे अशी देलकासेची इच्छा

होती. परंतु प्रधानमंत्री मॉरिस रूव्हिए याने त्याला थोपविले. जर्मनीने योग्य वेळ साधून आपल्याला ही चपराक लगावली आहे हे त्याला माहीत होते. कारण फ्रान्सची मुख्य भिस्त होती रशियावर आणि तो नेमका यावेळी स्वतःच्या अडचणीमध्ये गुरफटला गेला होता एक तर त्याने नुकताच जपानसारख्या चिमुकल्या आशियाई राष्ट्राकडून जबरदस्त मार खाल्ला होता. या पराभवामुळे बलदंड समजल्या जाणाऱ्या रशियाची खूपच नामुष्की झाली होती. मांचुरियामध्ये जपानशी दोन हात करताना या महाकाय राष्ट्राने आपले असंख्य सैनिक तर गमावलेच, परंतु त्याचे नाविक सामर्थ्यही खच्ची झाले. झारची ही हतबल अवस्था पाहून त्याच्या जुलुमी राजवटीविरुद्ध चिडलेल्या नागरिकांनी क्रांतीचा पुकारा केला. त्यामुळे जर्मनीने जर आज आपल्यावर हल्ला चढविला तर रशिया काही जर्मनी--विरुद्ध बोट उचलू शकणार नाही हे रूव्हिए याने ताडले अन् म्हणूनच त्याने देलकासेला सबुरीचा सल्ला दिला.

जर्मनीशी आपण एकटे मुकाबला करू शकत नाही हे फ्रेंच राज्यकर्त्यांप्रमाणे लोकांनाही माहीत होते.[१]

कारण ड्रेफ्यु–प्रकरणाचे हादरे अजूनही जाणवत होते. त्याचप्रमाणे शासनयंत्रणा आणि धर्मसत्ता यांच्यातील वादही या काळात विकोपाला गेलेला होता सक्तीच्या लष्करी नोकरीची मुदत तीन वर्षांवरून दोन वर्षांवर आणल्यामुळे सेनाधिकारीही सरकारवर नाराज होते.

त्यामुळे फ्रान्सने हा अपमान मुकाट्याने गिळला.

जर्मनीचे एवढ्यावर समाधान होण्यासारखे नव्हते; म्हणून फ्रान्सने आणखी नमते घेतले. स्पेनमधील अल्जेसिरास येथे युरोपीय राष्ट्रांची बैठक होऊन मोरोक्कोच्या स्वातंत्र्याचा कोणीही अपहार करायचा नाही ही जर्मनीची मागणी सगळ्यांनी मान्य केली.

तरीदेखील, जर्मनीबरोबरचे युद्ध अटळ आहे हे फ्रान्सला जाणवू लागले होते.

त्यादृष्टीने चार्लस पेगीसारख्या पत्रकाराचे उद्‌गार मोठे बोलके होते. तो म्हणाला, 'नेहमीप्रमाणे मी सकाळी नऊ वाजता कचेरीत आलो आणि साडेअकरा वाजता कैसरच्या भाषणाची बातमी माझ्या टेबलावर येऊन पडली. केवळ फ्रान्सच्याच नव्हे तर साऱ्या जगाच्या इतिहासातील नवा कालखंड आता सुरू होत आहे हे मला तत्क्षणी जाणवले.'

अल्जेसिरास परिषदेपासून तर जर्मन नेते 'आता युद्ध हवे' या एका आग्रहाने पछाडले गेले होते. प्रतिदिनी जर्मनीचे लष्करी सामर्थ्य वाढत होते आणि या सामर्थ्याचा आपण केव्हा आविष्कार करतो असे राष्ट्र–धुरिणांना झाले होते. जनरल फ्रेडरिक फॉन बेरहार्डीसारखा लष्करी इतिहासकार 'जर्मनी आणि आगामी युद्ध' या ग्रंथात प्रतिपादन करीत होता –'युद्ध ही सामर्थ्यशाली राष्ट्राची अपरिहार्य

गरज आहे. राष्ट्रीय जीवशास्त्राचा तो सिद्धान्तच आहे आणि म्हणून आपण आता फ्रान्सचा असा नि पात केला पाहिजे की तो पुन्हा कधीही डोके वर काढू शकणार नाही '

बेरहार्डीचा हा सदेश कृतीत आणण्याचा क्षण जवळ येऊन ठेपला आहे असे जर्मनीला वाटू लागले.

एक जुलै एकोणिसशे चौदा या दिवशी 'पँझर' नावाची जर्मन युद्धनौका मोरोक्कोच्या आदागिर बदरात येऊन उभी राहिली.

केवळ फ्रान्सच नव्हे तर युरोपमधील अनेक लहान मोठे देश थरकले. जर्मनी साऱ्या युरोपशी मुकाबला करायला सिद्ध झाला आहे याची ती नादी होती. अशा परिस्थितीमध्ये फ्रान्स एकाकी नाही याची जर्मन नेत्याना जाणीव करून देण्यासाठी ब्रिटनचा अर्थमत्री लॉईड जॉर्ज याने जाहीर केले '–जर्मनीन फ्रान्सवर आक्रमण केल तर आम्ही फ्रान्सच्या बाजून उभ राहू हे कैसरनं ध्यानात घ्यावं.'

कैसरच्या मनात कोणते विचार घोळत आहेत याचा आता ब्रिटिश नेत्यानाही अदाज आला होता. प्रधानमत्री ॲस्क्विथ याने सरक्षण–समितीची बैठक बोलावून, आपण फ्रान्सला किती लष्करी मदत देऊ शकू याचा तपशील निश्चित करायला प्रारभ केला त्याचप्रमाणे ब्रिटिश आणि फ्रेंच सेनानी याच्या वाटाघाटी सुरू झाल्या.

जर्मनी कितीही प्रक्षोभक हालचाली करीत असला तरी तो प्रत्यक्ष युद्धाला हात घालणार नाही असे फ्रान्समधल्या समाजवाद्याना वाटत होते. जॉरेसारखा समाजवादी नेता म्हणत होता–'इतर कोणत्याही देशापेक्षा जर्मनीतला समाजवादी पक्ष अधिक बलवान आहे. त्यामुळे तो आपल्या सरकारला युद्धापासून खचित परावृत्त करील अशी आमची खात्री आहे '

जोसेफ कय्यो हा नवमतवादी नेता त्यावेळी फ्रान्सचा प्रधानमंत्री होता. युद्धाच्या सभाव्यतेबाबत त्याचे जॉरेसारखेच मत होते. जर्मनीशी आपण आर्थिक आणि व्यापारी करार केला तर तो युद्धाच्या वाटेला जाणार नाही असा त्याला विश्वास वाटत होता. त्यामुळे त्याने आपल्या परराष्ट्रमत्र्याला न कळविता जर्मनीशी वाटाघाटी सुरू केल्या. जर्मनीला उत्तर आफ्रिकेमध्ये बाजारपेठ दिली की तो शात होईल अशी कय्यो याची कल्पना होती. त्यामुळे त्याने फ्रेच कागोचा बराच मोठा भूभाग जर्मनीला देऊन टाकला. कय्योच्या या औदार्याच्या बदल्यात जर्मनीने मोरोक्कोवरील फ्रेच वर्चस्वाला मान्यता दिली. परतु हे औदार्यही नाममात्रच होते. कारण मोरोक्कोतील जर्मन व्यापार अबाधित राहील अशी जर्मनीने कय्यो याच्याकडून कबुली घेतली होती.

आपण युद्ध टाळण्यात यशस्वी झालो यामुळे कय्यो स्वत वर खूष होता. परतु नमते घेऊन युद्ध टळत नसते, ते काही काळ पुढे ढकलले जाते इतकेच, हे कय्यो याला पुढे कळून आले.

कय्यो याने जर्मनीशी केलेला करार प्रसिद्ध होताच प्रतिनिधिसभेमध्ये त्याचे पडसाद उमटले कय्यो याचे हे भूदान आपल्याला मजूर नाही असे अनेक प्रतिनिधींनी सांगितले. त्यामुळे शेवटी कय्यो याला प्रधानमंत्रिपदाचे त्यागपत्र द्यावे लागले.

त्याच्या जागी रेमद पुअँकरे आला तो जर्मनीलगतच्या लॉरेन प्रांताचा रहिवासी असल्यामुळे जर्मनीबाबत तो कय्यो याच्यापेक्षा सावध होता. जर्मनीची युद्धाची खुमखुमी कागदी करारांनी शमणार नाही हे त्याला माहित होते. आपल्याला युद्ध नको असले तरी लष्करवादाने भारलेला आपला शेजारी आपल्याला स्वस्थ बसू देणार नाही आणि म्हणून आपण आतापासूनच आत्मरक्षणाच्या तयारीला लागले पाहिजे असे त्याने आपल्या मनाशी पक्के केले.

स्वभावत: शांततावादी असलेला फ्रान्स ही वस्तुस्थिती ध्यानात घेईल काय हा खरा प्रश्न होता त्यातून त्यावेळी राजकीय पक्षाचा बुजबुजाट झालेला होता, आणि त्यांतून बरेचसे पक्ष आपण शांततावादाचे अग्रदूत आहोत अशा थाटात वावरत होते. त्यामुळे सरकारला ठाम धोरण स्वीकारता येत नव्हते क्लेमेन्सोसारखा एरवी जागरूक असलेला नेतादेखील यावेळी शांततेची जपमाळ ओढत होता. सिनेटमध्ये बोलताना तो म्हणाला, 'आम्ही शांततावादी आहोत फ्रान्सच्या आर्थिक विकासामध्ये व्यत्यय येऊ नये म्हणून आम्ही शांततेचा आग्रह धरीत आहोत. मात्र आम्ही शांततावादी असलो तरी शरणागतिवादी नाही जर का आमच्यावर युद्ध लादलं गेलं तर आम्ही आमची जबाबदारी पार पाडल्याशिवाय राहणार नाही.'

प्रधानमंत्रिपद स्वीकारल्यानंतर वर्षभराच्या आतच म्हणजे एकोणिसशे तेरामध्ये पुअँकरे याची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली. लागलीच त्याने सक्तीच्या लष्करी नोकरीची मुदत दोन वर्षांऐवजी तीन वर्षे करण्याचा मनोदय व्यक्त केला. त्याच्या


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागावरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागावरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

या सूचनेला संसदेने नाखुषीनेच संमती दिली कारण समाजवादी आणि नवमतवादी अशा दोन प्रमुख पक्षांना सक्तीच्या लष्करी नोकरीसंबंधी आतून तिटकाराच होता. त्यांच्यासारख्या शांततावाद्यांना सक्तीच्या लष्करी नोकरीमध्ये आक्रमक वृत्तीची बीजे दिसत होती.

एकोणिसशे चौदा साल उजाडले तेव्हा फ्रान्समध्ये सार्वत्रिक निवडणुकीचे वारे वाहू लागले. नवमतवादी आणि समाजवादी कार्यकर्ते मतदाराना सागू लागले, 'तुम्ही जर आम्हाला निवडून दिले तर आम्ही पुन्हा सक्तीच्या लष्करी नोकरीची मुदत दोन वर्षांवर आणून ठेवू.' लोकात्ताही तेच हवे होने त्यामुळे या निवडणुकीत जॉरेच्या समाजवादी पक्षाला एकशे चार आणि कय्योच्या नवमतवादी पक्षाला एकशे बहात्तर जागा मिळाल्या.

हा निकाल म्हणजे फ्रेंच मतदारानी शांततावाद्यांच्या बाजूने दिलेला नि संदिग्ध कौल होता.

युद्ध टाळण्याचा जॉरे-कय्यो याचा प्रयत्न कदाचित काही काळ यशस्वी ठरला असता. परतु अनेक वेळा आकस्मिक घटनांनीच इतिहासाचा प्रवाह वेगळ्या दिशेने धावू लागतो. त्यादृष्टीने एकोणिसशे चौदा साल महत्त्वाचे ठरते. या वर्षात तीन राजकीय हत्या झाल्या. यातल्या दोन तर खुद्द पॅरिसमध्येच घडल्या होत्या.

पॅरिसमधले 'ल फिगारो' हे प्रमुख वृत्तपत्र जुन्या मताचे पुरस्कर्ते होते त्यामुळे साहजिकच या वृत्तपत्राने पहिल्यापासून कय्योवर टीकेची धार धरली होती. सरकारी उत्पन्न वाढावे म्हणून लोकावर प्राप्तीकर बसवावा अशी कय्यो याने सूचना करताच 'प्राप्तीकर म्हणजे लोकाची राजरोस लूट आहे' असे मत ल फिगारो'ने व्यक्त केले. इतकेच नव्हे तर या निमित्ताने, 'ल फिगारो'चा सपादक गॅस्तन कामेत्त याने कय्यो याच्याविरुद्ध प्रचाराची आघाडीच उघडली. 'ल फिगारो'च्या स्तंभामधून दररोज कामेत्त याच्या सहीचे लेख प्रसिद्ध होऊ लागले. कय्योचा शांततावादही कामेत्त याला मजूर नव्हता. कय्योला जर्मनीसबधी आपलेपणा वाटत असल्यामुळेच तो शांततेचा पुरस्कार करीत आहे, म्हणजेच पर्यायाने त्याच्या हातून देशद्रोही वर्तन घडत आहे असेही कामेत्त याने लिहिले.

'ल फिगारो'ला उत्तर देण्याची सधी कय्योही दवडत नव्हता. त्यामुळे कामेत्त आणि कय्यो याच्यातील वैर अधिकच भडकले. यातच कय्योच्या प्रेम-प्रकरणाचा कामेत्त याला सुगावा लागला. कय्यो विवाहित होता आणि त्याची प्रेयसीही विवाहित होती. त्या दोघांमधील गुलाबी पत्रव्यवहार कय्योच्या पत्नीच्या हाती पडला तेव्हा तिने तो सरळ कामेत्त याच्या स्वाधीन केला. मग काय, कय्योविरुद्ध लोकमत कलुषित करायला कामेत्त याला हुकुमी साधन मिळाले. मध्यतरीच्या काळात कय्योने आपल्या पहिल्या पत्नीपासून घटस्फोट घेऊन आपल्या प्रेयसीशी

विवाह केला होता. तरीही कामेत्तची लेखणी थंडावली नाही. कय्योच्या नव्या वैवाहिक जीवनातील मदभरा तपशील तो मोठ्या चवीने आपल्या वाचकांना सांगत होता.

त्यामुळे नवी मादाम कय्यो भडकली आणि एक दिवस सरळ कामेत्तच्या कचेरीत जाऊन तिने त्याच्यावर पिस्तुल रोखले. कामेत्त तिच्या हातातले पिस्तुल ओढून घेणार तोच ती मागे सरली आणि क्षणभरातच कामेत्त रक्ताच्या थारोळ्यात निश्चेष्ट पडला होता. मादाम कय्योच्या पिस्तुलातील सहा गोळ्या त्याच्या पोटात घुसल्या होत्या.

चौदा मार्च एकोणिसशे चौदा या दिवशी हा प्रकार घडला. साऱ्या देशभर दुसऱ्या दिवशी या घटनेची चर्चा होत होती. पुढे मादाम कय्योवर खटला भरण्यात आला. 'कय्योला ठार करायचा आपला उद्देश नव्हता. चुकून आपल्या पिस्तुलातून गोळ्या सुटल्या' असा तिने न्यायालयापुढे जबाब दिला, आणि गमतीची गोष्ट अशी की ज्यूरींनी तो खरा मानून मादाम कय्यो हिला सोडून दिले. तरीदेखील कामेत्तच्या लिखाणामुळे कय्यो याची भरपूर बदनामी झाली होती आणि म्हणून त्याने मंत्रिपदाचे त्यागपत्र देऊन सार्वजनिक जीवनाला रामराम ठोकला.

मादाम कय्योवरील खटल्याचा निकाल अठ्ठावीस जुलैला लागला आणि त्यानंतर तीन दिवसांनी पॅरिसमध्ये आणखी एक खून पडला. उजव्या गटाच्या एका माथेफिरूने जॉरे या समाजवादी नेत्याला ठार केले. कय्योची निवृत्ती आणि जॉरेचा खून या दोन घटनांचा फ्रान्सच्या तत्कालिन राजकारणावर बराच परिणाम झाला.

शांततावादी पक्षाचे दोन प्रमुख नेते अशा रीतीने राजकीय रंगमंचावर अदृश्य झाल्यामुळे फ्रेंच जनमानस खडबडून जागे झाले आणि भोवताली काय घडत आहे याचे वेध घेऊ लागले.

जॉरेचा खून होण्याच्या एक महिना अगोदर, पॅरिसपासून एक हजार मैल दूर असलेल्या साराजेव्हो या गावात अशीच एक राजकीय हत्या घडली होती.

ऑस्ट्रिया-हंगेरीच्या सिंहासनाचा वारस फ्रान्सिस फर्डिनंड आपल्या पत्नीला घेऊन बोस्नियाच्या दौऱ्यावर गेलेला असताना साराजेव्हो येथे अठ्ठावीस जून रोजी एका सर्बियन नागरिकाने त्या दोघांना कंठस्नान घातले. पहिल्या जागतिक महायुद्धाचा भडका उडायला ही हत्या कारणीभूत ठरली.

या युद्धाचे भाकित बिस्मार्कने व्यक्तविले होते. हा जर्मन मुत्सद्दी अठराशेनव्वदमध्ये प्रधानमंत्रिपदावरून बडतर्फ झाल्यानंतर आणखी आठ वर्षे हयात होता. मृत्यूपूर्वी आपल्या मित्राशी बोलताना तो म्हणाला होता, "बाल्कन राष्ट्रांकडून लहानशी चूक घडली तरी त्यातून साऱ्या युरोपला ग्रासून टाकणारं युद्ध भडकेल हे मला स्पष्ट दिसत आहे."

बिस्मार्कचा मृत्यू होऊन आता सोळा वर्षे होऊन गेली होती आणि त्यामुळे त्याचे भाकित कोणाच्याही स्मरणात नव्हते. एका राजपुत्राच्या खुनापायी युरोपची सारी भूमी रक्ताने न्हाऊन निघेल असे फ्रेंच नागरिकाना वाटले नाही. नुसत्या फ्रेंच नागरिकांनाच नव्हे इंग्लिश, जर्मन, ऑस्ट्रियन किंवा रशियन नागरिकानाही भीषण परिणामाची त्यावेळी कल्पना आली नाही. युद्ध काही एवढ्यात भडकत नाही असे या बड्या राष्ट्रांचे मुत्सद्दीही मानत होते.

कोणाच्याही ध्यानीमनी नसतानादेखील परिस्थिती चटकन पेट घेते याचा त्या वेळी युरोपला प्रत्यय आला.

तसे पाहिले तर फ्रान्सिस फर्डिनंडच्या खुनामुळे एकटा ऑस्ट्रिया-हंगेरी काय तो सतप्त झाला होता. इतराना या खुनाचे सोयर सुतक नव्हते. ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्यासबंधी बाल्कन राष्ट्राना म्हणजे मुख्यत स्लाव्ह वंशीय लोकाना कमालीचा तिरस्कार वाटत होता. त्यामुळे या खुनामागे सर्वियन सरकारचा हात असला पाहिजे अशी ऑस्ट्रिया-हंगेरीने सोयीस्कर समजूत करून घेतली आणि ही सधी साधून आपल्या साम्राज्याविरुद्ध असंतोष भडकविणाऱ्या स्लाव्ह लोकाना धडा शिकवायचे त्याने ठरविले आपल्या या निर्णयाचे दूरगामी परिणाम होतील, इतकेच नव्हे तर या वणव्यात आपली स्वतःचीच आहुती पडेल याची ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याला मुळीच कल्पना आली नाही. त्यामुळे सर्वियाला आपण सहज चिरडून टाकू अशा विश्वासाने ऑस्ट्रिया-हंगेरीने अठ्ठावीस जुलै एकोणिसशे चौदा या दिवशी चिमुकल्या सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले.

हा संघर्ष मर्यादित स्वरूपाचा राहील ही ऑस्ट्रिया-हंगेरीची कल्पना चुकीची ठरण्यामागे अनेक कारणे होती.

आपले राष्ट्रीय अस्तित्व सिद्ध करायला अनेक लहान युरोपीय देश उत्सुक झाले होते; मोठ्या राष्ट्रांची लष्करी सामर्थ्याच्या बाबतीत चुरस लागली होती, सर्व प्रमुख राष्ट्रांची दोन गटात विभागणी झालेली होती, एकोणिशे बारा-तेरा मधल्या बाल्कन युद्धामुळे तुर्कस्तानला युरोपातून हाकलण्यात आले होते, ऑस्ट्रिया-हंगेरी आणि बाल्कन राष्ट्रे यांच्यातील तणातणी वाढली होती, रशिया आणि ऑस्ट्रिया-हंगेरी याचे सबंध तुटण्याच्या बेतात आले होते—दारूचे कोठार भरलेले असावे आणि लहानशी ठिणगी पडण्याचाच काय तो अवकाश असावा अशी त्यावेळी युरोपची अवस्था होती.

फ्रान्सिस फर्डिनंडचा खून तेवढी ठिणगी टाकायला पुरेसा ठरला.

ऑस्ट्रिया-हंगेरीने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारताच, रशियाने ऑस्ट्रिया-हंगेरीच्या सीमेवर सैन्याची जमवाजमव सुरू केली. लागलीच जर्मनीने रशियाला बजावले— ' ऑस्ट्रिया-हंगेरीच्या सीमेवरच तुमचं सैन्य बारा तासाच्या आत माग गेल पाहिजे."

तसे करायला रशियाने नकार देताच जर्मनीने एक ऑगस्टला रशियाविरुद्ध युद्धाची घोषणा केली.


फ्रान्सला दटावण्याची संधी जर्मनी थोडीच सोडणार होता ! कैसरने पॅरिसकडे खलिता धाडला— ' या संघर्षामध्ये फ्रान्स तटस्थ राहणार आहे की नाही याच आम्हास अठरा तासांच्या आत जबाब मिळाला पाहिजे. त्याप्रमाणे तुमच्या तटस्थतेची हमी म्हणून तूल आणि व्हर्दू येथील किल्ले आमच्या स्वाधीन व्हायला हवेत. '

या खलित्याला फ्रान्सने एक ऑगस्टला उत्तर धाडले— ' आमच्या हिताच्या दृष्टीने उचित वाटणारी कृती आम्ही करू. ' या उत्तराचा अर्थ स्पष्ट होता. फ्रान्सचे हे उत्तर मिळताच जर्मनीने तीन ऑगस्टला फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारले.

जर्मनीच्या युद्धज्वराचा पारा खूपच वर चढला होता.

अद्याप फक्त ब्रिटनची भूमिका स्पष्ट झाली नव्हती. परंतु चार ऑगस्टला जर्मनीने बेल्जमवर हल्ला चढवून ब्रिटनलाही युद्धामध्ये ओढले. इंग्लिश खाडीपलीकडचा किनारा जर्मनीच्या ताब्यात जाणे ब्रिटनच्या दृष्टीने गैरसोयीचे होते. म्हणून ब्रिटनने अगोदरच बेल्जमच्या सुरक्षिततेबद्दल ग्वाही दिलेली होती. त्यामुळे जर्मन सैन्य ब्रुसेल्सच्या रोखाने वाटचाल करू लागताच ब्रिटनने जर्मनीला निर्वाणीचा खलिता धाडला— ' बेल्जममध्ये घुसलेले तुमचे सैन्य ताबडतोब मागे न्या. '

ब्रिटनचे ते पत्र मिळताच जर्मन प्रधानमंत्री बेथाम-हॉल्वेग खवळला. त्याने बर्लिनमधल्या ब्रिटिश राजदूताला बोलावून घेऊन सांगितले— ' ब्रिटन जर्मनी-



सारख्या मित्रराष्ट्राकडून अशी अपेक्षा करीत आहे याचा मला अर्थच समजत नाही शेवटी ब्रिटननं बेल्जमबरोबर केलेला करार म्हणजे कागदाचा एक कपटाच ना! ब्रिटनन त्या कपटयाला एवढं महत्त्व का द्याव ? "

जर्मनी बेल्जममधून आपले सैन्य मागे घ्यायला बिलकुल तयार नाही हे या उत्तरावरून ब्रिटिश राजदूताच्या ध्यानात आले. त्यामुळे ब्रिटनने जर्मनीविरुद्ध यद्धाचा पुकारा केला.

अशा रीतीने कोणालाही कल्पना नसताना, युरोपच्या भूमीवर शस्त्रांचा खण-खणाट निनादू लालला.

हे महायुद्ध दीर्घकाळ चालू ठेवण्याची कोणत्याही एका राष्ट्राच्या अगात ताकद नाही हे सर्वांनाच माहीत होते. त्यामुळे हा वणवा लवकरच विझेल असा प्रत्येक जण आपल्या मनाला दिलासा देत होता— आणि तरीही हे अग्निकुड पधराशे-चौसष्ट दिवस धडधडत होते

जगाने एवढा मोठा रणसग्राम यापूर्वी कधीही अनुभवला नव्हता.

फ्रान्स, ब्रिटन आणि रशिया ही तीन राष्ट्रे एका बाजूला उभी होती तर दुसऱ्या बाजूला जर्मनी आणि ऑस्ट्रिया-हगेरी याचे सामर्थ्य एकवटले होते. त्याच्या गटा-तील इटालीने, आपल्याला न विचारता युद्धाची घोषणा करण्यात आली अशी सबब सागून तटस्थ राहण्याचे ठरविले. या युद्धापासून इटालिला बाजूला ठेवण्याचे श्रेय देल्कासेच्या मुत्सद्देगिरीला दिले पाहिजे. इटालीचा हा निर्णय फ्रान्सच्या पथ्यावर पडला. कारण त्यामुळे एकाचवेळी दोन आघाडयावर लढण्याची आपत्ती टळली.

जर्मनीच्या आघाताचा मुख्य भार आपल्यालाच सहन करावा लागणार आहे हे फ्रेच नेत्याना उमगले. मात्र या शक्तिशाली शत्रुविरुद्ध आपल्या एकटयालाच लढावे लागणार नाही हेही त्याना माहीत होते. जर्मनीला पूर्व आघाडीवर रशियाशी मुकाबला करावा लागणार असल्यामुळे आपले सारे सामर्थ्य प्रत्येक आघाडीवर एकवटणे त्याला शक्य होणार नाही या जाणीवेमुळे फ्रान्सला बराच दिलासा मिळाला. शिवाय स्वत.च्या हिताकरिता का होईना, ब्रिटन यावेळी फ्रान्सच्या मदतीला येणार होते. अर्थात् जर्मन सैन्याशी तुलना करता ब्रिटनचे सामर्थ्य अगदीच तोकडे होते. म्हणजे पश्चिम आघाडीपुरती सारी जबाबदारी मुख्यतः फ्रान्सलाच स्वीकारावी लागणार होती.

आपल्या सामर्थ्यापुढे फ्रान्सचा टिकाव लागणार नाही याबद्दल जर्मन सेनानी पैज मारायला तयार होते. इतकेच काय खुद्द फ्रेच लोकांनाही ती भीती वाटत होती. त्यातून फ्रेंच समाजवाद्यांचा युद्धाला पहिल्यापासून विरोध होता. फ्रान्सने युद्धात भाग घेतला तर आपण सार्वत्रिक सप पुकारू अशी ते सरकारला उघड

धमकी देत होते. कामगार आपल्या नेत्याचे ऐकतात की आपले ऐकतात यासंबंधी सरकारला निश्चित असे काहीही सागता येत नव्हते. त्यातून ज्या दिवशी जर्मनीचा खलिता आला त्याचदिवशी जॉरेसारख्या नामवत समाजवादी नेत्याचा खून झाला होता. त्यामुळे युद्धाला प्रारंभ होताच कामगारवर्ग उठाव करील की काय ही भीती फ्रेंच सरकारला भेडसावत होती. म्हणून तर आघाडीवर पाठवायच्या सैन्यापैकी एक रेजिमेंट बंदोबस्तासाठी पॅरिसमध्ये ठेवण्यात आली.

परंतु महायुद्धाची धग जाणवू लागताच फ्रान्समध्ये चमत्कार घडून आला.

आपल्या देशाच्या सीमेवर शत्रु उभा ठाकला आहे ही जाणीव होताच, सारा फ्रेंच समाज एकदिलाने सरकारच्या पाठीशी गोळा झाला. ज्यानी पूर्वी लष्करी शिक्षण घेतलेले आहे अशा तरुणापैकी किमान तेरा टक्के तरुण लष्करात भरती व्हायला नकार देतील अशी युद्धखात्याची अपेक्षा होती. परतु नकार देणाऱ्यांचे प्रमाण अवघा दीड टक्का होते. लष्कर-भरतीच्या केंद्रांभोवती तरुणाच्या रागा दिसू लागल्या पहिल्या काही दिवसातच साडेतीन लाख तरुणानी आपली नावे नोंदविली. याशिवाय निवृत्त झालेल्यापैकी तीन हजार जण पुन्हा लष्करात दाखल झाले. युद्धाला विरोध असणाऱ्या अडीच हजार राजकीय कार्यकर्त्यांची सरकारजवळ यादी होती. त्यानी युद्ध-विरोधी निदर्शने सुरू केली तर त्याना तात्काळ अटक करण्याचे सरकारने ठरविले होते. पण ती वेळ आलीच नाही. कारण यापैकी दोन हजार कार्यकर्त्यांनी सैन्यात भरती व्हायला आपण तयार आहोत असे सरकारला कळविले.

आक्रमणाचे सकट निर्माण होताच आपले अंतर्गत मतभेद बाजूला सारून फ्रेंच नागरिक एवढा उत्साह दाखवतील याची सरकारलाही प्रारंभी कल्पना नव्हती.

राष्ट्राध्यक्ष पुअँकरे याने चार ऑगस्टला प्रतिनिधिसभेपुढे युद्धाचा जाहीरनामा वाचून दाखविला तेव्हा लोकप्रतिनिधींनी समतिदर्शक टाळ्याचा गजर करून सभागृह दणाणून सोडले. जॅक मॉदा या इतिहासकाराने लिहिले आहे— 'एकोणिसशे चौदामधला हा कालखंड फ्रान्सच्या इतिहासातील गौरवास्पद कालखड आहे. लोकाच्या स्वयस्फूर्त एकजुटीमुळेच फ्रान्स परकीय आक्रमणाशी यशस्वी मुकाबला करू शकला. या देशात प्रजासत्ताक राजवट होती म्हणूनच हे घडू शकले. म्हणून तेव्हापासून जातिवत फ्रेंच देशभक्ताना आपल्या प्रजासत्ताकाविषयी अपरपार जिव्हाळा वाटू लागला.'

लोकाच्या एकजुटीची राजकीय पक्षानाही दखल घ्यावी लागली. अठ्ठावीस ऑगस्टला प्रधानमत्री रेने व्हिव्हिआनी याच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाले. त्यात कट्टर उजव्या पक्षापासून जहाल डाव्या गटापर्यंत सर्व पक्षोपपक्षाचा समावेश होता. नतर संसदेची बैठक बोलाविण्यात आली. या बैठकी-

मध्ये सरकारी युद्धप्रयत्नांना संपूर्ण पाठिंबा देण्याचा ठराव एकमताने संमत झाला. एवढेच नव्हे तर देशरक्षणाच्या कार्यामध्ये गुंतलेल्या लष्कराला राजकीय पुढाऱ्यांकडून कोणतीही विचारणा होऊ नये म्हणून संसदेने आपली बैठक बेमुदत स्थगित केली.

या संधीचा फायदा घेऊन लष्करी अधिकारी प्रजासत्ताक उधळून लावून आपली हुकुमशाही प्रस्थापित करतील अशी लोकशाहीच्या उपासकांनादेखील शंका आली नाही. सारे सेनाधिकारी आणि सैनिक आपले कर्तव्य चोख बजावतील आणि आक्रमणापासून देशाचे संरक्षण करतील हा विश्वास प्रत्येकाच्या मनात प्रस्फुरित झाला होता.

मात्र प्रारंभीच्या काळात अपुऱ्या तयारीमुळे फ्रेंच लष्करावर माघार घेण्याची पाळी आली. ऑगस्टच्या अखेरीस तर फ्रेंच सेनेला एका जागी घट्टपणे उभे राहणेही जमेना. पॅरिसपासून काही मैल अंतरावर तोफांचा आवाज ऐकू येऊ लागला. अशा वेळी सावधगिरीचा उपाय म्हणून दोन सप्टेंबरला सरकारने पॅरिस सोडून बोर्दो येथे आपला मुक्काम हलविला.

चव्वेचाळीस वर्षांपूर्वी दोन सप्टेंबरलाच फ्रान्सने सेडान येथे शरणागतीच्या कागदावर स्वाक्षरी केली होती. तोच शत्रु यावेळी नव्या सामर्थ्यानिशी अंगावर धावून आला होता. एकोणीसशे चाळीसमध्ये पुन्हा एकदा तोच शत्रु फ्रान्सवर झेपावणार होता. आणि त्याही वेळेला सरकारवर पॅरिस सोडून जाण्याची पाळी येणार होती.

परंतु १८७० ची किंवा १९४० ची नामुष्की १९१४ च्या फ्रान्सने स्वीकारली नाही.

कारण त्यावेळी फ्रान्सला वेगळयाच चैतन्याने भारून टाकले होते.

( क्रमशः )



# रंगभूमी

## बाकी इतिहास

'**बा**की इतिहास' हे सोज्वळ बांधणीचे व संपृक्त आशयाचे रंगायनने सादर केलेले नाटक पाहून मला साने गुरुजींची आठवण झाली. राष्ट्रास स्वातंत्र्य मिळूनही समाज सुखी न झाल्याचे पाहून व सतत अन् वाढत्या अमानुषतेमुळे अस्वस्थ होऊन आत्मसमर्पण करणाऱ्या साने गुरूजींचे व 'बाकी इतिहास' या नाटकातील आत्महत्या करणाऱ्या प्रोफेसरचे फार जवळचे नाते आहे. मूळ बंगाली नाटकात हे आढळावे हा विलक्षण योगयोग आहे.

'बाकी इतिहास' अनेक धारांनी विचार स्त्रवणारे असे नाटक आहे. गाळात रुतत असताना रंध्रारंध्रातून धुमारे फुटावेत – जमीनीचे अस्तित्व नाकारून...अशा, जगण्याच्या प्रचंड आत्मकेंद्रीत आसक्ती असलेल्या माणसांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे हे 'बाकी इतिहास' नाटक! या आत्मकेंद्राला स्वतःमुळे अगर दुसऱ्यामुळे धक्का लागल्यावर आत्महत्येच्या टोकावरून आत्मनाश करून स्वतःचे दुबळे पुरुषत्व झाकणाऱ्या माणसांच्या जातीचा निषेध म्हणजे 'बाकी इतिहास' हे नाटक! स्वतःची कातडी बचावून त्वचेपार वासनांचे झेंडे फडकविणाऱ्या माणसांना आजपर्यंतच्या अमानुषतेच्या इतिहासापासून धडा घेऊन मानवतेची, माणुसकीची कास धरण्यासाठी झीज सोसून केलेले आवाहन म्हणजे 'बाकी इतिहास' हे नाटक!

'बाकी इतिहास' या ललितकृतीत एक नवीन तंत्र वापरलेले आहे. संपूर्ण मूळ नाटकावर दोन एकांकीकेंचे पुरःसरण (overlapping) केलेले आहे. नाटकाचे कथानक अतिशय साधे आहे. एका दिवसात घडलेले.

एक लेक्चरर (शरद) व त्याची पत्नी (वासंती) असे सुटसुटीत मध्यमवर्गीय पांढरपेशा कुटुंब. शरदला वर्तमानपत्राची कात्रणे जमविण्याचा छंद. (सामान्य माणूस घटनांची 'कात्रणे' जमवून आयुष्य 'समृद्ध' करतो. या दृष्टीने हे सूचक) वासंती नवोदित लेखिका. कथेच्या घटनाबीजासाठी अडून बसलेली. शरदचा मित्र सहज विनोदाने सुचवितो. वर्तमानपत्रात अनेक घटना असतात, त्यातूनच निवडा एखादी. शरद व वासंतीच्या ओळखीच्या एका प्रोफेसरांनी गळफास लावून आत्महत्या केल्याची बातमी आढळते. ही घटना अतिशय अनपेक्षित व धक्कादायक असते, पण त्यामुळे ते दोघेजण हादरून जात नाहीत. उलट कथेला घटना-



। अरविंद देशपांडे । सुलभा देशपांडे ।

बीज मिळाले म्हणून उल्हसित होतात (ही 'परदुःख शीतळ' मानून स्वतःचे सुख साधणारी सहज-संकुचित प्रवृत्ती!) या आत्महत्येचा अर्थ लावणारी एक कथा वासंती लिहिते. ती शरदला पसंत पडत नाही. शरद त्याच आत्महत्येचा दुसरा अर्थ लावणारी दुसरी कथा लिहितो. त्याच रात्री आत्महत्या केलेला प्रोफेसर अयोनीरूपात येऊन स्वतःच्या आत्महत्येचे वेगळेच कारण सांगतो. (त्याचा विचार पुढे केला आहे) शरदला ते पटते. प्रोफेसर सितानाथ शरदला विचारतो, 'मग तू आत्महत्या का करत नाहीस?' शरदला मरणाची कल्पना सहन होत नाही. भूत निघून जाते. शरदच्या मनात आत्महत्येचे विचार बळावतात, पण तेवढ्यात त्याचा मित्र त्याच्या प्रमोशनची बातमी घेऊन येतो व शरदचे आत्महत्येचे विचार बारगळतात.

असे हे या नाटकाचे कथानक. यामध्ये वासंती कथा लिहिते त्या कथानकाची एक एकांकिका होते व शरद कथा लिहितो त्या कथानकाची दुसरी एकांकिका होते. या दोन्ही एकांकिकेत मूळ नाटकातील पात्रांनीच नावे बदलून कामे केल्यामुळे वैचित्र्यपूर्ण पुरःसरण (overlapping) झालेले आहे. अर्थात या नाटकाचा दोष म्हणून असे सांगता येईल की या नाटकाचे तीनही अंक सुस्पष्ट सुटेसुटे आहेत. एरवी इतर नाटकात तीन अंक हे दातेरी चक्राप्रमाणे गुंफलेले असतात. त्यामुळे पहिला अंक संपल्यावर दुसऱ्या अंकाचा काही भाग आधीच आपल्या मनात तयार झालेला असतो. तसे या नाटकात होत नाही.

या नाटकात, ढोबळपणे पाहता, माणसाच्या आत्महत्येचे तीन मूलभूत विचार पाडलेले आढळतात. एक म्हणजे काही लोकांमुळे स्वतः उध्वस्त होणे, दुसरे स्वतः-

मुळेच स्वतः उध्वस्त होणे आणि तिसरे, सतत वाढत्या अमानुषतेमुळे मानवतेची गळचेपी थांबवू न शकण्यामागील स्वत च्या अपुरेपणामुळे स्वतः स्वतःतून उध्वस्त होणे! पहिली आत्महत्या दुसऱ्याचा निषेध आहे, दुसरी आत्महत्या स्वतःचा निषेध आहे आणि तिसरी आत्महत्या स्वत.सकट सगळ्याचा निषेध आहे.

वासती व शरद यानी लिहिलेल्या कथाचे कथानक सागण्यात स्वारस्य नाही. त्यामुळे नाटकाच्या पुढच्या प्रेक्षकाची गोडी कमी होईल. फक्त एवढे सांगता येईल की वासतीच्या कथानकात पहिला विचार आहे, व शरदच्या कथानकात दुसरा विचार आहे. प्रोफेसर सितानाथ स्वतःच्या आत्महत्येसंबंधी तिसरा विचार सागतात.

सूक्ष्मपणे विचार केला तर 'बाकी इतिहास' या प्रतिमेचा अर्थ उलगडतो. संपूर्ण भूतकाळ म्हणजे इतिहास असे म्हटले तर प्रत्येक माणसाच्या संपूर्ण इतिहासामध्ये त्याच्या स्वत च्या आयुष्याचा इतिहास व उरलेला (बाकी) इतिहास म्हणजे तो ज्या जगात राहतो, ज्या समाजात वाढतो त्याचा इतिहास असे दोन भाग होतात. प्रत्येक माणसाला इतिहास घडविण्याची संधी असते. मागच्या चुकांपासून बोध घेऊन चागला इतिहास, चागल्या परपरा घडण्याची शक्यता असते. पण सामान्य माणूस हा स्वतःच्या इतिहासातच एवढा रममाण होतो की 'बाकी इतिहास' हा फक्त शाळा-कॉलेजात मार्क मिळविण्यापुरताच राहतो. हा 'बाकी इतिहास' घडविण्यामध्ये सामान्य माणूस रस घेत नाही. मग ती होते काही मूठभर गुड विचाराच्या प्रतिष्ठित मासणाची मक्तेदारी. त्यामुळे घडतो सगळा अमानुष युद्धांचा 'बाकी इतिहास' ज्यामुळे भरडले जातात निरपराध, अश्राप कच्चेबच्चे जीव! ही माणुसकीची गळचेपी सामान्य जीवन जगणाऱ्या माणसाला जाणवतच नाही जोपर्यंत त्याचा गळा शाबूत असतो.

वास्तविक प्रत्येक सामान्य माणूस इथून तिथून एकच जिणे जगत असतो. पात्रे वेगळी असल्याने त्यात फरक पडत नाही. हेसुद्धा एका प्रसंगाने फार उठावदारपणे दाखवून दिले आहे...शरद व प्रोफेसरचे भूत यांचा संवाद चालू असताना वासंती अचानक येते. प्रोफेसर सितानाथ तिला कनक (प्रोफेसर पत्नी) म्हणून पुकारतो. वासतीही त्याला साथ देते. एवढेच नव्हे तर शरद व वासतीमध्ये सकाळी झालेले सवाद जसेच्या तसे त्या दोघात होतात! प्रोफेसर आपले आयुष्य कथन करत असताना शरदला त्या आयुष्याशी आपल्या आयुष्याचे विलक्षण साम्य आढळत असते. या संवाद–सूत्रात वरील प्रसंगाचे कलम बेमालूम व बहारदार झालेले आहे.

प्रत्येक माणसाचे जिणे एकच असते पण प्रत्येकजण आपल्या जिण्यासाठी नवनवीन प्रयोजने 'शोधून' काढत असतो. कित्येकवेळा आयुष्याचा असा वीट येतो, उद्वेग येतो की...पण मरण्याचे धाडस नसलेला माणूस स्वतःवर जगण्याची सक्ती करतो. वास्तविक त्याचवेळेस त्याने 'जगणे थांबविलेले' असते. तो अनेकवेळा

जगतो, मरतो पण शेवटी जगतोच...पण स्वतःचा इतिहास घडविण्यासाठी! 'बाकी इतिहासाचे' अस्तित्व नाकारून!... गाळात रुतत असताना रध्रारंध्रातून धुमारे फुटावेत...जमीनीचे अस्तित्त्व नाकारून!!

हे अतिशय विचार–संपृक्त नाटक आहे. पण नाटकाचे कथानक महत्त्वाचे आहे. विचार कथानकाच्या विविधांगानी फुलतात. फांदोफादी गुलमोहर फुलावे असे! असे हे अतिशय विचारप्रधान नाटक तोलणे अतिशय जोखमीचे काम होते. रंगायन यात यशस्वी झाले आहे. अरविंद देशपांडे व सुलभा देशपांडे या दोघाचीही कामे उत्कृष्ट झाली आहेत. या दोघांचा 'ट्रीबल रोल' पाहण्याजोगता आहे. या दोघानी प्रत्यकी तीन भूमिका, अतिशय जवळ जवळच्या असूनही तरल वेगळेपणा ठेवून चांगल्या केल्या आहेत. या दोघाच्याही अभिनयाविषयी दोष ठेवण्यास जागा नाही, परंतु काही शब्दोच्चरांविषयी जरा स्पष्ट लिहावे असे वाटते. भावविवश होऊन बोलताना शब्दावर जास्त मीड काढून बोलण्याची पद्धत कृत्रिम वाटते; अर्थात अभिनय उंची असल्यामुळे हे विशेष जाणवत नाही. या नाटकातील बाकीची पात्रे ही पूरक–पात्रे असल्यामुळे त्याच्या अभिनयास विशेष महत्त्व नव्हते, पण सर्वांच्या अभिनयातील टीमवर्क चांगले होते त्यामुळे नाटकाला उठाव आला.

या नाटकाचे नेपथ्य वेगळ्या प्रकारचे होते. या नाटकाला वापरलेले रेखा–नेपथ्य (skeleton settings) एकांकिका–स्पर्धांत जरी वापरत असले तरी या नाटकाला अशाप्रकारचे रेखा–नेपथ्य योजण्यात कल्पकता दाखवली आहे. काळ्याभोर पार्श्व-भूमीवर दारा–खिडक्यांच्या केवळ सांगाड्यानी उभारलेले रेखा–नेपथ्य सामान्य माणसाच्या जिण्यातील निरर्थकता (Nothingness) फार प्रकर्षाने प्रतीत करत होते. अशा रेखा–नेपथ्याला प्रकाश योजना फार कल्पक करावी लागते. कारण भिंती नसूनही, खिडक्यादारातून पडलेला प्रकाश 'खोलीत' पडला आहे याची जाणीव प्रेक्षकाला होणे आवश्यक असते. तसेच आत–बाहेरची जाणीव प्रकाश–योजनेवरच अवलंबून असते आणि हे सर्वार्थाने जाणवत होते. प्रकाशासारखे लवचिक माध्यम (Plastic medium) योग्य रीतीने हाताळल्यास किती परिणामकारक ठरते याचा हा उत्कृष्ट नमुना आहे. प्रोफेसराच्या भूताच्या आगमन व निर्गमन प्रसंगी केलेली प्रकाश योजना सस्मरणीय आहे. नाटकाची ध्वनियोजना व ध्वनि-संकलन वाखाणण्याजोगे आहे. सतार, मृदुंग वगैरे विविध वाद्याचा योग्य उपयोग केला आहे. एके ठिकाणी कुमार गधर्वांच्या तानाचे सर फार कल्पकपणे वापरले आहेत.

हे नाटक इतके चांगले असूनही दुर्दैवाची गोष्ट ही की पुण्यातील पहिल्या प्रयो-गाला फार कमी प्रेक्षक होते. असे होऊ नये. या चागल्या नाटकाला प्रेक्षकानी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा.

— विलास पतकी

यांच्याकडे साऱ्या हिंदुस्थानचे आणि देशोदेशीचे एकइंची नकाशे. भूगोलाची खडान् खडा माहिती आणि याच्या नकाशात दिल्ली, मुंबई, मद्रास अशा ढोबळ शहराना महत्त्व नाही तसे त्याचे उल्लेख आहेत. म्हणजे त्या शहरात त्यांचा व्यवहार चालतो. पण खरे 'स्ट्रॅटेजिक' महत्त्व असते उरण, रेवदंडा, वरसोवा, दमण, मुरुड अशा छोट्या बंदर-वजा खाड्यांना, कारण तिथूनच त्यांच्या मालाची ये जा होते.

आणि मुंबई, मद्रास, दिल्ली, कलकत्ता यासारख्या शहरात यांच्या मालाची देवाण घेवाण कोण करतो? स्मगलर्सना मदत करणारे म्हणजे सारेच लाल डोळ्यांचे, उग्र चेहऱ्याचे, अट्टल बदमाष असतात ही समजूत चुकीची. अतिशय सुसंस्कृत, शंका येणार नाही अशा स्थळी याचे व्यवहार चालतात. देवालये, चर्चेस, मशिदी, शानदार हॉटेले वगैरे कॉलेज तरुण, तरुणी, शालेय विद्यार्थी–सारे यांच्या उपयोगी पडतात. त्याना स्मगलर्स कसे म्हणता येईल?

कदाचित मस्तान, नैतमल हे फक्त शो बॉईज असतील. त्यांना हलविणारे हात आणखी वेगळेच असतील. कुणी सांगावे.

पण जॉर्ज फर्नांडिस म्हणतात, भारतीय राजकारणात सध्या कारखानदारांना, व्यापाऱ्यास कुणी विचारीत नाही. सध्या चलती आहे ती स्मगलर्सची. आणखी काही वर्षानंतर एक काळ असा येईल की तेव्हा सगळे राजकारण स्मगलर्सच्या हाताखाली गेले असेल.

वाचकहो! तुम्ही कुठल्या दुनियेत वावरत आहात? सेंट्रल बिल्डिंगमध्ये किंवा

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

सचिवालयात अप्पर डिव्हिजन क्लार्क आहात की कोणत्या मोठ्या कॉलेजात प्रोफेसर्स ? इंजिनियर आहात की डॉक्टर ? महिन्याला किती कमावता ? दोनशे, चारशे, हजार-दीड हजार ?—छी: व्यर्थ तुमचे जिणे ! हे हुशार डोक्याचे स्मगलर्स बघा कशी मौज करताहेत ते !

# दिल्लीचा सासुरवास

गेले काही दिवस राहून राहून लहानपणी ऐकलेले एक भुलाबाईचे गाणे तोंडात घोळते आहे हे गाणे म्हणजे एक खाष्ट सासू आणि तिची सून यांच्यातला संवाद.

सूनबाई आपल्या सासूला विचारते माहेरी जाण्याबद्दल. सासू सांगते, 'कारल्याचं बी पेर ग सुने, मग जा आपल्या माहेरा ऽऽ माहेरा—'

सून म्हणते, 'कारल्याचं बी पेरल हो सासूबाई, आता तरी जाऊ का माहेरा ऽऽ माहेरा—'

येथपासून हा सवाद सुरू होतो. सवाद चागलाच लाबलचक आहे. सासू मोठी खाष्ट. बी पेरल्यावर तरी तिन सुनेला सोडायचं की नाही ? पण नाही. बी पेरल्यावर आता त्याला कोब उगवू दे, कोब आल्यावर वेल वाढू दे, वेल वाढल्यावर त्याला कारली येऊ दे — असं सारख त्या सुनेचं माहेरी जाणं लांबणीवर पडत असत. शेवटी विचारी सून कारल्याची भाजी करते, ती खाते, भाडी घासते आणि पुन्हा विचारते, 'कारल्याची भाडी घासली हो सासूबाई, आता तरी जाऊ का माहेरा ऽऽ माहेरा—'

गाण्याचा शेवट नीटसा आठवत नाही. पण सासू काही सुनेला माहेरी सोडत नाहीच आणि शेवटी ती गरीब सून हाती धुण्याची काठी घेऊन आपल्या सासूला बदडून काढते.

दिल्लीची खाष्ट सासू आणि बेळगाव मागणारी सून — महाराष्ट्र कॉंग्रेस याच्यातला सवादही असाच भोडल्याच्या गाण्यात शोभणारा आहे. फरक एवढाच की ती सासू अमूक कर न् मग जा माहेरा — असं आशेच पाणी तरी लावते. पण इथे दिल्लीकरीण काहीच बोलत नाही. सूनबाईचच चालतं—२६ जानेवारीच्या आत बेळगाव मिळालं पाहिजे, बजेट सेशन सुरू व्हायच्या आत निर्णय लागला नाही तर बघून घेऊ, महाराष्ट्र दिनाच्या आधी बेळगाव मिळेलच, बजेट सेशन संपण्याच्या आत घोषणा झाली पाहिजे, जूनमधल्या ए. आय. सी. सी. बैठकीच्या आधी प्रश्न निकालात निघायलाच हवा — वगैरे.

बजेट सेशन सुरू झालं न् संपलंही. महाराष्ट्र दिन येऊन गेला, ए. आय. सी. सी. ची बैठकही संपली, पण बेळगाव अद्याप शिक्यावरच लटकून आहे. दिल्ली-वाल्यांना धमकी देण्याचे महाराष्ट्र कॉंग्रेसचे सारे बार फुसकट निघाले. त्या गाण्यातली सून शेवटी वैतागून सासूला बदडून तरी काढते. महाराष्ट्र कॉंग्रेस मात्र इकडे मुंबईत सासूबाईला बदडून काढण्याच्या मारे डरकाळ्या फोडते. पण सासू-बाईंनी नुसती भिवई वाकडी केली की हिचा पदर डोक्यावर आणि नजर खाली. बदडून काढण्याची गोष्टच सोडा.

काही विषय असे असतात की कितीही घृणा वाटली तरी त्यावर लिहिणे भाग पडते. नव्हे लिहिणे अपरिहार्य असते पुन्हा पुन्हा लिहावे लागते. दर चार दिवसानी वर्तमानपत्रामध्ये नियमितपणे बेळगावच्या भविष्याविषयी परस्पर विसगत बातम्या येत असतात. त्या वाचून वाचून कंटाळा येतो. पण बातम्या येणे थावत नाही. कधी महाराष्ट्र कॉंग्रेसची धमकी येते – अमुक तारखेच्या आत प्रश्न न्याय्य तत्त्वांवर सुटला नाही तर...वगैरे वगैरे (या बातम्या वाचून आजकाल कोणी घाबरत नाही. उलट त्या नव्या विनोदी वाङ्मयात जमा होतात म्हणे). कधी बेळगावचा नकाशा येतो. (बेळगावातल्या प्रत्येक गल्लीतून आणि बोळातून त्या शहराची फाळणी करण्याच्या बातम्या अतरा अतराने येऊन गेल्या आहेत. त्यावरही विश्वास ठवणे लोकानी सोडून दिले आहे) कधी राजकीय वर्तुळातून खात्रीलायकरीत्या समजते की या थाटात पतप्रधानानी बेळगावविषयी सुचविलेली 'नवी योजना' छापून येते. (बेळगाव जम्मू-काश्मीरमध्ये विलीन करावे येथपासून तो बेळगावचे स्वतंत्र नागरी राज्य वनवावे येथपर्यंत सर्व तऱ्हेच्या योजना या सदरात प्रसृत झाल्या आहेत.)

काही दिवसापूर्वी बेळगावमध्ये 'ओपीनियन पोल !' घेण्याबाबत विचार चालू असल्याची बातमी आली. फार छान होईल. गोव्यासारखा एकदाचा या प्रश्नाचा सोक्षमोक्ष तरी लागेल. पण तसे होईल असे काही दिसत नाही. 'कारल्याचं बी पेर गं सुने, मग जा आपल्या माहेरा ऽऽ माहेरा –' हेच पालुपद चालू राहणारसे दिसते. कारण या सूनबाईच्या अगात धुण्याची काठी हाती घेण्याइतपत धमक दिसत नाही.

नेहमीप्रमाणेच परवाही एक बातमी आली. पंतप्रधानांची 'नवी योजना.' सारे बेळगाव शहर आणि मैसूरात असलेला सगळा मराठी भाग महाराष्ट्राला देऊन टाकायचा ही ती योजना. पंतप्रधानाच्या बुद्धीचे कौतुक वाटते. एवढी सोपी योजना आजपर्यंत कुणाला कशी सुचली नाही ? पतप्रधानाना मात्र सुचली ! महाराष्ट्र कॉंग्रेस नेत्यानी बऱ्याच विचाराती ही योजना स्वीकारावयास हरकत नाही असे मत व्यक्त केल्याचे 'विश्वसनीय' गोटातून कळल्याचीही बातमी आली. आणि नंतर मुबई विमानतळावर पत्रकारांशी बोलताना अशी कोणतीही

योजना पंतप्रधानानी सागितली नाही असे मुख्यमत्री नाईक यांनी सांगून टाकले.

बातम्या या अशा असतात. गोल गोल फिरतात आणि उडून जातात पण त्या छापाव्या लागतात. मुबईत आता अशी नवी बातमी आहे की "१५ ऑगस्टपर्यंत बेळगाव नाही दिले तर..." अशा प्रकारची एक नवी धमकी महाराष्ट्र कॉंग्रेस लवकरच देणार आहे.

आता लिहिता लिहिता बातमी वाचली तीन ऑगस्टला महाराष्ट्र विधान-सभेचे अधिवेशन सुरू होणार आहे त्यापूर्वी या प्रश्नाचा निकाल लागेलच, असा विश्वास मुख्यमत्र्यानी व्यक्त केला आहे. हा निर्णय महाराष्ट्राच्या बाजूनेच असेल हे सागणे कठीण आहे असे ते म्हणाले

मला दाट शका आहे; तीन ऑगस्टनतर पुन्हा चालू अधिवेशन संपण्यापूर्वी हा निर्णय लागेलच असा विश्वास व्यक्त केला जाईल. आणि अधिवेशन सपल्यानतर पुन्हा पुढच्या अधिवेशनावर गाडी ढकलली जाईल.

यावेळी मात्र महाराष्ट्र नेत्याची भाषा वदललेली दिसते. "अधिवेशन सुरू होण्यापूर्वी निर्णय लागला नाही तर .." ही धमकीची भाषा पार गेली. कारण अनेक वेळ महाराष्ट्र नेत्यानी धमक्या दिल्या आहेत. आणि पतप्रधानाना आता या धमक्याचा फुसकेपणा माहीत झाला आहे. बेळगाव मिळत नाही म्हणून कोण माणूस इकडे मुबईतली खुर्ची सोडायला तयार होईल ? खुर्ची सोडायची धमक दाखविल्याशिवाय धमकीला अर्थ उत्पन्न होत नाही. दिल्लीच्या ससदेसमोर धरणे धरण्याची धमकी महाराष्ट्र कॉंग्रेसच्या खासदारानी घातली होती. पण कुणी या धमकीला भीक घातली नाही. शेवटी सगळयांच्या अपेक्षेप्रमाणे याही बाबतीत महाराष्ट्र कॉंग्रेसने शेपूट खाली केलेच.

बेळगाव महाराष्ट्राला मिळावा की नाही किंवा इतर अनेक महत्त्वाचे प्रश्न देशासमोर असताना बेळगावसारख्या विषयावर आदोलन करावे की नाही–हा प्रश्न वेगळा आहे, त्याची चर्चा करायची नाही, पण या प्रश्नाच्या बाबतीत जे पळपुटे, नेभळट, गादी–चिकटू राजकारण चालू आहे त्याची घृणा येते. सत्ता तर सोडायला नको, प्रश्न तडीला तर लावतो आहोत असे लोकाना दाखवायचे आहे, आणि केद्र सरकारच्या मर्जीविरुद्ध तर काही करायचे नाही–असा महाराष्ट्र कॉंग्रेसचा खाक्या. कोण विश्वास ठेवणार यांच्या प्रयत्नावर ?

**– अरुण गोसावी**

पृष्ठ १९ वरून

एकत्र आणून त्याच्यामधून इडोनेशिया हे एक महान्, एकसध व एकात्म राष्ट्र निर्माण करण्याच्या सुकार्नोच्या संकल्पनेमधूनही प्रचड व भव्य वास्तु बाधण्याचा सुकार्नोचा ध्यास व्यक्त झाला आहे असे अलीसजाहबाना याना वाटते सुकार्नोनी राष्ट्रनिर्मितीचा ध्यास अगदी लहानपणापासून घेतला. सुराबाया शहरात शाळेत शिकत असताना सुकार्नो सारेकत इस्लाम या सघटनेचे प्रमुख नेते तोक्रोमिनोतो यांच्या घरीच राहात असत. तोक्रोमिनोतो हे आपल्या ओजस्वी वक्तृत्वाने हजारो सामान्य लोकाना मोहिनी घालत असत सारेकत इस्लाम या त्याच्या सघटनेला मोठ्या प्रमाणात पाठिबा मिळाला त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे ही सघटना इस्लामविषयीच्या सामान्य माणसाच्या निष्ठेला आवाहन करीत होती. पुढे धर्माधिष्ठीत राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे नेते आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा आग्रह धरणारे समाजवादी विचारसरणीकडे कल असलेले नेते असे दोन तट पडून सारेकत इस्लाम सघटना दुभगली. धर्माधिष्ठीत राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या मुस्लीम नेत्यामध्येही सुधारणावादी आणि परंपरावादी अशी दुफळी होतीच. सस्कारक्षम वयात सुकार्नोनी मतामताचा हा गलबला ऐकला. इजिनियरची पदवी मिळवल्यानतर सुकार्नोनी बाडुगला प्रथम एक अभ्यासमडळ काढले आणि लवकरच त्याचे इडोनेशियाच्या राष्ट्रवादी पक्षात रूपातर केले. मात्र सुकार्नोनी पुरस्कारलेला राष्ट्रवाद हा मूलत. धर्मावर आधारलेला नव्हता हे लक्षात ठेवले पाहिजे. नव्वद टक्के जनता मुसलमान असतानाही सुकार्नोनी राष्ट्रवादी चळवळ धर्मविषयक समजुतीपासून व निष्ठेपासून शक्यतितकी अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केला. १९४५ साली त्यानी स्वतत्र इडोनेशियाची मार्गदर्शक तत्त्वे म्हणून ज्या सूत्राचा उद्घोष केला त्यात राष्ट्रवाद, आतरराष्ट्रीयवाद किंवा मानवतावाद, जनतेचे सार्वभौमत्व, सामाजिक न्याय व परमेश्वरावर श्रद्धा (हे ते मूळचे पचशील!) अशी पाच तत्त्वे होती.

त्यामुळेच सुकार्नोना दारूल-इस्लाम या धर्मवेड्या मुस्लीमाच्या सघटनेने केलेल्या बडाला इडोनेशियाच्या स्वातत्र्याच्या उदय होत असतानाच तोड द्यावे लागले इडोनेशिया हे इस्लामी गणराज्य म्हणून घोषित केले जावे असा दारूल-इस्लाम सघटनेचा आग्रह होता सुकार्नोनी तो मानला नाही. निवडणुकीच्या वेळी इस्लामचा चादतारा हे प्रतीक निवडणाऱ्या मासजुमी या सुधारणावादी मुसलमानाच्या त्यातल्या त्यात मवाळ मानल्या गेलेल्या पक्षसघटनेलाही सुकार्नोचा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद रुचणे शक्य नव्हते. मग नहादतुल-उलेमा या परंपरावादी मुल्ला-मौलवीच्या पक्षाने सुकार्नोना सतत विरोध केला असेल तर त्यात नवल नाही.

धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद रुजू शकत नाही व त्याला एकीकडून धर्मवेडे मुसलमान व दुसरीकडून देवधर्म न मानणारे कम्युनिस्ट जबरदस्त आव्हान देत आहेत ही स्थिती लक्षात येताच या तिन्ही विचारसरणीचा समन्वय साधता येईल असे सुकार्नोना वाटले म्हणूनच इडोनेशियात १९६५ पूर्वीच्या काही वर्षात राष्ट्रवाद, धर्म व कम्युनिझम याचा मिलाफ घडवून आणण्याची घोषणा (नॅसाकोम) सुकार्नोनी दिली होती.

## विरोधी टीका

१९५९ नंतर सुकार्नोनी कम्युनिस्ट पक्षाला रान मोकळे सोडले व दोन्ही सत्ता-गटात सामील न होण्याचे आपले सुरुवातीचे धोरण सोडून सुकार्नो उघडउघड लाल चीनकडे झुकले याबद्दल त्याच्यावर अनेकानी टीका केली. १९६५ चे कर्नल उंटूगचे बड फसल्यानतर इडोनेशियामध्ये लाखो लोकाना कम्युनिस्ट समजून किंवा कम्युनिस्टाचे सहप्रवासी ठरवून ठार मारण्यात आले. कम्मुनिस्टाचे हे शिरकाण केल्याबद्दल मारेकऱ्याची आनदाने पाठ थोपटणाऱ्या किंवा आडवळणाने या कत्तलीचे समर्थन करणाऱ्या आपल्याकडच्या मडळीत एरवी भारतातील धमवेडचा मुसलमानावर जळजळीत शब्दात हल्ला करणारे हिंदू-राष्ट्रवादी आहेत तसेच सास्कृतिक स्वातत्र्याचा पुकारा करणारे व मुसलमान समाजाचे आधुनिकीकरण झाले पाहिजे अशी आरोळी ठोकणारे आधुनिक विचारवतही आहेत इडो-नेशियातील कम्युनिस्ट मानल्या गेलेल्या लाखो लोकाची कत्तल करण्यात इडो-नेशियातील धर्मवेडचा व परपरावादी मुस्लीम सघटनानी पुढाकार घेतला होता ही वस्तुस्थिती आपल्याकडले हे दोन्ही गट सोयीस्करपणे विसरतात. जनरल सुहार्तोच्या लष्करी राजवटीने कम्युनिस्टाच्या कत्तलीला आळा घालण्याचे प्रयत्न केले नाहीत. कारण असे होणे त्याच्या फायद्याचे होते अखेरच्या काळात कम्यु-निस्ट पक्षाला पाठीशी घालणाऱ्या सुकार्नोनी १९४८ साली झालेले कम्युनिस्टाचे बड मोडून काढले होते हेही विसरले जाते. १९४८ सालच्या बडाचा सूत्रधार असलेला कम्युनिस्ट नेता मुसो याने तेव्हा सुकार्नो जपानचे हस्तक व अमेरिकेचे बगलबच्चे आहेत असे म्हटले होते म्हणजे सुकार्नोना सुरुवातीला अमेरिकेचे हस्तक म्हटले जाई तर अखेरच्या काळात ते कम्युनिस्टाचे पित्ते आहेत अशी त्याची सभावना होत असे

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानी फौजानी इडोनेशिया व्यापला व सुकार्नो आणि डॉ. महमद हाटा या दोन प्रसिद्ध राष्ट्रवाद्याना मुक्त करून त्याचे सहकार्य मागितले. त्यापैकी हाटानी जपानविरुद्ध चाललेल्या भूमिगत आदोलनाशी सुरुवाती-पासून सपर्क साधला होता. या भूमिगत आदोलनाचे सूत्रधार सुतान शहरीर हे समाजवादी नेते होते. त्या काळात लिहिलेल्या एका पुस्तिकेत शहरीरनीही 'जपानच्या हातातील हत्यार' असे सुकार्नोचे वर्णन केले होते, पण पुढे जपानचा

पराभव अटळ दिसू लागल्यावर या भूमिगत नेत्यानी, सुकार्नोंनी इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याची घोषणा ताबडतोब करावी असे सुचवले. एकदा तर भूमिगतांपैकी काही उतावीळ जहाल तरुणानी सुकार्नो व हाटा या ज्येष्ठ नेत्याना चक्क पळवून नेले, व त्याच्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सुकार्नोंना पळवून नेणाऱ्या उतावीळ तरुणांमध्ये इंडोनेशियाचे सध्याचे परराष्ट्रमंत्री आदम मलिक हे देखील होते. जपानी आरमारामधील ॲडमिरल मायडा नावाच्या अधिकाऱ्याला इंडोनेशियातील राष्ट्रवादी चळवळीबद्दल सहानुभूती होती. त्याच्या साहाय्याने सतरा ऑगस्ट १९४५ रोजी सुकार्नोंनी व हाटानी इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. सुकार्नो व हाटानी घोषित केलेल्या या स्वातंत्र्याला डचानी सहजासहजी मान्यता दिली नाही त्यासाठी पाच वर्षे निकराचा लढा द्यावा लागला. हॉलंडवर बड्या राष्ट्राकडून दडपण आणावे लागले. डचाबरोबर वाटाघाटी करून हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यात हाटा व शहरीर याचा वाटा मोठा होता. इंडोनेशियाचे पहिले अध्यक्ष सुकार्नो, उपाध्यक्ष महमद हाटा व पहिले पंतप्रधान शहरीर होते, पण ही त्रिमूर्ती फार काळ एकत्र राहू शकली नाही. शहरीरच्या समाजवादी पक्षाचा पचावन्नच्या निवडणुकीत धुव्वा उडाला. पुढे १९६२ साली सुकार्नोंनी शहरीरना अटकेत टाकले व नंतर प्रकृतीच्या कारणास्तव औषधोपचार करून घेण्यासाठी त्याना स्वित्झर्लंडमध्ये जाऊ दिले. शहरीर स्वित्झर्लंडमध्येच १९६६ साली मरण पावले. महमद हाटानी सुकार्नोंशी मतभेद झाल्यामुळे १९५६ च्या अखेरीस उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिला व नंतर ते राजकारणातून निवृत्त झाले.

## इतिहास प्रेम

हाटा व शहरीर याना सुकार्नोंची लोकप्रियता कधीच लाभली नाही. सुकार्नोंचा इंडोनेशियातील सामान्य माणसावर असलेला प्रभाव लक्षात घेऊनच शहरीर व इतर भूमिगत नेत्यानी, सुकार्नोंनी स्वातंत्र्याची घोषणा करावी यासाठी त्याचे मन वळवण्याचा प्रयत्न केला व त्याचे नेतृत्व मान्य केले होते. इंडोनेशियाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या बऱ्याचशा प्रमुख नेत्याप्रमाणे हाटा व शहरीर या दोघानीही पाश्चिमात्य देशात शिक्षण घेतले होते. याउलट सुकार्नो इंडोनेशियातच शिकले होते. इंडोनेशियाच्या समाजजीवनातील उणीवावर टीका करण्यास शहरीरसारखा नेता कचरत नसे. पण सुकार्नोंना मात्र इंडोनेशियातील परपरांचा, सांस्कृतिक वारशाचा, इतिहासाचा विलक्षण अभिमान वाटत असे. बाहुल्याच्या साहाय्याने सादर केला जाणारा 'वायांग' नावाचा छायानाट्य–प्रकार, इंडोनेशियात अतिशय लोकप्रिय आहे. महाभारत वगैरे हिंदूच्या ग्रथातील कथा या छायानाट्याद्वारे सांगितल्या जातात. इंडोनेशियात इस्लामचा प्रसार होण्यापूर्वी हिंदू व बौद्धधर्मीयानी तेथील समाजजीवनावर जो प्रभाव टाकला त्याची साक्ष हा छायानाट्याचा प्रकार आजही देतो. सुकार्नोंना हा प्रकार अतिशय आवडत असे व या प्राचीन परिचित कहाण्याचे

संदर्भ ते आपल्या भाषणात नेहमी देत असत. (विद्यार्थीदशेत भीम या टोपण नावाने सुकार्नोनी लेखन प्रसिद्ध केले. छायानाटयातील घटोत्वच ही त्यांची अत्यत आवडती व्यक्तिरेखा होती.) इडोनेशियाच्या प्राचीन इतिहासातील उज्ज्वल कालखंडाची कहाणी सांगताना सुकार्नो रंगून जात असत. सगळेच राष्ट्रवादी पूर्व गौरववादी असतात. भूतकाळातील कोणत्यातरी कालखडाला सुवर्णयुग मानून त्याची आठवण जागी करणे हे सगळ्याच राष्ट्रवाद्याना आवडते. सुकार्नोही त्याला अपवाद नव्हते.

## शब्द दिले... स्फूर्ती दिली...

त्यांच्या या प्रवृत्तीला जोड मिळाली होती ती त्याच्या अमोघ वाणीची ! केवळ शब्दांच्या आतषबाजीने पाहता पाहता ते हजारो लोकाच्या जमावाला दिपवून टाकीत, खिळवून ठेवीत. सुकार्नोची व्याख्याने ऐकलेल्यानी त्याच्या कमालीच्या प्रभावी वक्तृत्वाचा नेहमीच उल्लेख केला आहे. श्रोत्याच्या भावना भडकवणे हे सुकार्नोना सहज साधत असे. भाषणात ते ज्या प्रतिमा वापरीत त्याही गडगडणारे आभाळ, खवळलेला समुद्र, सोसाटयाचे वादळ अशा असत. सुकार्नोच्या भाषणाची श्रोत्याना नशा चढत असे. नवेनवे शब्द बनवून किवा घोषणा तयार करून त्याचा सुकार्नो मत्रासारखा वापर करीत असत. दरवर्षी सतरा ऑगस्टच्या स्वातत्र्य-दिनाच्या भाषणात सुकार्नो, वक्ता म्हणून त्यानी मिळवलेले सारे कसब पणाला लावीत. स्वातत्र्यानतरच्या काळात सुकार्नोनी इडोनेशियातील जनतेला फक्त शब्द दिले असे म्हणणारे त्याचे कडवे टीकाकारही एका अर्थाने सुकार्नोचे वक्ता म्हणून कौशल्य मान्य करताना दिसतात.

सुकार्नोनी इंडोनेशियाच्या जनतेला कित्येक वर्षे स्फूर्ती दिली हे नाकारता येण्या-सारखे नाही. इडोनेशियासारख्या अत्यत मागासलेल्या देशातील जनतेची अस्मिता सुकार्नोनी फुलवली हेही मान्य करावे लागेल पण नुसत्या शब्दावर लाखो लोकाना किती काळ झुलवत ठेवणार? स्वातत्र्य मिळाल्यानतर इडोनेशियाचा आर्थिक विकास साधण्यात सुकार्नोना अपयश आले पश्चिम इरीयनसारख्या प्रश्नावर डचा-बरोबर तंटा करून व 'मलेशियाला चिरडून टाका' असल्या मोहीमा काढून आर्थिक आघाडीवरचे अपयश लपविण्याचा व लोकाचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला दोन्ही सत्तागटापैकी कोणत्याही गटात सामील न होता अलिप्त राहण्याचे धोरण स्वीकारून दोन्ही सत्तागटाकडून साहाय्य मिळव-ण्याची त्यांनी धडपड केली व पुढाकार घेऊन बाडुगला अलिप्त राष्ट्राची परिषद भरवली. राष्ट्र म्हणून आपल्या शक्तीचा वस्तुनिष्ठ अदमास न घेता आग्नेय अशि-याचे नेतृत्व करण्याची आकाक्षा बाळगली. लाल चीनच्या चिथावणीने बडया राष्ट्राना आव्हान देण्याचा प्रयोग केला. सयुक्त राष्ट्रातून बाहेर पडून नवोदित शक्तीची नवी जागतिक सघटना बाधण्याचा मनसुबा सुकार्नोनी बोलून दाखवला. अमेरिके-

सारख्या बड्या राष्ट्राने दडपण आणण्याचा प्रयत्न केला तेव्हा 'खड्ड्यात गेली तुमची मदत' असे सुकार्नो अमेरिकेच्या राजदूताला खाजगी भेटीतच म्हणाले असे नाही तर तसे त्यांनी लाखो श्रोत्यासमोर जाहीर सभेत बोलताना ठणकावून सांगितले. लष्कराला व कम्युनिस्ट पक्षाला आटोक्यात ठेवण्यासाठीही सुकार्नोनी जिवाचा आटापिटा केला, पण ते जमले नाही तेव्हा ते लष्करापासून दुरावले व कम्युनिस्ट पक्षाकडे झुकले चलनफुगवटा, शासनातील वाढता भ्रष्टाचार, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई अशा वातावरणात वाढलेली नवी पिढी आपल्याला 'बापक' (पिता) मानण्यास तयार नाही हे सुकार्नोना फार उशिरा समजले. १९६५ च्या तीस सप्टेंबरला कर्नल उंटूगने केलेले बंड हे सुकार्नोच्या संमतीशिवाय किंवा त्यांना माहीत असल्याशिवाय झाले असेल असे वाटत नाही. कर्नल उंटूग व इतर कटवाल्यांनी सहा सेनानींचे खून केल्यानंतर सुकार्नोनी त्या अमानुष कृत्याचा कडक शब्दात निषेध तर केला नाहीच, उलट उंटूगचे बंड फसल्यानंतरही बंडवाल्याच्याविषयी वाटणारी सहानुभूती सुकार्नो या ना त्या तऱ्हेने व्यक्त करीतच राहिले. त्यामुळे हळूहळू त्यांचे सारे अधिकार काढून घेऊन अखेर त्यांना नजरकैदेत ठेवणे हे राजकीय दृष्ट्या जनरल सुहार्तोना आवश्यक वाटले.

कम्युनिस्टांना व सुकार्नोना निष्प्रभ करून सुहार्तोंच्या नेतृत्वाखाली लष्कराने सत्ता हाती घेतली त्यालाही आता जवळजवळ पाच वर्षे लोटली आहेत. अमेरिका व इतर पाश्चिमात्य राष्ट्रे इंडोनेशियातील नव्या राजवटीला पुन्हा साहाय्य करीत आहेत. नव्या राजवटीचे लाल चीनबरोबरचे संबंध जिव्हाळ्याचे नसले तरी सोव्हिएत युनियनबरोबर पुन्हा मैत्री जोडण्याचा खटाटोप चालू आहे. इंडोनेशियाचे चलन आता मजबूत होत असल्यासारखे दिसत असले तरी मूलभूत आर्थिक समस्या कायम आहेतच एकेकाळी तांदळाची निर्यात करणारा इंडोनेशिया आता तांदळाची आयात करतो आहे. लष्करी राजवट असल्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसला आहे असे नाही. भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढतेच आहे. लोकसंख्याही झपाट्याने वाढते आहे. आज बारा कोटींवर असलेली लोकसंख्या पंचवीस वर्षात दुप्पट होईल असे तज्ञ सांगतात. या सगळ्या संकटाचे खापर सुकार्नोंच्या माथी फोडून फार दिवस चालणार नाही. किमान तीस वर्षे तरी अजून इंडोनेशियाला दारिद्र्य, वस्तूंची टंचाई वगैरे समस्यांना तोंड द्यावे लागेल असे आता सांगितले जाऊ लागले आहे. इंडोनेशियाच्या जनतेला दुःख सहन करण्याचा व सतत कष्ट करण्याचा संदेश देणारे सुकार्नो तरी याहून काय वेगळे सांगत होते? याचा अर्थ असा नव्हे की इंडोनेशियाच्या ढासळत्या अर्थव्यवस्थेला सुकार्नो मुळीच जबाबदार नव्हते. पण सुकार्नोबरोबरच त्यांच्या साहसी उपक्रमांना सध्या अधिकारावर असणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांनी मनापासून साथ दिली होती याचेही स्मरण ठेवावयास हवे. (उदाहरणार्थ इरीयनबद्दलचा डचांबरोबरचा तंटा व 'मलेशियाला चिरडा' ही मोहीम.)

## खरे ठरलेले भाकित

सुकार्नोच्या राजकीय कारकीर्दीची अशी शोकातिका का झाली असावी याचे कारण सागताना सुकार्नोच्या अमर्यादा सत्तालालसेचा निर्देश केला जातो. तसे पाहिले तर प्रत्येक राजकीय नेता हा सत्ता मिळवू व टिकवू पाहतो. आपण सत्तेचा वापर काही ध्येये साकार करण्यासाठी करतो असे तो मानतो तर त्याचे विरोधक त्याच्यावर सत्तालालसेचा आरोप करून तो हुकूमशहा बनत असल्याचा निर्वाळा देतात. सुकार्नोच्याबाबतीत हेच झाले. सुकार्नोनी काही काळ आपल्या हातात सर्व सत्ता केंद्रित केली होती, पण हे त्याना शक्य झाले ते इडोनेशियात पाश्चिमात्य धर्तीची उदारमतवादी लोकशाही स्थापन करण्याचा प्रयोग फसल्यामुळे, शिवाय आपल्याला विरोध करणारे राजकीय पक्ष व नेते यांना दडपण्यात सुकार्नोंना लष्करानेही साथ केली होतीच. पण कम्युनिस्ट द्वेषाने आधळे बनलेल्या तथाकथित उदारमतवादी लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांना कम्युनिस्टाना अनुकूल झालेल्या सुकार्नोंची हुकूमशाही राजवट खुपली, पण त्याऐवजी आलेली सुहार्तोची तितकीच प्राधिकारवादी लष्करी राजवट मात्र बोचत नाही. उलट ती मागासलेल्या देशातील एक अटळ अवस्था आहे असे सागितले जाते. १९६० साली महमद हाटा या सुकार्नोच्या एकेकाळच्या सहकाऱ्याने व नतरच्या विरोधकाने सुकार्नोची एकतत्री राजवट चालू असतानाच सुकार्नोबद्दल लिहिले होते, 'सुकार्नो देशभक्त आहेत व सामाजिक न्यायावर आधारलेल्या सपन्न इडोनेशिया राष्ट्राची शक्य तितक्या लवकर निर्मिती करण्याची त्याची धडपड आहे हे कोणीही नाकारू शकणार नाही. पण सुकार्नोचा स्वभाव व वृत्तीच अशी आहे की आपल्या सकल्पनाच्या स्थूल रूपरेषाच ते पाहू शकतात. त्या साकार होण्यासाठी आवश्यक असलेल्या तपशीलाबाबत ते फिकीर करीत नाहीत. परिणामत: जे साध्य करण्यासाठी त्याची धडपड चालू असते त्याच्या बहुधा उलट काहीतरी त्याच्या हाती लागते. त्याचे हेतु नेहमीच चागलेच असतात पण त्याच्या धोरणामुळे ते भलतीकडेच दूर मजल मारतात. मार्गदर्शनात्मक लोकशाहीच्या नावाखाली सुकार्नोनी जी हुकूमशाही निर्माण केली आहे त्यामुळे त्यानी उराशी बाळगलेल्या ध्येयाच्याबरोबर विरुद्ध अशा परिस्थितीच्या चक्रात ते सापडतील.' महमद हाटानी केलेले हे भाकित जसे खरे ठरले असे मान्य करावे लागते त्याचप्रमाणे त्यानी सुकार्नोचे केलेले हे मूल्यमापनही बरेचसे बरोबर आहे असे म्हणावे लागते.

□ □ □

**भुवन सोम...** पृष्ठ ८ वरून

आहे. आणि आता गोरीचा पती मोठ्या स्टेशनवर उपलब्ध असणाऱ्या मोठ्या संध्या हेरून अधिक पैसे खाणार आहे.

एका अर्थाने हा रीतसर सुखान्त असलेला शेवट (गोरी आणि तिचा पती पुढे कित्येक वर्षे सुखात जगले...वगैरे) तितकाच बोचकारून जातो, बेचैन करून जातो. कारण 'आज'च्या मूल्याच्या झगड्याशी त्याचा फार मोठा संबध आहे.


मृणाल सेन या झगड्यात बाजू घेत नाहीत, फक्त एक नेमका आणि हलका धक्का देतात; 'आज'चे वास्तव दर्शविणारा.

हा चित्रपट मुंबईत गर्दी का खेचू लागला आहे? ते मात्र गर्दीलाच माहीत! गर्दी चांगल्या चित्रपटाला होते आहे, हे काय थोडे झाले? □

**हमीद दलवाईंवरील हल्ल्याच्या निमित्ताने...** पृष्ठ २३ वरून

कार्य स्थगित करावे, असा मुळीच नव्हे. माझ्या मते त्यांनी थोडं समजुतीनं, सामोपचारानं घ्यावं. शिवाय आपल्या कार्यक्रमात कुठल्या बाबीला अग्रक्रम द्यावयाचा, याच्याबाबतही अधिक मुत्सद्दीपणा दाखवावा. द्विभार्या प्रतिबंधक कायद्यासारख्या वादग्रस्त प्रश्नाकडे वळताना तर अधिकच धूर्तपणा दाखवायला हवा. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी 'माणूस'ला (२१–३–७०) दिलेल्या मुलाखतीत सांगितल्याप्रमाणे या प्रश्नाकडे वळण्यापूर्वी अशा कायद्याच्या अभावी ज्या मुस्लीम महिलांचे जीवन उध्वस्त झाले आहे, त्यांचे यथाशक्ती पुनर्वसन करण्याला अग्रक्रम द्यावयाला हवा. त्यासाठी आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठीच जरी सुरुवातीला मंडळाच्या साऱ्या शक्तीचा व्यय झाला तरी ते अतीम फायद्याचेच ठरेल. त्याबरोबरच मुस्लीम तरुणांना शिक्षण आणि नोकरी यासबंधात आर्थिक आदी मदत देण्याच्या योजना आधी कार्यवाहीत आणावयाला हव्या. म्हणजे मग मुस्लीम मोहल्ल्यात दलवाई आदी सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांचे स्वागत काळ्या निशाणांनी वा 'काफिर' 'गद्दार' या घोषणांनी होण्याऐवजी वेगळ्या तऱ्हेने होईल, असे मला वाटते. मंडळाने असे काही विधायक (concrete) कार्य पार पाडले म्हणजे त्यांच्याविषयी मुस्लीममत सहजच अनुकूल बनू शकेल व मग द्विभार्याप्रतिबंधक कायदा व सहजसुलभ तलाक या प्रश्नांना त्यांनी हात घालावा. अर्थात तो घालण्यापूर्वी या प्रश्नाची निकड नि या अनिष्ट रूढीमुळे मुस्लीम स्त्रीची होणारी परवड पटविणेही तितकेच महत्त्वाचे होय. लोकमत मंडळाला अनुकूल होऊ लागले म्हणजे आपल्या लोकशाही सरकारलाही 'पर्सनल लॉ' बाबतचा आपला सध्याचा दृष्टिकोन बदलावा लागेल. □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर




जमाडी जंमत,
गमाडी गंमत...
मजेमजेने
प्यालात कधी?



FANTA IS A REGISTERED TRADE MARK OF THE COCA COLA COMPANY

फॅन्टा ऑरेंज....
इतके मधुर की,
तहानेतहि
गंमत.

फॅन्टा, कोका-कोला कंपनीचे उत्पादन.
CMCF-S-132 MAR

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M-H 649

आवृत्ती दुसरी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

किंमत : प्रसिद्धीनंतर रुपये पंचवीस सुमारे

प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत रुपये चौदा

सवलतीची मुदत : १५ ऑगस्ट १९७० पर्यंत

रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास रुपये दोन अधिक.

रक्कम मनिऑर्डरने पाठवावी. कार्यालयातही स्वीकारली जाईल.

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०